◆ मार्च २००६
◆ वर्ष सहावे
◆ अंक तिसरा

# मेहता मराठी ग्रंथजगत

— अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **पुस्तक परिचय** | |
| **हिरवा चाफा** : वि. स. खांडेकर | ४० |
| **खाली जमीन वर आकाश** | |
| : डॉ. सुनीलकुमार लवटे | ४८ |
| **कथारूपी खगोलशास्त्र** : लीना दामले | ५७ |
| **चला जाणून घेऊ या!** | |
| **रोग बरे करणारी पाण्याची अद्‌भुत शक्ती** | |
| : अनु. वैशाली जोशी | ६२ |
| **चक्रं आणि नाडी** : अनु. सुभाष जोशी | ६४ |
| **लोकसखा ज्ञानेश्वर** : आनंद यादव | ६६ |
| **साधंसुधं** : प्रमोदिनी वडके-कवळे | ८० |
| **पुरस्कार** | ८७ |
| **श्रद्धांजली** | ९८ |
| **बालनगरी** | १०० |
| **वाचनालयांना आवाहन** | १०८ |


संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## संमेलने हवीत, पण–

दरवर्षी साहित्य संमेलने होतात; आणि त्याला त्या-त्या गावच्या उत्सवाचे स्वरूप प्राप्त झालेले दिसते. लोकांमध्ये अपूर्व उत्साह असतो; साहित्यिकांना बघायला, ऐकायला तुफान गर्दी होते. त्याद्वारे एरव्ही पुस्तकांच्या वाटेला न जाणाऱ्या हजारो स्त्रीपुरुषांना पुस्तकांशी, वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वांशी, साहित्यक्षेत्रातील वेगवेगळ्या प्रवाहांशी परिचित होण्याची संधी मिळते. एकूण उत्सवी, उत्साही वातावरणामुळे साहित्याकडे पाहण्याची सकारात्मक, आत्मगौरवात्मक मन:प्रवृत्तीही परिपुष्ट होते. त्या दृष्टीने संमेलनांचे महत्त्व व महात्म्य असाधारण असते.

परंतु दुर्दैवाने अशा संमेलनांच्या आयोजकांना आणि महामंडळाच्या सदस्यांना या सर्व गोष्टींची असावी तशी जाण दिसत नाही– असा अनुभव दरवेळी येतो. सोलापूरलाही तोच अनुभव आला.

आयोजक संस्था ही कार्याध्यक्ष निर्मला ठोकळ यांची शिक्षणसंस्था. त्यांच्या वडिलांनी स्थापन केलेली. स्वागताध्यक्ष खासदार लक्ष्मणराव ढोबळे. सुशीलकुमार शिंदे हे खरे स्वागताध्यक्ष असायचे, पण आंध्रचे राज्यपालपद त्यांच्या स्वागताध्यक्षपदाच्या आड आले. एवढेच कशाला, संमेलनाला साधे उपस्थित राहणेही त्यांना घटनात्मकदृष्ट्या दुरापास्त झाले. त्यांचा पत्ता कटला. श्री. ढोबळे व ठोकळ या दोघांनी आपल्या राजकीय स्थानांचे भक्कमीकरण करण्याच्या दृष्टीनेच एकूण संमेलनाचा वापर करण्याचा चंग बांधला. त्यासाठी सगळ्या यंत्रणा त्यांनी राबवल्या. संस्थांमधील सेवकांकडून महिन्याचा पगार संमेलन निधीसाठी घेण्याचा सांगावा सर्वत्र जावा अशी व्यवस्था केली. इतरही यंत्रणांना त्या कामी लावले. स्मरणिकेची नाममात्र किंमत हवी; ती शंभर रुपयाला. आयते बाजारातून आणलेले चिनी बनावटीचे स्मृतिचिन्ह. तेही दीडशे रुपायाला; पुस्तक प्रकाशनासाठी प्रत्येक पुस्तकाला पाचशे रुपये शुल्क... असे संमेलनाचे बाजारीकरण करण्याचा मोह खरे तर टाळायला हवा. महाराष्ट्र शासन, महापालिका आणि इतर अनेक संस्था भरघोस देणग्या देत असतात, प्रतिनिधींकडूनही भरपूर शुल्क घेतले जाते, स्टॉलधारकांकडूनही सोयीच्या मानाने जास्तच भाडे वसूल केले जाते; तर ते सर्व जाते कुठे असा प्रश्न पडतो. संमेलनासाठी एकूण किती निधी संकलन करायची गरज असते, हे प्राथमिक अंदाजावरून लक्षात येते. पण ते फुगवून त्यापेक्षा जास्त निधी गोळा करून आयोजक संस्थेने आपल्या फायद्यासाठी शिल्लक वापरणे हा प्रकार अनुचितच होय. ना नफा ना तोटा या तत्त्वावरच अशा संमेलनांचे आयोजन हवे. पुण्याच्या एका संस्थेने ही संमेलने अत्यंत काटकसरीने करून आपल्या इमारतीवर मजला चढवला. आता तिसऱ्यांदा ही संस्था आमंत्रण देण्याचे ठरवते आहे. खरे तर प्रतिनिधींची किमान शुल्कात व्यवस्था व्हावी, स्टॉलची भाडी बेताची असावीत, स्मरणिका नाममात्र किमतीत उपलब्ध व्हावी असा कटाक्ष हवा. येथे प्रत्येक गोष्ट बाजारभावावर ताण करणारी असेल तर सरकारी अनुदान, महापालिकेचे अनुदान वगैरेंची मागणी करणे कितपत नैतिक ठरते? इंडियन आयडॉलच्या एकेका कार्यक्रमाचे बजेट दीडदोन कोटीचे असते; आणि ते पैसे रसिक प्रेक्षकांच्या खिशातून जमवले जातात. तेथे मुख्यमंत्री आपल्या निधीतून एक पैसाही देत नाहीत; आणि येथे शंभरावर वर्षांची परंपरा असलेल्या आणि आपल्या भाषेच्या अस्मितेच्या व अभिवृद्धीच्या दृष्टीने अभिमानास्पद ठरलेल्या साहित्य संमेलनाचे बाजारीकरण करण्याची काही राजकीय व्यक्तींची वा संस्थाचालकांची संधिसाधू स्पर्धा लागावी– ही गोष्ट दुर्दैवाची आहे. संमेलने भव्य व्हावीत; पण त्यात उधळपट्टी नसावी तशीच त्यातून फायदा मिळवण्यासाठी प्रत्येक गोष्टीला बाजारू रूप देऊ नये; संमेलनाचे विकृतीकरण टाळावे असे कळकळीने सांगावेसे वाटते. सोलापूरला जे बाजारीकरण दिसले ते खरोखरच उद्विग्न करणारे होते.

प्रत्येक संमेलनामध्ये काही गोष्टी दक्षतेने व जाणीवपूर्वक कराव्या लागतात. सभामंडपाची लांबीरुंदी, बसण्याची व्यवस्था, खुर्च्यांची संख्या, व्यासपीठाचा आकार, प्रतिनिधींची जाण्यायेण्याची व्यवस्था, क्लोज सर्किट टीव्ही, व्यासपीठावरील व्यक्तींची सुरक्षितता, सभामंडपाच्या तिन्ही बाजूंना फायर ब्रिगेड किंवा पाण्याचा टँकर सहजपणे जाऊ शकेल अशी सोय, पत्रकारांची व प्रसार माध्यमांची सोय, निमंत्रितांची सोय, निमंत्रितांची कार्यक्रमांना बसण्याची निश्चित आसनव्यवस्था वगैरे बाबींकडे बारकाईने लक्ष द्यावे लागते. हे साहित्य संमेलन आहे; हे लक्षात घेऊन व्यासपीठावर आणि अन्यत्रही राजकीय व इतर व्यक्तींचीच गर्दी किती असावी याचेही पथ्य पाळायला हवे. रसिक म्हणून राजकीय व इतर व्यक्तींनी, अधिकाऱ्यांनी जरूर मंडपात हजेरी लावावी; व्यासपीठाचा कब्जा घेऊ नये. साहित्याच्या पीठाचे पावित्र्य राखावे. पंधरा हजार खुर्च्या लावल्यावर मागे बसलेल्यांना कार्यक्रम दिसावे म्हणून क्लोज्ड सर्किट टीव्हीची व्यवस्था करायला हवी ही अगदी सामान्य बाब. परंतु चार-चार महिने मंथन करूनही एवढी साधी गोष्ट कार्यकर्त्यांच्या लक्षात येऊ नये याचे आश्चर्य वाटते. मंडपाच्या दोन बाजूंनी उंच पायऱ्या, तिसऱ्या बाजूला पुस्तकांचे स्टॉल– लोकांना गर्दीच्या वेळी व्यवस्थित बाहेर पडणेही अवघड! फायरब्रिगेड वा पाण्याचा टँकर येण्याजाण्यासाठी जागाच नाही.

काही प्रसंग आला असता तर!

स्टॉलच्या मांडणीबाबतही असाच गोंधळ दिसला. उपलब्ध मैदानाचा आकार लक्षात घेऊन स्टॉल्सची संख्या ठरवायला हवी होती. येथे जो मागेल त्याला स्टॉल– असा प्रकार झाल्याने त्यांची संख्या भरमसाट वाढली. त्यामुळे स्टॉलच्या दोन रांगांमध्ये आठदहा फूटही अंतर ठेवले गेले नाही. साहजिकच लोकांना व्यवस्थित चालण्याएवढीही जागा उरली नाही. मधला एक रस्ता तेवढा प्रशस्त. तेथे स्टॉल देतानाही पारदर्शकता राखली गेली नाही. काही स्टॉलधारकांना तेथे जागा मिळूनही ऐनवेळी मागच्या गल्लीत टाकण्यात आले. दहा-दहा स्टॉलधारकांना मोक्याच्या जागा देणे क्रमप्राप्तच असते; पण इतर स्टॉलधारकांनाही समोरचा रस्ता प्रशस्त वा लोकांना जाण्यायेण्यास सोयीस्कर राहावा असे पथ्य पाळायला नको का? स्टॉलची मांडणी अत्यंत चुकीच्या पद्धतीने करण्यात आल्याने अनेक स्टॉल दुर्लक्षित राहिले. स्टॉलना व्यवस्थितपणे क्रमांकही लावले गेले नाहीत. मॅट टाकूनही धुळीचा प्रचंड त्रास तिन्ही दिवस राहिला. खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सची व्यवस्था थोड्या अंतरावर हवी होती. तीस-चाळीस हजार लोकांची गर्दी असल्यावर चहापाणी व खाद्यपदार्थ भरपूर लागणारच! त्यासाठी एक स्वतंत्र कोपरा, बसण्याची व्यवस्था वगैरे हवी होती. ती तशी न करता, पुस्तकांच्या स्टॉलशेजारीच हे खाद्यपदार्थांचे स्टॉल ठेवल्याने सगळीकडे रिकामे ग्लास वा डिशेस, घोंगावणाऱ्या माशा आणि कागदाचे कपटे यांचा सुळसुळाट होता. कचरा साफ करण्याची काहीही यंत्रणा तीन दिवसांत दिसली नाही. स्टॉलधारक भरमसाट भाडे भरून येतात. स्टँड आणि पुस्तके आणण्याचा खर्च, तीनचार माणसांची राहण्याजेवण्याची व्यवस्था वगैरे किमान खर्च दहावीस हजाराच्या घरात असतो. तीसएक हजार रुपये खर्चून जर पुस्तकांची विक्री दहावीस हजारच होणार असेल तर ते स्टॉलवाल्यांना कसे परवडणार? म्हणून स्टॉलची संख्या मर्यादित हवी; त्यांची रचनाही आकर्षक हवी. ग्राहकांना निर्वेधपणे पुस्तके पाहता यावीत अशी मधली जागा हवी; धूळ-ऊन यांचा कमीत कमी विचार केला जायला हवा. परंतु नाशिक, औरंगाबाद, सोलापूर या सर्वच ठिकाणी याबाबत अराजकच दिसले. महामंडळाने व आयोजकांनी प्रकाशन संघटनेला विश्वासात घेऊन याबाबत नियोजन करण्याचे पथ्य पाळायला हवे.

एका वेळी तीन मंडपात कार्यक्रम– हा व्यापही श्रोत्यांची दमछाक करणारा ठरतो. सारखे लोक इकडून तिकडे ये-जा करीत राहतात. वक्त्यांमध्ये कोणाचीही वर्णी लावली जाते. चर्चा त्यामुळे रटाळ होतात. गर्दीमुळे श्रोत्यांना अधूनमधून उठणेही अशक्य ठरते. त्यामुळे कंटाळवाण्या कार्यक्रमांनाही बसणे भाग पडते. निमंत्रित कवींमध्ये तरी काही कसदारपणा असावा! सोलापूरच्या कविसंमेलनासंदर्भात 'काव्यदरबारातले बोगस कवी' अशी बातमी सकाळलाही द्यावी लागली. ''दोन्ही कविसंमेलनात सहभागी झालेले अनेक कवी हे वशिल्याने घुसविलेले कवी आहेत अशी प्रतिक्रिया




अनेक रसिकांनी दिली,'' असे त्या बातमीत म्हटले होते. ती वस्तुस्थितीच होती.

या संमेलनात रा. ग. जाधव, सुभाष भेंडे, केशव मेश्राम वगैरे माजी अध्यक्षांचीही हेळसांड झाली. अनेक निमंत्रितांची कुणी विचारपूसही कधी केली नाही. त्यांना पासेस वेळेवर पोचवले नाहीत. निमंत्रित पाहुण्यांची बैठकीची व्यवस्थाही अपुरी होती. इतर लोकांनीच पुढच्या खुर्च्या अडवून टाकल्या होत्या. वगैरे तक्रारी सारख्या कानावर येत होत्या.

साहित्य संमेलन हा एक आपल्या अस्मितेचा, अभिमानाचा सोहळा आहे. रसिकजन त्याकडे श्रद्धेने बघतात. त्याचे आयोजन साहित्यव्यवहाराचे पावित्र्य आणि महत्त्व राखून व्हावे. त्याचे बाजारीकरण होऊ नये अशी दक्षता घेतली जावी. सर्व लहानमोठ्या, नव्याजुन्या साहित्यिकांना त्यात स्थान मिळावे. आपल्या पठडीतल्या लोकांची वर्णी लावण्याचे व्यासपीठ म्हणून त्याचा गैरवापर टाळावा. महामंडळ एरव्ही खूप अवडंबर माजवते; स्वत:च्या सदस्यांच्या व्यवस्थेबाबत खूप आग्रह-दुराग्रह लादते; परंतु सभामंडपाची व्यवस्था, स्टॉल्सची मांडणी, प्रतिनिधींची योग्य व्यवस्था, माजी अध्यक्ष व निमंत्रित यांचे यथोचित आतिथ्य– याबाबतही काही किमान पथ्ये पाळण्याचा आग्रह का धरीत नाही? संमेलनाच्या आयोजनाबाबत एक मार्गदर्शक मॅन्युअल तयार करून, त्याच त्या चुकांची होणारी पुनरावृत्ती टाळायला हवी.

संमेलने भव्य प्रमाणावर व्हायला हवीतच; पण त्यांचे नियोजन-संयोजनही उत्तम दर्जाचे व्हायला हवे असाच आमचा आग्रह आहे.




**उमा कुलकर्णी यांच्या ओघवत्या शैलीत**




**केतकरवहिनी**

उमा कुलकर्णी

१५०रु.

# साहित्यवार्ता

### * विंदांच्या काव्यमैफिलीची ध्वनिचित्रफीत

'ज्ञानपीठ' पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांच्या काव्यमैफिलींच्या ध्वनिचित्रफितीचे सोलापूर येथील साहित्य संमेलनात प्रकाशन झाले. आर्या कम्युनिकेशनच्या दिग्दर्शिका माधवी वैद्य यांनी तिची निर्मिती केली आहे.

करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांना मानवंदना म्हणून ध्वनिचित्रफीत तयार करण्यत आली. विंदांच्या काव्यमैफलीची वैशिष्ट्ये काय आहेत, याबाबत स्वत: विंदा, प्रा. रा. ग. जाधव आणि अनंत दीक्षित यांनी विवेचन केले आहे.

### * 'निवडक किशोर'च्या पहिल्या खंडांचे प्रकाशन

बालवाचकांच्या लाडक्या 'किशोर' मासिकात प्रसिद्ध झालेले निवडक साहित्य 'निवडक किशोर' नामक १६ खंडांच्या रूपाने पुनर्प्रकाशित होणार आहे.

२७ जानेवारी रोजी 'बालभारती'च्या वर्धापनदिनी डॉ. वसंत काळपांडे यांच्या हस्ते पहिला खंड प्रकाशित झाला. पहिला खंड हा कथांना वाहिलेला आहे. यात दुर्गा भागवत, शांता शेळके, गिरिजा कीर, सरोजिनी बाबर, दि. बा. मोकाशी, मधु मंगेश कर्णिक आदींच्या कथा आहेत. १४४ पानांचा हा खंड १०० रुपयांना उपलब्ध आहे.

दुसऱ्या खंडामध्ये कविता, तिसऱ्यामध्ये बालसाहित्य, चौथ्यामध्ये व्यक्तिचित्रांचा समावेश राहील. विनोदी लेख, एकांकिका, शब्दकोडी, आदींना वाहिलेले एकूण १६ खंड प्रकाशित केले जाणार आहेत.

### * 'तेरावे कामगार साहित्य संमेलन'

कामगारांच्या वास्तव जीवनाचे चित्रण मराठी साहित्यात क्वचितच आढळते याला मध्यमवर्गीय मानसिकता कारणीभूत असून कामगारांनी आता स्वत: लेखन करून स्वत:चा शोध घ्यावा, असा सूर अमरावतीच्या कामगार साहित्य संमेलनाच्या परिसंवादात व्यक्त झाला.

तेराव्या कामगार साहित्य संमेलनात पहिल्या सत्रातच 'श्रमिकांच्या वास्तव जीवनाचे चित्रण मराठी साहित्यातून उपेक्षित' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. नारायण सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात



डॉ. दादा गोरे, लोकसत्ताचे निवासी संपादक प्रवीण बर्दापूरकर आणि डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी आपले विचार व्यक्त केले.

जो शिक्षित मध्यमवर्गीय होता त्यांच्याकडूनच साहित्यविषयक लिखाण झाले. स्वातंत्र्यापूर्वी शिक्षित वर्ग केवळ आठ टक्के होता. त्यामुळे त्यावेळचे साहित्यही आठ टक्क्याचेच होते. स्वातंत्र्य झोपडपट्टीपर्यंत पोहोचले, तेव्हाच बहुजन समाजातून साहित्यिक निर्माण झाले, असे नारायण सुर्वे यांनी सांगितले.

प्रवीण बर्दापूरकर म्हणाले की, १९८० नंतर कामगार जगतात महत्त्वाचे बदल झाले. कामगार ही संकल्पना बदलून त्याला पांढरपेशांचे स्वरूप मिळून गेले. सद्यस्थितीत कामगारांच्या जीवनाचे वास्तववादी, ठसठशीत चित्रण साहित्यातून दिसत नाही. मुद्रित माध्यमांमध्ये बदलही झाले. ही माध्यमे विचाराधिष्ठित न राहता उथळ झाली आहेत. पुरवण्यांनी आता फॅशन, सिनेमा, टी.व्ही. या विषयांची जागा घेतली आहे. कामगारविषयक साहित्य हद्दपार झाले.

डॉ. दादा गोरे म्हणाले की, सुरुवातीच्या काळात कामगार जीवनाचे चित्रण साहित्यात उमटत होते. मालक-मजूर संघर्ष असे स्वरूप त्याला होते. मात्र आता साहित्यिकांचे उद्देश बदलले आहेत. श्रमिकांच्या जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात दिसावे, यासाठी नारायण सुर्वे यांनी प्रयत्न केले. खांडेकरांच्या कादंबऱ्यांमधूनही हे चित्रण आले आहे. आता कामगार लेखकांनीच याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

डॉ. प्रमोद मुनघाटे म्हणाले, की 'चक्र' (जयवंत दळवी), 'डोंबाऱ्याचा खेळ', 'करंटा' (भाऊ पाध्ये) यातून कामगारजीवनाचे चित्रण झाले पण, भाऊ पाध्ये उपेक्षित राहिले. कामगारांच्या वास्तव जीवनाचे चित्रण साहित्यात उमटले नाही त्याला मध्यमवर्गच कारणीभूत आहे.

### * 'भाषा चांगली होण्यासाठी वकिलांनी साहित्याचा अभ्यास करावा'

'सामाजिक जाणीवा जागृत होण्यासाठी वकील, न्यायाधीश आणि लॉ कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी कायद्याच्या पुस्तकांबरोबरच साहित्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. कायदा हा मानवी जीवनाशी निगडीत आहे. त्यामुळे समाजजीवन समजल्याशिवाय कायद्याचा अर्थ कळणार नाही', असे प्रतिपादन मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी उस्मानाबाद येथील लॉ कॉलेज विद्यार्थी संसदेच्या उद्घाटनप्रसंगी केले.

भाषा हे शस्त्र असल्याने वकिलांना भाषेचे चांगले ज्ञान असावे. कोर्टात सुनावणीसाठी आलेले प्रकरण समजून घेण्यासाठी न्यायाधीशांनी वकिलांना प्रश्न विचारले पाहिजेत. निकाल पक्षकाराच्या बाजूने वा विरोधात लागो, निकालाने त्याचे समाधान मात्र झाले पाहिजे.

सध्या वकील न्यायदान प्रक्रियेतील अडसर असल्याची धारणा समाजात झाली आहे, तिच्यात बदल झाला पाहिजे, असे चंद्रचूड म्हणाले.

## * ज्ञानेश्वरीतील अमृतवाणी चित्ररूपात

विश्वकल्याण पसायदान मागणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या अभंगसाहित्यावर अनेकांनी अनेक अंगांनी लिखाण केले आहे. मात्र चित्रकलेच्या माध्यमातून ज्ञानदेवांची अमृतवाणी जिवंत करण्याचा ध्यास आत्मजा या २७ वर्षे वयाच्या चित्रकार तरुणीने घेतला असून त्या चित्रमालिकेतील पहिला भाग ज्ञानेश्वरांचे गुरू निवृत्तीनाथ यांच्या समाधीदिनाचे औचित्य साधून प्रकाशित झाला आहे.

ज्ञानेश्वरी आपल्या पिढीपर्यंत पोहोचली पाहिजे, असे वाटत असल्याने आपल्या कलेचा वापर करून ज्ञानेश्वरांच्या शब्दकळांवर चित्रे रेखाटण्याचा संकल्प आत्मजाने सोडला. त्यासाठी ज्ञानेश्वरीचा अभ्यास केला. ज्ञानेश्वरी समजून घेण्यासाठीच दोन वर्षे लागली, असे आत्मजा सांगते. त्यानंतर त्यातील निवडक ओव्यांना चित्ररूप देण्यासाठी निवडण्यात आले आणि साकारली चित्रज्ञानेश्वरी. या चित्रमालिकेतील गुरुभक्ती या विषयावरील चित्रांचे प्रकाशन संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या उपस्थितीत झाले.

## * बायबल हिंदीत आणण्याची योजना

जगभरातील विविध देशांतील लोकांना परस्परांशी जोडण्यासाठी भिन्न देशांतील व्यक्तींकडून त्यांच्या भाषेत बायबलचा अनुवाद करून घेण्याचा उपक्रम इस्रायलच्या परराष्ट्र मंत्रालयाने हाती घेतला असून, त्याअंतर्गत बायबलचा अनुवाद हिंदीत होणार आहे.

'पीपल ऑफ द वर्ल्ड इन्स्क्राईब इन बायबल' हा उपक्रम ऑक्टोबरमध्ये फ्रँकफर्टमध्ये सुरू झाला. हिंदी ही भारतात सर्वाधिक बोलली जाणारी भाषा असल्याने या उपक्रमात हिंदीचा समावेश करण्यात आला, असे परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारी डॅन ओर्यान यांनी सांगितले. जगभरातील जनतेला देश, धर्म आणि संस्कृतीचा भेद मिटवून एकमेकांशी जोडणे हा या उपक्रमाचा हेतू आहे, असेही त्यांनी नमूद केले.

विविध भाषांमध्ये बायबलचा अनुवाद झाल्यानंतर त्यांच्या मूळ प्रती इस्रायलमध्ये 'हाऊस ऑफ द बायबल' येथे ठेवण्यात येणार आहेत.

## * कारावासातही साहित्यलेखन आणि अध्ययन

विचारशक्तीत वाढ व्हावी... ज्ञानात भर पडावी... समाजाबद्दल आदराचा दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि तुरुंगातून बाहेर पडल्यावर चांगलं आयुष्य जगण्यास मदत व्हावी यासाठी राज्यातील मध्यवर्ती कारागृहात कैद्यांना मुक्त विद्यापीठातून पदवी परीक्षेस बसवण्याचे प्रयत्न सुरू असून आत्तापर्यंत ५५ कैद्यांनी पदवी मिळवल्याचे कारागृह उपमहानिरीक्षक धनाजी चौधरी यांनी सांगितले.



कैद्यांना कारागृहातून बी.ए., बी.कॉम., एलएलबी, एम.ए. इत्यादी अभ्यासक्रमाचे शिक्षण यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून घेता येते. अभ्यासक्रमासोठी प्रवेश घेणाऱ्या कैद्यांकडून सवलतीची फी आकारली जाते. २००२ पासून आत्तापर्यंत ५५ कैद्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. सुमारे १०० कैदी पदवीधर होण्याची शक्यता आहे. यात नाशिक, पैठण आणि येरवडा कारागृहातील कैद्यांची संख्या जास्त असल्याचे त्यांनी सांगितले.

पैठण कारागृहातील ओपन जेलमध्ये शिक्षा भोगणाऱ्या शिवाजी साळुंखेने लिहिलेल्या 'आत्मजड' या कवितासंग्रहाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला आहे. दोन वर्षांपूर्वी तो पदवीधर झाला आहे. नाशिक रोड कारागृहात असणाऱ्या दिनेश शहाने आत्तापर्यंत १०० कविता लिहिल्या आहेत.

## * कडोली साहित्य संमेलन

कडोली-बेळगाव येथील एकविसाव्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांनी भूषविले. डॉ. देखणे यांनी मौखिक स्वरूपातील लोककलांना संहिताबद्ध शब्दरूप दिले आहे. ललित व संशोधनात्मक अशा सुमारे ३२ पुस्तकांचे लेखनही केले आहे.

## * रंगभूमीच्या उभारीसाठी भरघोस आर्थिक साहाय्य

मराठी नाटकांना चांगले दिवस यावेत व नाट्यनिर्मिती मोठ्या प्रमाणावर व्हावी, तसेच नाट्य चळवळीला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने वर्षाला अडीच कोटी रुपयांचे अतिरिक्त 'पॅकेज' देण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी ता. २८ जानेवारी रोजी नाट्यसंमेलनाचे उद्घाटन करताना केली.

* एक लाख रुपयांचा राज्य रंगभूमी जीवनगौरव हा नवा पुरस्कार जाहीर.

* नाट्यनिर्मिती संस्थांना नवीन नाट्यनिर्मितीसाठी व त्यांच्या प्रयोगासाठी प्रत्येक प्रयोगाला १५ हजार व संगीत नाटकांच्या प्रत्येक प्रयोगासाठी २० हजार रुपयांचे अनुदान. तसेच अ, ब, क, ड दर्जाच्या नाट्य संस्थांना अनुक्रमे कमाल १००, ७५, ५० व २५ नाट्यप्रयोगांसाठी अनुदान देण्यासाठी प्रतिवर्षी अडीच कोटी रुपये याप्रमाणे आवर्ती खर्चास मान्यता, नाटकाचे किमान ५० टक्के प्रयोग मुंबई-पुण्याबाहेर करण्याची अट.

* राज्य नाट्यस्पर्धा, हौशी नाट्यस्पर्धा, बाल नाट्यस्पर्धा यांच्या पारितोषिकांच्या रकमेत वाढ तसेच परीक्षकांचे मानधन व दैनिक भत्त्यात वाढ.

* व्यावसायिक नाट्यस्पर्धेत प्राथमिक फेरीतून अंतिम स्पर्धेसाठी निवडलेल्या दहा नाटकांमधून पहिल्या येणाऱ्या तीन नाटकांना अनुक्रमे पाच, तीन व दोन लाख रुपयांची पारितोषिके.

* राज्य नाट्य महोत्सवांतर्गत प्रादेशिक पातळीवरील मराठी (२१ केंद्रे), हिंदी (दोन केंद्रे), संगीत, संस्कृत व अंतिम मराठी (प्रत्येकी एक केंद्र) विजेत्यांच्या बक्षीसरकमेत वाढ, प्रादेशिक मराठी नाटकांमध्ये दहा, सात व पाच हजार अशी प्रथम, द्वितीय, तृतीय बक्षिसे देण्यात येतील. अंतिम मराठी नाटकासाठी प्रथम एक लाख रुपये, द्वितीय पन्नास हजार रुपये, तृतीय पंचवीस हजार, चतुर्थ पंधरा हजार रुपयांचे पाचवे बक्षीस देण्यात येईल.

*** यापुढे 'दहावी फ' इतिहासजमा!**

फक्त अभ्यासातीलच हुशारीच्या आधारे विद्यार्थ्यांची तुकड्यांमध्ये उतरंड लावण्यामुळे होणारी कुचंबणा 'दहावी फ' चित्रपटाने अधोरेखित केलेली होती. यापुढे राज्यभरातल्या शाळांत ती थांबणार आहे. विद्यार्थ्यांची ही होरपळ थांबवण्यासाठी तुकड्यांमधली विद्यार्थ्यांची ही विभागणी थांबवण्याचे आदेश राज्यातील मान्यताप्राप्त शाळांना देण्यात येणार आहेत.

राज्य सरकारच्या या अत्यंत महत्त्वाच्या जीआरमध्ये परीक्षांतील मार्कांचा आधार घेऊन तुकड्यांमध्ये होणारी विभागणी 'शैक्षणिक भेदाभेद' करणारी आहे. सर्वच विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी समान पातळीवर उपलब्ध व्हाव्यात यासाठी हा भेद दूर होणे आवश्यक आहे असे आदेशात म्हटले आहे.

संस्कृतसारखा मार्क मिळवण्यासाठी महत्त्वाचा असणारा विषय घेण्याची संधी अनेक शाळांमध्ये विशिष्ट तुकड्यांमधील विद्यार्थ्यांनाच मिळते. तेदेखील यापुढे बंद होणार आहे. विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना किंवा वरच्या वर्गात पाठवताना शाळांनी मार्क हा आधार मानू नये, जास्त मार्क मिळवणारे विद्यार्थी एकाच तुकडीत मोठ्या प्रमाणात एकत्र येता कामा नयेत, असे म्हटले आहे.

पालक आणि शिक्षकांच्या काही संघटनांनी टक्केवरून भेद करणाऱ्या शाळांविरुद्ध मानवी हक्क आयोगाकडे तक्रार केली होती. आयोगाने हा भेद दूर करण्याचे आदेश सरकारला दिले होते.

*** कुमार गंधर्वांच्या अनवट रागांचा खजिना सीडीवर!**

वयाच्या अकराव्या वर्षी अलाहाबादला झालेल्या ऑल इंडिया म्युझिक कॉन्फरन्समध्ये सर्व बुजुर्गांसमोर मांड ठोकून गायला बसलेला शिवपुत्र कोमकली नावाचा मुलगा पुढे कुमार गंधर्व या नावाने विख्यात झाला आणि काळाच्या सर्व टप्प्यांत फिरून ७८ आरपीएमच्या रेकॉर्ड, एक्स्टेन्डेड प्ले (ईपी), लाँग प्ले (एलपी), कॅसेट या सर्व माध्यमांत आपला ठसा उमटवत सीडीमध्येही येऊन बसला. 'अ लाईफ इन म्युझिक', 'इन सर्च ऑफ इनर व्हॉईस' आणि 'धून उगम रागाज' या नुकताच बाजारात आलेल्या तीन सीडीजना अल्पावधीत आलेली मागणी पाहता हा कलावंत यापुढच्या काळाच्या टप्प्यांवरही भक्कम उभा राहील याचीच ग्वाही मिळते.



जुन्या बुजुर्ग गायकांची ७८ आरपीएमपासून प्रत्येक माध्यमातून जतन झालेली गायकी एचएमव्हीने खजिन्यासारखी जपली आहे. यातूनच सारेगामा इंडिया लिमिटेडने अर्थात जुन्या 'हिज मास्टर्स'व्हॉइसने हा खजिना नव्या पिढीकडे तिच्या युगातल्या माध्यमातून द्यायचे ठरवले आणि कुमारांचे अनवट राग या तीन सीडीजमध्ये आणले. लोककलेशी पक्की नाळ जोडून पंडितजींनी शास्त्रीय संगीत अधिक संपन्न केले आणि स्वत:चे असे अनेक राग निर्माण केले. लगन गंधार, पटमंजिरी, भवमत भैरव, मध-सूर्जा हे त्यांनी निर्माण केलेले राग या सीडीजमध्ये आहेत.

'अ लाइफ इन म्युझिक'मधले १९६९ सालात ध्वनिमुद्रित झालेले संजारी व बागेश्री, 'इन सर्च ऑफ इन व्हॉईस' १९६८ साली गायलेल्या लगन गंधार आणि पटमंजिरी, भवमत भैरव व मध-सूर्जा या रागांच्या जोडीला कबीर आणि गोरखनाथांची निर्गुणी भजने, अतिशय गाजलेले 'उड जायेगा हंस अकेला' आणि 'अवधुता गगन घटा' यांचा त्यात समावेश आहे.

*** एडमंड हिलरी यांच्या आत्मगाथेचे प्रकाशन**

''सर्वोच्च शिखर गाठल्यावरसुद्धा त्याची थोरवी मनात न बाळगता जमिनीवर पाय ठेवून कसं जगावं, त्याचं दर्शन हिलरी यांच्या आत्मगाथेतून होतं,'' असे उद्‌गार एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण यांनी 'शिखरावरून...' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या वेळी काढले.

चव्हाण पुढे म्हणाले, 'गिर्यारोहणाचा उत्तम अनुभव असलेल्या श्रीकांत लागूंनीच हिलरींच्या या पुस्तकाचा अनुवाद केला असल्यामुळे हा अनुवाद अस्सल झाला आहे. मराठी वाचकांना या पुस्तकाद्वारे हिलरी यांच्या 'एव्हरेस्ट' मोहिमेचेच नाही तर दक्षिण ध्रुव, उत्तर ध्रुव व गंगा नदीतील रोमहर्षक साहस मोहिमांचा अनुभव जाणून घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. आज माझ्यासह अनेकांनी 'एव्हरेस्ट' सर केलं आहे. पण १९५३ मध्ये हिलरी व तेनसिंग यांनी अवघड परिस्थिती आणि पूर्ण माहितीचा अभाव असताना त्यांनी आपला मार्ग काढला हे लक्षात घेणे आवश्यक आहे.''

अनुवादक लागू यांनी सांगितले, ''या अनुवादासाठी संमती देताना, एकपैसाही मानधन घेणार नाही, अशी हिलरींनी अट टाकली. मात्र 'पिठलं-भाता'ची मेजवानी जरूर द्यावी लागेल असे सांगून गोड धक्का दिला. भारतप्रेमी हिलरींना ही महाराष्ट्रीय खासियत आवर्जून आठवावी, याचं मला खूपच अप्रूप वाटलं.''

प्रदीप चंपानेरकर यांनी 'रोहन प्रकाशन'ने प्रकाशित केलेले हे २०० वे पुस्तक ठरावे हाही चांगला योगायोग ठरला,'' असे म्हटले.

*** राम गबाले यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन**

संस्कारक्षम चित्रपटांचे तपस्वी दिग्दर्शक, असे यथार्थपणे म्हणता येईल

अशा राम गबाले यांच्या 'आत्मचित्र' या आत्मचरित्राचे प्रकाशन २५ जानेवारी रोजी ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना यांच्या हस्ते झाले. विजय कुवळेकर, गंगाधर महांबरे, सुधीर गाडगीळ, पद्मगंधा प्रकाशनाचे अरुण जाखडे, मीरा गबाले आदी या वेळी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना गबाले म्हणाले, ''माझ्या या आत्मकथनातील अक्षर अन् अक्षर खरे आहे. चंदेरी सृष्टीच्या वाढत्या झगमगाटात आत्मा हरवतोय की काय, अशी भीती वाटते.''

### * 'धमाल चिंटू'

'लोकसत्ता'मधून रोज भेटणाऱ्या चिंटूच्या 'धमाल चिंटू' या पुस्तकाच्या प्रकाशनपूर्व नोंदणीस प्रचंड प्रतिसाद मिळाला.

फक्त शंभर रुपयांत पुस्तकाबरोबर चिंटूच्या धमाल गाण्यांची सीडी भेट देण्यात आली. या सीडीमधील गाणी डॉ. कल्याण इनामदार, संदीप खरे, प्रवीण जोशी यांनी लिहिली असून संगीत नियोजन प्रवीण जोशी यांनी केले आहे.

'नका विचारू पत्ता कुठून आलो राव, हसवण्याचे प्रॉमिसवाला चिंटू माझं नाव', 'दारावरची बेल वाजली पेपरवाला आला, लहानथोरांचा हा चिंटू आधी पाहूया चला' अशा चिंटूवरील गाण्यांचा या सीडीमध्ये समावेश आहे. 'चिंटू, पप्पू, मिनी, बगळ्या कोरम हा जमलाय, घराघराचा या शहराचा कंटाळा गेलाय, 'वाढदिवस, वाढदिवस, छोट्यांचा हा मोठा दिवस, वाढदिवस', 'रोज नव्याने छोटा चिंटू येतो आमच्या घरी,' आदी गीते यामध्ये समाविष्ट आहेत.

### * 'नासा'चे शास्त्रज्ञ आयआयटीच्या प्रेमात पडले!

''अंतराळवीरांगना कल्पना चावलाचा भारत कसा दिसतो? तिथे अंतराळ संशोधनाविषयी लोकांमध्ये किती कुतूहल आहे? असे अनेक प्रश्न इथं येताना आमच्या मनात होते. पण अंतराळ संशोधनात करिअर करू इच्छिणाऱ्या प्रत्येक तरुणासमोर आदर्श ठेवणाऱ्या कल्पनाच्या या देशाच्या प्रेमात आम्हीही पडलो आहोत...'' हे उद्‌गार आहेत मंगळावरील स्वारीसह अनेक अंतराळ मोहिमा यशस्वी करणाऱ्या नासाचे शास्त्रज्ञ आणि ॲरिझोना स्पेस युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर ग्रेग मिशेल आणि त्यांच्या पथकातील सदस्यांचे. नासामध्ये अवकाशातील ग्रहताऱ्यांचा वेध घेणाऱ्या या तल्लख वैज्ञानिकांना पाहायला आयआयटीयन्सनी तुडुंब गर्दी केली होती... खगोलप्रेमाने भारावलेल्या ग्रहमंडलातील ही अनोखी युती आयआयटीच्या 'टेकफेस्ट'मध्ये अवतरली.

अंतराळ संशोधनावरचे हजारो प्रश्न... प्रश्नांची सरबत्ती करण्यासाठी बाहेर लागलेली भलीमोठी रांग... सकाळी नऊ ते संध्याकाळी सहापर्यंत एका जागेवर उभे राहून हसऱ्या चेहऱ्यानिशी प्रत्येक प्रश्नाचं जाणकार समाधान केलं... तहानभूक विसरून सतत तीन दिवस आयआयटी देशभरातील लाखो तरुणांमध्ये अंतराळ संशोधनाचं प्रेम जागवणाऱ्या नासाच्या शास्त्रज्ञांनी 'मिशन टेकफेस्ट' यशस्वी



केलं. अमेरिका वगळता चीननंतर येथे होणाऱ्या 'मार्स मिशन' प्रदर्शनानं आयआयटीच्या वाटचालीत मानाचा तुरा खोवला. इस्रो (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) आणि एएसयू (ॲरिझोना स्पेस युनिव्हर्सिटी) आयोजित या प्रदर्शनाला तरुणांची लोटलेली गर्दी हा आश्चर्याचा धक्का असल्याचं एएसयू टीमचे नेतृत्व करणाऱ्या डॉ. स्टीव्ह रफ यांनी सांगितलं. डॉ. ज्यो मशेलस्की, लोणारच्या सरोवरावर पीएचडी करत असलेले डॉ. शॉन राइट, सिस्टम इंजिनिअर ग्रेग मेहाल, डेल नोस असे सहा शास्त्रज्ञ टेकफेस्टमध्ये रोबोटिक्स करामतींच्या प्रेमात पडले आहेत. अमेरिकेत अनेक भारतीय विद्यार्थी स्पेस स्टडीज करत आहेत. त्यांच्याकडून येथील स्पेस रिसर्चविषयीच्या टॅलंटचा अंदाज येत होता. पण हे टॅलंट अगदी अमेरिका, चीनला भविष्यात चॅलेंज करू शकेल, याचा अनुभव तीन दिवस आम्ही घेत आहोत, अशी शाबासकीची थाप डॉ. ज्यो मशेलस्की, डेल नोस यांनी दिली.

### * पाचपोर यांच्या 'एक हिरवेगार वर्ष' कादंबरीचे प्रकाशन

१९ व्या अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलनात कवी रेणू पाचपोर यांच्या 'एक हिरवेगार वर्ष' या किशोर कादंबरीचे प्रकाशन प्रा. फ. मुं. शिंदे यांच्या हस्ते झाले. साकेत प्रकाशनने हे पुस्तक प्रकाशित केले असून प्रकाशन कार्यक्रमास आमदार सुरेश देशमुख, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष धारासूरकर, आसाराम लोमटे, के. एस. अतकरे, अरुण वि. देशपांडे, जनशक्ती वाचक चळवळीचे श्रीकांत उमरीकर उपस्थित होते.

### * 'वाचन संस्कृती वाढविण्यासाठी ग्रंथालयांची चळवळ उभारली पाहिजे'

वाचन संस्कृती वाढविण्यासाठी ग्रंथालयांची चळवळ उभारली पाहिजे, असे मत पत्रकार मुकुंद संगोराम यांनी पुणे नगर वाचनमंदिराच्या १५८ व्या वर्धापनदिनी व्यक्त केले.

संतवाङ्‌मय विषयक ग्रंथासाठी 'कवी ह. स. गोखले पुरस्कार' डॉ. केतकी मोडक यांना 'कडकडोनि वीज निघाली ठायींचे ठायी' या ग्रंथासाठी देण्यात आला.

कै. आर. एन. नगरकर प्रतिष्ठान पुरस्कृत 'डॉ. श्री. व्य. केतकर आदर्श ग्रंथपाल पुरस्कार इंदुताई गोखले यांना देण्यात आला. सर्वसामान्य परिस्थिती असतानाही ९ लाख रुपयांची देणगी विविध संस्थांना देणारे वसंत थिटे यांना 'ॲड. शरद तपस्वी पुरस्कार' देण्यात आला.

ग्रंथालयाचे महत्त्व याविषयी बोलताना संगोराम म्हणाले की, पुस्तकांचे घर ही ग्रंथालये आहेत. लहान बाळासारखी निगराणी त्यांची या ठिकाणी ठेवली जाते. सार्वजनिक पैशांमध्ये ग्रंथालय चालविण्यात अनेक मर्यादा येत आहेत. तर सरकार याबाबतीत उदासीनता आहे.

वाचन संस्कृती वाढवायची असेल तर ग्रंथालय संस्था अधिकाधिक सशक्त करणे हा एकमेव उपाय आहे. कागदाचा उपयोग नोटेपुरता असतो हे कळणाऱ्यांना ग्रंथालयाचे व पुस्तकांचे महत्त्व कळणार नाही. त्यामुळे तीन हजार रुपये देऊन पाचशे ग्रंथालये उभारण्याची शासनाची योजना कधी पूर्ण होणार असा प्रश्न त्यांनी विचारला.

### * भारतीय पुस्तके परदेशी भाषांमध्ये

ऑक्टोबर महिन्यात जर्मनीतील फ्रँकफूर्ट येथे जागतिक पुस्तक प्रदर्शन भरणार आहे. या पुस्तक प्रदर्शनाच्या निमित्ताने भारतीय प्रादेशिक भाषांमधील निवडक पुस्तके जर्मनीसह अन्य परदेशी भाषांमध्ये नेण्याची संधी भारतीय प्रकाशकांना मिळणार आहे. या पुस्तक प्रदर्शनाच्या दृष्टीने तयारी सुरू झाली आहे. मराठी भाषेतील काही निवडक पुस्तकांचा जर्मन भाषेत अनुवाद करण्यात येणार आहे. त्यासाठी साहित्य अकादमीकडे काही पुस्तकांची शिफारस करण्यात आली आहे.

प्रदर्शनाला जगभरातील पुस्तक प्रकाशक हजेरी लावत असतात. पुस्तक विक्रीपेक्षाही येथे पुस्तकांच्या कॉपीराईट्सविषयीची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणात होत असते. भारताला 'गेस्ट ऑफ ऑनर' असा बहुमान मिळाला असून भारतीय प्रकाशकांसाठी तेथे वेगळे दालन असणार आहे. तेथे भारतीय प्रकाशक आपल्या पुस्तकांचे मार्केटिंग करू शकतील.

साहित्य अकादमीतर्फे नवी दिल्ली येथे झालेल्या दोन बैठकींना प्रकाशक परिषदेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### * लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर

चिपळूण येथील लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराच्या वतीने कादंबरी व कथासंग्रहाला पुरस्कार देण्यात येणार आहेत.

सन २००४ नंतर प्रकाशित झालेल्या स्वतंत्र कादंबरीला नामवंत साहित्यिक व कवी मा. के. काटदरे तथा कवी माधव यांच्या नावे तीन हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. उत्कृष्ट कथासंग्रहाला मराठी साहित्यातील नामवंत लघुकथालेखक व कवी वि. ल. बरवे तथा आनंद यांच्या नावाने दोन हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे.

### * सीमाप्रश्न लोकशाही मार्गानेच सोडवला पाहिजे

स्वातंत्र्योत्तर अपरिहार्य असणाऱ्या भाषावार प्रांतरचनेतून भाषिक अस्मितेचा प्रश्न देशातल्या सर्वच भाषांमध्ये निर्माण झाला आहे. मात्र तो लोकशाही पद्धतीने, चर्चा आणि सामोपचारातूनच सोडवला गेला पाहिजे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर कोणत्याही बाजूची आंदोलनाची एकांगी भूमिका मारकच ठरेल, असे प्रतिपादन अभिनेते गिरीश कर्नाड यांनी 'पुलोत्सवा'निमित्त आयोजित केलेल्या वार्तालापात केले. कर्नाड म्हणाले की, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत महाजन अहवाल



पन्नास वर्षांपूर्वीच सादर केला गेला असला तरी त्याच्याशी असहमती दाखवण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. परंतु हे करताना लोकशाही मार्गाचा अवलंब होतो आहे का नाही याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

एकदा लोकशाही पद्धतीने प्रश्न सोडवण्याचे ठरवल्यानंतर बाबरी मशीद पाडणे अथवा गोध्रा कांडानंतर झालेला हिंसाचार करणे कोणत्याही पातळीवर समर्थनीय ठरत नाही. कर्नाड पुढे म्हणाले की, अमेरिका आणि इंग्लंडमध्येही नाईन इलेव्हन अथवा बॉम्बस्फोटानंतर आंदोलने न होता तो प्रश्न अधिक समंजसपणेच हाताळला गेला. कारण शेवटी हिंसेतून अधिक हिंसाच घडत असते! महानगरी संस्कृतीचा लाभ मराठी लेखकांना जेवढा मिळाला तेवढा कन्नडला मिळाला नाही, त्यामुळे मूळ गाभा असणारे ग्रामीण जीवन कन्नड साहित्याच्या निर्मितीस पोषक ठरले. पण मोठे शहर बनलेल्या बंगलोरमधील रस्त्यांवरील दिशादर्शक पाट्या या कन्नडमध्येच ठेवण्याचा अट्टाहास चुकीचा आणि न समजणारा आहे, हेही कर्नाड यांनी नमूद केले.

मराठी नाटकांची परंपरा ही भावे यांच्यापासून नव्हे तर तंजावरच्या भोसले घराण्यापासून, अठराव्या शतकापासून सुरू होते, असे सांगून ते म्हणाले की, हा इतिहास फारसा ज्ञात नाही. आजच्या घडीला एक नाटककार म्हणून आपल्याला तेंडुलकरच श्रेष्ठ वाटतात. ज्ञानपीठसारखी कोणत्याही प्रकारची सरकारी अथवा खासगी पारितोषिके ही वादग्रस्त ठरत असल्यामुळे या पारितोषिकांच्या निकषावर कोणालाही जोखणे चुकीचे आहे. भारतीय सिनेमा समृद्ध असतानाही 'ऑस्कर'बद्दल आपल्या मनातले न्यूनगंडही तेवढेच चुकीचे आहेत, असे ते म्हणाले.

पौराणिक आणि ऐतिहासिक विषय घेऊन त्यांचा वर्तमानातल्या सर्वाधिक गुंतागुंतीच्या प्रश्नांशी मेळ घालणारी नाटके लिहायला आवडतात.

मराठी साहित्याशी आपली नाळ सुरुवातीपासूनच जोडली गेली असल्यामुळे आपल्या लिखाणावरही त्याचा प्रभाव आहे. त्या अर्थाने महाराष्ट्र हेच माझे कर्नाटक आहे, असे कर्नाड यांनी सांगितले.

### * 'अमेरिकन रंगभूमी आत्मसंतुष्ट श्रीमंत आणि टुरिस्टांची!'

आयुष्यात एकदा न्यूयॉर्क पाहायला येणारे हमखास ब्रॉडवेवरची नाटके बघतात. पण स्थानिक अमेरिकन उच्च, मध्यमवर्गीय माणूस नाटकाकडे सहसा वळत नाही. तो शॉपिंग करतो, पण नाटकाला जात नाही. त्यामुळे अमेरिकेतली मुख्य धारेतली रंगभूमी ही टुरिस्टांसाठी नाटके करणारी आणि म्हणूनच महाग आहे. गरिबांना ती परवडत नाही. आत्मसंतुष्ट श्रीमंत मात्र ब्रॉडवेची नाटके बघून खूष होतात, अशी सडेतोड टीका अमेरिकेतील जॉर्जिया युनिव्हर्सिटीतील प्राध्यापिका डोरोथी फिग्युईरा यांनी मुंबई विद्यापीठाच्या ॲकॅडमी ऑफ थिएटर आर्टसतर्फे आयोजित व्याख्यानात केली.

त्या म्हणाल्या की, भारतातील रंगभूमी ही जशी सामाजिक स्थित्यंतराविषयी सजग आणि सामाजिक प्रश्नांना थेट भिडणारी आहे, तशी अमेरिकन रंगभूमी नाही. आमच्याकडे संपन्नतेतून येणारी आत्मसंतुष्टता आणि एक प्रकारचा उद्दामपणा लोकांमध्ये दिसतो. त्यांना कशानेही आश्चर्य वाटत नाही. त्यामुळे नाटकातही कोणी आशयाच्या बाबतीत मोठे प्रयोग करीत नाही. ब्रॉडवेवर 'कॅट', 'फॅण्टम ऑफ दि ऑपेरा' सारखी जुनीच नाटके वर्षानुवर्षे चालतात. म्युझिकल्सचे प्रमाण जास्त आहे आणि नाटक करणारेही रिस्क घेऊ मागत नाहीत. त्यांचे लक्ष फायद्याकडे असते.

९/११ सारखी घटना घडली तरी, तिचे प्रतिबिंब नाटकांतून उमटत नाही, चित्रकला, शिल्पकला, कविता, नॉन फिक्शनमध्ये मात्र सामाजिक बदलांचे, वादळी आशयाचे प्रतिबिंब पडते, असे त्या म्हणाल्या. नाटकापेक्षा अमेरिकन्स नृत्याचे कार्यक्रम बघणे पसंत करतात आणि एका थिएटर कंपनीच्या चार-चार डान्स कंपन्या असतात. अर्थात ऑफ ऑफ ब्रॉडवेवरची नाटके आशय आणि सादरीकरणात सतत प्रयोगशील असतात व तिथे थिएटर जिवंत आहे, हेही त्यांनी नमूद केले.

### * स्त्री शिक्षणातून जागतिक भान आले

"इतिहासाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. जगातील ज्ञान इंग्रजीत असल्यामुळे ते शिकण्याचा योग आपल्याला आला आहे, असे मत न्यायमूर्ती रानडे यांनी मांडले होते. समाजातील व्यवस्था, सामाजिक समता ही मूल्ये इंग्रजी शिक्षणातून आली आहेत," असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी पुणे येथे केले.

इंडियन लॉ सोसायटी आणि आयएलएस विधी महाविद्यालय यांच्या वतीने 'न्या. बी. डी. बाळ स्मृती व्याख्यानमाले'त 'तीन न्यायमूर्ती : न्या. म. गो. रानडे, न्या. का. त्रिं. तेलंग आणि न्या. ना. ग. चंदावरकर' या विषयावर ते बोलत होते. प्रा. सदानंद मोरे अध्यक्षस्थानी होते.

"न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्यातील स्वत्व दाखवून आपल्याला जागृत केले आणि त्यावर पाश्चात्य आधुनिकतेचे कलम लावले."

प्रो. मोरे म्हणाले, "रानडे हे राज्यात जास्तीत जास्त आदर मिळविलेले न्यायमूर्ती होते. आधुनिक भारत घडविण्यात या तिन्ही न्यायमूर्तींचे महत्त्व आहे."

### * ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मिती हे विद्यापीठाचे काम

जास्तीत जास्त पारदर्शक कारभारातून ज्ञानाधिष्ठित समाज तयार करण्याचे उद्दिष्ट पुढे ठेवून विज्ञान शिक्षणाच्या जोडीला भारतीय संस्कृती आणि सामाजिक भान पुरवणारे रोजगारपूरक शिक्षण देण्यावर भर राहील, असे आश्वासन विद्यापीठाचे



मावळते कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी दिले.

पुणे विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिनानिमित्त सहकार क्षेत्रातले दुलाजी पाटील, गांधीवादी विचारवंत शोभना रानडे, ज्येष्ठ प्रशासकीय तज्ज्ञ बी. जी. देशमुख, खगोलतज्ज्ञ प्रा. गोविंद स्वरूप आणि प्रसिद्ध उद्योजक अनु आगा यांना जीवनसाधना गौरव पुरस्कार देण्यात आले.

महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशनच्या पोर्टलचे उद्घाटन भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. एफ. पाटील यांच्या हस्ते, तर विद्यापीठावरील फिल्मचे उद्घाटन नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण यांच्या हस्ते झाले.

कुलगुरूंनी आपल्या पाच वर्षांच्या कारकीर्दीचा आढावा घेतला. अधिक समाजाभिमुख शिक्षणासाठी विद्यापीठातील सर्वच विभागांना स्वायत्तता हवी. थरमॅक्स कंपनीप्रमाणे इतर औद्योगिक संस्थांनीही विद्यापीठाच्या सहकार्यातून नवनवे अभ्यासक्रम सुरू करावेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विषयांना सामाजिक विषयांच्या अभ्यासाची जोड मिळाली तर शिक्षणाच्या कक्षा खऱ्या अर्थाने रुंदावतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेडच्या पोर्टलमुळे विद्यापीठाच्या कारभाराची माहिती केव्हाही देणे शक्य होईल. किंबहुना माहिती अधिकार कायद्यामुळे संपूर्ण व्यवस्थापनाचे रिइंजिनिअरिंग (तांत्रिक पुनर्रचना) होत आहे, असे डॉ. कोळस्कर म्हणाले.

पुणे विद्यापीठास आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले असून फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, न्यू साउथ वेल्स इत्यादींशी करार झाले आहेत. त्यातूनच शिक्षण हे सर्वदूर आणि सर्वव्यापी होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेल्या पाच वर्षांतील प्रगती

* पुणे विद्यापीठातल्या कॉलेजांची संख्या २१२ वरून ३८७ पर्यंत पोहोचली.
* विद्यापीठमान्य शैक्षणिक संस्थांची संख्या २०० च्या पुढे गेली.
* विद्यार्थ्यांची संख्या दोन लाख १२ हजारांवरून तीन लाख ९० हजारांपर्यंत पोहोचली.
* व्हर्चुअल क्लासरुमसाठी विद्यापीठ आवारात ६२२ मॅगाबाईट क्षमतेचे इंटरनेट
* कनेक्टिव्हिटीसाठी ऑप्टिक फायबर केबलिंगचे काम पूर्ण.

### * शालेय मराठी साहित्य संमेलन

अन् एकमेकांच्या विचारांचे केले मिलन
गोडी व्हावी निर्माण प्रत्येक विद्यार्थिनीत
आपुल्या मराठी मायबोलीची
अन् प्रतिबिंब उतरावे त्यांच्यात

साहित्य वाटिका बहरवण्याची

पुण्याच्या हुजूरपागा प्रशालेने श्रीमती नवाथे, मुख्याध्यापिका अलका काळे यांच्या मार्गदर्शनाने शालेय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले. 'संमेलन' म्हणजे एकमेकांच्या विचारांची एकत्रितरीत्या देवाणघेवाण करण्याचे माध्यम होय. साहित्य संमेलनाच्या उद्घाटक डॉ. मंदा खांडगे यांनी स्वत:चे ग्रंथालय असावे असा, तर विनिता पिंपळखरे यांनी 'अपयश पचवायला शिका, ते पचवल्याशिवाय यशाचे शिखर दिसत नाही' असा सल्ला दिला. नीलिमा गुंडी यांनी कविता वाचून दाखविल्या. संजीवनी बोकील यांनी 'पेरते व्हा' हा संदेश दिला. या सर्व लेखिकांनी आपले अनुभव सांगितले. डॉ. मंदा खांडगे, विनीता पिंपळखरे, संजीवनी बोकील या हुजूरपागेच्या माजी विद्यार्थिनी. शिक्षकांनी साहित्य संमेलनाचे सुबद्ध नियोजन करून विद्यार्थिनींना स्वरचित कविता सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. हे साहित्य संमेलन म्हणजेच या शाळेच्या भावी लेखिकांच्या यशाची पहिली झलक आहे.

हे संमेलन दोन दिवसांत ४ सत्रांमध्ये साजरे झाले. साहित्य संमेलनासाठी तयार करण्यात आलेले वाग्देवी सभागृह, कुसुमावती द्वार, इरावती द्वार व शकुंतला द्वार यांनी सज्ज होते.

'पुस्तक संस्कृतीच्या वर्धनासाठी स्वत:चे ग्रंथालय असावे, असे उपक्रम महाराष्ट्रभर व्हावेत अशी अपेक्षा मंदा खांडगे यांनी व्यक्त केली. हुजूरपागा शाळेने मराठी भाषेला हा मानाचा मुजराच केला आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या धर्तीवर विद्यार्थिनींनी काही ठराव संमत केले ते असे–

१) ज्ञानपीठ पारितोषिक विजेते विंदा करंदीकरांच्या अभिनंदनाचा ठराव.
२) मराठी भाषेला वैभवाच्या शिखरावर पोहोचवणे.
३) प्रत्येकीचे एक वैयक्तिक ग्रंथालय असावे.
४) अनेक शाळांची मिळून साहित्य संमेलने घ्यावीत.
५) शासनाने नाट्यस्पर्धांप्रमाणे संमेलने पुरस्कृत करावीत.
६) पाठ्यपुस्तके रोचक, रंजक व वैविध्यपूर्ण असावीत.

### * 'क्रॉसवर्ड' आता प्रकाशन व्यवसायात

'क्रॉसवर्ड' ग्रंथभांडाराने 'ॲटलास' पुस्तकाद्वारे प्रकाशनक्षेत्रात पदार्पण केले आहे. पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच 'ओपन स्पेस' येथे संपादक सुदीप सेन आणि कविवर्य दि. पु. चित्रे यांच्या हस्ते पार पडले.

ब्रिटनस्थित 'आर्क आर्टस' आणि 'क्रॉसवर्ड' यांनी संयुक्तपणे हे पुस्तक प्रकाशित केले आहे. 'ॲटलास'च्या सल्लागार संपादकमंडळात ज्येष्ठ ज्ञानपीठ पुरस्कारविजेते डॉ. गिरीश कर्नाड यांचा समावेश आहे. प्रकाशनास 'क्रॉसवर्ड'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आर. श्रीराम उपस्थित होते. 'ॲटलास'मध्ये समकालीन भारतीय आणि आंतरराष्ट्रीय लेखनाचा समावेश आहे.

प्रकाशनप्रसंगी बोलताना सेन म्हणाले, ''कसदार, सृजनशील लेखनाचे दर्शन 'ॲटलास'मधून घडेल, प्रस्थापितांबरोबरच नवोदित प्रज्ञावंत लेखक या पुस्तकातून वाचकांना भेटणार आहेत.''

### * समांतर रंगभूमीवर चर्चासत्र

माध्यम स्फोट, इंटरनेट, मोबाईल, मल्टिप्लेक्स कल्चर या गोष्टींचा आणि अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणाचा मराठी नाटकावर नेमका कोणता परिणाम झाला आहे? आजूबाजूच्या सामाजिक-आर्थिक वास्तवाचा आणि समांतर नाट्यधारेचा संबंध काय? प्रायोगिक नाटके करणाऱ्यांना कोणकोणत्या सृजनात्मक आणि व्यावहारिक अडचणींना सामोरे जावे लागते? या आणि अशा अनेक प्रश्नांचा ऊहापोह करण्यासाठी पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्राने वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या सहकार्याने कणकवलीत दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजित केले होते.

लेखक, दिग्दर्शक, नट, हौशी संस्थाचालक, अभ्यासक व चिंतक अशा विविध भूमिकांमध्ये गेली १५ वर्षे मराठी रंगभूमीवर कार्यरत असणारे तरुण या चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते.

चर्चासत्राचे ११ फेब्रुवारी रोजी उद्घाटन झाले. तरुण रंगकर्मी परेश मोकाशी यांचे बीजभाषण झाले. 'गेल्या १५ वर्षांतील मराठी नाटक' या विषयावरील चर्चेत संदेश कुलकर्णी, मोहीत टाकळकर, आशुतोष पोतदार यांनी भाग घेतला. 'नाट्यप्रशिक्षण व व्यावसायिकता' या चर्चासत्रात मुक्ता बर्वे, अद्वैत दादरकर, अश्विनी गिरी व प्रा. वामन केंद्रे आणि प्रा. शशिकांत बऱ्हाणपूरकर सहभागी होते.

'नाटक करताना उद्भवणाऱ्या अडचणी : किती सृजनात्मक, किती व्यावहारिक?' या विषयावरील चर्चेत डॉ. राजीव नाईक, चेतन दातार, सचिन कुंडलकर, सतीश मनवर, इरावती कर्णिक, मनस्विनी, लता रवींद्र, हिमांशु स्मार्त हे रंगकर्मी सहभागी झाले होते.

### * 'नाटक हे माझे व्यसनच; त्याच्या प्रवासाचे एवढे कौतुक पाहून मी भारावतो'

'नाटक ही माझी दारू आहे, व्यसन आहे. त्यामध्ये मी काही विशेष करतो असे मला वाटत नाही. म्हणूनच 'लमाण' या नाट्यप्रवासाचे आपल्याला फारसे अप्रूप नाही, पण आपण सर्व कौतुक करत आहात त्याबद्दल मी आभारी आहे,' अशा विनम्र शब्दांत ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. श्रीराम लागू यांनी मनोगत व्यक्त केले.

पॉप्युलर प्रकाशन आणि वासंती गंगाधर गाडगीळ विश्वस्त संस्था यांच्या

वतीने सौ. सत्यभामा गाडगीळ पुरस्कार डॉ. लागू यांना प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक आणि नाटककार गिरीश कर्नाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ११ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

'लमाण' हे आपले आत्मचरित्र नसून तो नाट्यप्रवास आहे, असे सांगून लागू म्हणाले की, जे आपल्याला लिहायचं नसतं, पण लोकांना वाचायला आवडतं ते आत्मचरित्र!

'ललित' मासिकाच्या पाहणीत १६० पैकी ३९ वाचकांना 'लमाण' आवडलं असतानाही त्याच्या सर्वोत्कृष्टतेबाबत स्तुतिसुमने उधळली जात आहेत. यातून मराठी साहित्याची आजची स्थिती किती दारुण आहे याची कल्पना येते. 'लमाण'नंतर आपण एकही पुस्तक लिहिणार नाही, असे ते म्हणाले.

बऱ्याच वाचकांना ते आवडले हे लक्षात घेतले पाहिजे म्हणून तर 'लमाण'ची दुसरी आवृत्ती दोन वर्षांमध्ये काढावी लागली, असा खुलासा पॉप्युलर प्रकाशनाच्या रामदास भटकळांनी केला.

'लमाण'सारखे आत्मचरित्र लिहिण्याची इच्छा आहे, 'लमाण' ही एक उत्तम कलाकृती असल्यामुळेच ते आपल्याला अतिशय भावले, असे कर्नाड यांनी सांगितले.

'लमाण' हा नाट्यचळवळीचा केवळ धावता इतिहास नसून ती जिवंत कथा आहे. डॉक्टरी प्रॅक्टिस सोडून आयुष्य रंगमंचासाठी वाहणाऱ्या लागूंमुळे मराठी रंगभूमी समृद्ध झाली आहे, असे गंगाधर गाडगीळ म्हणाले.

### * रमेश देव यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन

''एका बाजूला पैशांची रास ठेवली आणि दुसरीकडे रसिकांच्या टाळ्या, वाहवा; तर सच्चा कलाकार पैशांपेक्षा रसिकांची दाद घेण्यात धन्यता मानेल. माझ्यासाठीही रसिक हाच परमेश्वर आहे. प्रेक्षक हेच माझे सुख आहे,'' अशी भावना ज्येष्ठ अभिनेते रमेश देव यांनी पुणे येथे व्यक्त केली. 'या सुखांनो या' या त्यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन या वेळी झाले.

रमेश देव आणि सीमा देव यांच्या आठवणी आणि त्यांच्यावर चित्रित झालेल्या गाण्यांमुळे हा समारंभ मराठी चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ जागवणारा झाला. भाऊ मराठे यांनी या दांपत्याची मुलाखत घेतली. रंगभूमीवरून पडद्यावर खलनायक म्हणून आणि नंतर नायक म्हणून झालेला प्रवास रमेश देव यांनी सांगितला. राजा गोसावींनी रंगभूमीवर प्रवेशाची संधी दिल्यानंतर केवळ भीतीपोटी ऐन वेळी पळ काढल्याची आठवणही त्यांनी सांगितली. देव दांपत्यावर चित्रित झालेली गाणी सुवर्णा माटेगावकर आणि प्रशांत नासेरी यांनी सादर केली.

विवाहानंतर सीमा देव यांच्यातील अभिनेत्रीची घुसमट होत असल्याचे लक्षात



आल्यावर रमेश देवांनी त्यांच्यासाठी 'या सुखांनो या' हा चित्रपट केला. त्या वेळी गदिमा व बाबूजी यांच्यात वितुष्ट निर्माण झाले होते. रमेश देवांनी दोघांना एकत्र आणून 'या सुखांनो या... एकटी पथ चालले, दोघांना आता साथ द्या' हे गाणे घडवून आणले. देव दांपत्याचा 'सुवासिनी' हा गाजलेला चित्रपट. त्याच्या चित्रीकरणादरम्यान दोघांमध्ये पूर्ण अबोला होता. त्यातील 'हृदयी प्रीत जागते जाणता अजाणता...'; तसेच 'अपराध'मधील 'सूर तेच छेडिता...', 'थकले रे नंदलाला...' या गाण्यांनी प्रेक्षकांना पुन्हा त्या सुवर्णयुगात नेले.

आयुष्यातील यशाचे श्रेय त्यांनी सीमा देव यांना दिले. त्यांच्या आग्रहावरून रसिकांपैकी जान्हवी आपटे, रमा गाजरीकर, सुलभा आगाशे यांच्या हस्ते आत्मचरित्राचे प्रकाशन झाले. या वेळी ज्येष्ठ अभिनेते चंद्रकांत गोखले, श्रीकांत मोघे, दिग्दर्शिका सुमित्रा भावे, जयराम कुलकर्णी, आमदार प्रकाश देवळे, यमाजी मालकर, प्रदीप निफाडकर, ज्ञानेश्वर मुळे उपस्थित होते.

### * टिळक व शाहू छावण्या आजही अस्तित्वात

वेदोक्त प्रकरणानंतर पाहायला मिळालेल्या टिळक व शाहू छावण्या आजही अस्तित्वात असून, काळ बदलल्यामुळे आता त्या उरल्या नाहीत असे मानणे हा भाबडेपणा ठरेल, असे मत हरी नरके यांनी श्रीराम पचिंद्रे यांनी लिहिलेल्या 'शाहू' या कादंबरीवरील चर्चासत्रात व्यक्त केले.

वेदोक्त प्रकरणात टिळक चुकले एवढे म्हणून भागणार नाही, तर त्यांनी शाहू महाराजांच्या विरोधात भूमिका का घेतली हे लक्षात घ्यावे लागेल. तो हितसंबंधांचा लढा होता. त्यामुळे त्यांनी ती भूमिका घेतली होती. पचिंद्रे यांनी आपल्या कादंबरीच्या माध्यमातून मूलभूत प्रश्नांना हात घातला आहे. त्यामुळे ही कादंबरी प्रश्न विचारते आणि अस्वस्थ करते. कोल्हापूरकर असूनही त्यांनी शाहू महाराजांचे उदात्तीकरण केलेले नाही. वेदोक्त प्रकरणात लोकमान्य टिळकांइतका दोषी कोणीही नाही. महाराष्ट्रातील दुर्दैवी आणि दूरगामी परिणाम करणाऱ्या घटनांपैकी ती एक आहे.

शाहूंसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाबद्दल जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणे काही गैरसमज पसरले आहेत. ते पचिंद्रे यांच्या कादंबरीमुळे दूर होतील, असे प्रा. वैजनाथ महाजन म्हणाले.

शाहू महाराजांनी प्रजेच्या मनात स्वाभिमान जागविण्याचे काम केले. त्यासाठी त्यांना स्वकीय आणि परकीय यांच्याशी संघर्ष करावा लागला, असे पचिंद्रे यांनी सांगितले.

### * महाराष्ट्र आणि कर्नाटक... दोन्ही माहेरघरे!

महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाप्रश्नामुळे सध्या या दोन्ही राज्यांमध्ये काहीशी तेढ निर्माण झाली असली तरी पण कानडी-मराठी दोन्ही भाषांवर मनापासून प्रेम करणाऱ्या सुधा मूर्ती यांच्या दृष्टीने ही दोन्ही राज्ये त्यांची माहेरघरेच आहेत.

इडली-सांबारप्रमाणे झणझणीत पिठलं भाकरीही आपल्याला तेवढीच प्रिय आहे, असे उद्‌गार त्यांनी काढले.

इन्फोसिस फौंडेशनच्या अध्यक्षा आणि 'पद्मश्री'ने सन्मानित झालेल्या प्रसिद्ध कन्नड लेखिका सुधा मूर्ती यांना कोथरूडच्या कर्नाटक संघाच्या कार्यालयात रमा हरिहर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देण्यात आले. तसेच श्वेता फौंडेशनच्या 'नितळ' या सिनेमासाठीही सुधाताईंनी डॉ. माया तुळपुळे यांच्याकडे सिटी प्राइड कोथरूड येथे देणगीचा चेक दिला. सिनेमाचे दिग्दर्शकद्वय सुमित्रा भावे, सुनील सुकथनकर, तसेच थिएटरचे भागीदार अरविंद आणि प्रकाश चाफळकर यांच्या उपस्थितीत 'नितळ'च्या पहिल्या शोचे उद्‌घाटन सुधाताईंनी केले.

मूळ गाव धारवाड असले तरी पहिल्या दोन इयत्ता मी बेळगावच्या शाळेत मराठी माध्यमातून शिकले. मूर्तींशी विवाहबद्ध होण्यापूर्वीचे माझे आडनावही कुलकर्णी होते. त्यामुळे ही दोन्ही राज्ये म्हणजे माझी माहेरघरेच आहेत. कर्नाटक-महाराष्ट्र सीमाप्रश्न आपल्या दृष्टीने महत्त्वाचा नाही, असे सुधाताई म्हणाल्या.

१९७४ ते १९७८ या काळात महर्षी अण्णासाहेब कर्वे शिक्षण संस्थेच्या डेक्कन जिमखान्यावरील महिला निवासात आपण राहात होतो, असे सांगून सुधाताई जुन्या पुण्याच्या आठवणींमध्ये रमल्या. पुण्यातल्या नीलायम, मंगला, गुंजन अशा अनेक चित्रपटगृहांमध्ये आपण त्यावेळी अनेक सिनेमे पाहिले. 'प्रभात'चा 'कुंकू', स्मिता पाटीलचा 'उंबरठा' अशा अनेक मराठी, तर अलका चित्रपटगृहात जॅक निकोलसनच्या 'वन फ्ल्यू ओव्हर ककूज नेस्ट' सारख्या इंग्रजी अभिजात सिनेमांनी माझी कलात्मक जाण समृद्ध केली, असे त्यांनी सांगितले. ज्या महिला निवासात आयुष्यातील सर्वाधिक आनंदाची चारपाच वर्षे गेली, त्या कर्वे शिक्षण संस्थेच्या हिंगणे अनाथलयातली एक वास्तू बांधून देऊन तेथील ऋणातून काही प्रमाणात का होईना मुक्त होण्याची इच्छा आहे, असेही त्या म्हणाल्या.

आपल्या लेखनक्षेत्रातील सर्जनशीलतेचा जन्म पुण्यातच झाला असावा, असे सांगून सुधाताई म्हणाल्या की, मेहता प्रकाशनाकडे सुपूर्त केलेले नवे पुस्तक (पुण्यभूमी भारत) त्सुनामी संकट तसेच इतर प्रश्नांवर आधारित आहे. अंगावरील कोड या समस्येवरील 'महाश्वेता' या आपल्या कादंबरीमुळेच 'नितळ'ला मदत करण्याची, तसेच तो पाहण्याची इच्छा होती. ती पूर्ण झाली याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

### * स्त्री साहित्य संमेलन

''महिलांना व्यासपीठ मिळत नाही, हा समज या स्त्री साहित्य संमेलनामुळे दूर झाला,'' असे प्रतिपादन अभिनेत्री मधू कांबीकर यांनी 'स्त्री साहित्य-कला संमेलना'च्या व्यासपीठावरून केले.



संमेलनाचा समारोप कांबीकर यांच्या हस्ते झाला. त्याअंतर्गत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्वानंद महिला संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा कटारिया, उद्योजिका कविता सेठिया उपस्थित होत्या.

कांबीकर म्हणाल्या, ''महिलांनी स्वाभिमान, संस्कार, संस्कृती आणि आपले शिक्षण घेऊन स्वावलंबी व्हावे. समाजाला शिक्षित करून स्वत:बरोबर समाजविकास घडवावा.''

या वेळी उद्योजिका सुलज्जा फिरोदिया-मोटवानी यांना 'स्वानंद उद्योगभूषण' समाजसेविका कमल शिंदे यांना 'स्वानंद महिला भूषण' पुरस्कार तर रत्नमाला राऊत, अश्विनी कुलकर्णी, स्वाती गिलडा, सुजाता पलांडे, डॉ. रजनी सेठ, कुसुम भंडारी, सीमा धाडिवाल, प्राची कुलकर्णी, नीता चोरडिया, जयश्री चव्हाण, डॉ. स्वरूपा पाटील, कमल सुराणा, रसना गांधी-कुशे यांना 'स्वानंद भरारी' पुरस्कार देण्यात आला.

### * वेबसाईटवर विश्वकोश

''राज्य विश्वकोश मंडळाच्या अध्यक्षपदी काम करण्याबद्दल सरकारने विचारले, आपण होकार दिला. कोणी विरोध केला म्हणून आपण काम थांबवणार नाही,'' असा निर्धार विश्वकोश मंडळाच्या नूतन अध्यक्ष डॉ. विजया वाड यांनी व्यक्त केला. विश्वकोशाची वेबसाईट तयार करण्याचे काम चालू असून, ८ मार्चला ती कार्यान्वित होईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

मंडळाचे अध्यक्षपद आपण स्वीकारल्यानंतर काहीजणांनी दिलेले राजीनामे व्यक्तिगत अडचणीतून दिलेले आहेत. डॉ. यु. म. पठाण यांनी दिलेल्या साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदाच्या राजीनाम्याचा आणि आपल्या मंडळाचा काहीही संबंध नाही, चांगले काम करीत असताना विरोध होणारच, असे स्पष्ट करून डॉ. वाड म्हणाल्या की, काम करण्याची संधी मिळत असेल, तर इतरांना वाईट वाटण्याचे काही कारण नाही. कदाचित आपण कोणत्याही राजकीय व साहित्यिक कंपूत नसल्याने असा विरोध होत असावा. अनाकलनीय भाषा वापरणारे ते विद्वान आणि सहज सोपी भाषा वापरणारी मी विद्वान नसावी असा त्यांचा समज असावा, असाही उपरोधिक टोला डॉ. वाड यांनी मारला.

काम करण्याची गुणवत्ता आणि उज्ज्वल शैक्षणिक परंपरा आपल्याकडे आहे. त्यामुळे कामाची भीती कोणी बाळगण्याचे कारण नाही, आपण केवळ बालसाहित्यिक नसून मोठ्यांसाठी ४५ पुस्तके लिहिली आहेत, असेही त्या म्हणाल्या.

विश्वकोशाच्या १७ व्या खंडाचे काम सुरू झाले आहे. कुमारांसाठी कुमार, कन्या व बालकोश निर्माण केला जाणार आहे. त्याचप्रमाणे नकाशाचा खंडही प्रसिद्ध केला जाणार आहे. 'विश्वकोश.ऑर्ग.इन' असा या वेबसाईटचा पत्ता असेल.

ही वेबसाईट १ हजार पानांची आहे. कन्या कोश, बालनाट्यकोश करण्याचेही मंडळाने ठरवले आहे. विश्वकोशामधील काही माहिती कालबाह्य झाल्याने अशी १०० पाने गाळली जातील. त्याचे परिशिष्ट १७ व्या खंडात केले जाईल. या खंडाची ४७१ पाने झाली आहेत, असे त्यांनी सांगितले.

### * भांडारकर– दुर्मिळ पुराणवस्तू आणि पुस्तके...

आयुर्वेद, नगररचनाशास्त्र, ज्योतिषशास्त्र यांसारख्या विषयांवरील लहानात लहान ते मोठ्यात मोठ्या आकारांची महत्त्वाची हस्तलिखिते, दुर्मिळ पुराणवस्तू आणि विविध भाषांतील पुस्तके भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या वतीने आयोजित हस्तलिखित प्रदर्शनात पुणेकरांना पाहायला मिळाली.

राष्ट्रीय पाण्डुलिपी अभियान अंतर्गत भांडारकर संस्थेत हस्तलिखित स्रोत आणि जतन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. भारताच्या सांस्कृतिक वारशाची ओळख करून घेण्यासोठी या केंद्रातर्फे संस्थेच्या आवारात हस्तलिखित प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्राच्यविद्येचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. रा. शा. लोकापूर यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले.

विविध लेखनसाधनांनी लिहिलेली देवनागरी, शारदा, तामिळ, कन्नड, बंगाली, उडिया, चिनी आणि तिबेटी लिपीत लिहिलेली हस्तलिखिते प्रदर्शनात मांडण्यात आली होती. यासोबतच प्राचीन नकाशे, महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीसाठी आधारभूत ठरलेली भूर्जपत्राची काश्मिरी पोथी, तिबेटी झायलोग्राफ प्रकारची पोथीही प्रदर्शनात मांडलेली होती.

### * आर्थिक मदत केवळ घोषणांची

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेला महानगरपालिकेने पाच लाख रुपयांच्या मदतीची घोषणा केली असली तरी संस्थेला आजतागायत एक रुपयाचीही मदत मिळालेली नाही.

भांडारकर संस्थेवर हल्ला झाल्यानंतर तत्कालीन महापौर दीप्ती चौधरी यांनी संस्थेला भेट दिली होती. संस्थेला कुंपण बांधण्यासाठी पालिकेतर्फे पाच लाख रुपये देण्यात येतील अशी घोषणाही त्यांनी केली होती. मात्र अद्याप यापैकी एक रुपयाचीही मदत संस्थेपर्यंत आली नसल्याचे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था नियामक मंडळाचे सदस्य शाम सातपुते यांनी सांगितले.

### * पीटर ड्रकर यांचे विचार जगाला नवीन दृष्टी देणारे

पूर्वीच्या आधारभूत आणि पारंपरिक विचारांना बाजूला सारून डॉ. पीटर ड्रकर यांनी व्यवस्थापनात आणलेले विचार जगाला नवीन दृष्टी देणारे, तसेच भविष्य जाणण्याची क्षमता असणारे होते, असे मत ज्येष्ठ व्यवस्थापनतज्ज्ञ शरू रांगणेकर यांनी व्यक्त केले.



टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आणि आयएसटीडी यांच्या वतीने डॉ. पीटर ड्रकर यांच्याविषयीच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. दीपक टिळक अध्यक्षस्थानी होते. समन्वयक डॉ. एस. जी. बापट, विद्यापीठाचे कुलसचिव उमेश केसकर या वेळी उपस्थित होते.

औद्योगिक क्रांतीनंतर तंत्रज्ञानातील बदल मानवाने आत्मसात करणे गरजेचे आहे, असे सांगून रांगणेकर म्हणाले की, स्वत:च्या कौशल्याने तंत्र विकसित करणाऱ्या सहकाऱ्यांना डॉ. ड्रकर यांनी 'नॉलेज वर्कर' ही संज्ञा दिली असून, त्यांनी विशद केलेले सध्याच्या आणि भविष्यातील व्यवस्थापनाचे स्वरूप अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे, असे त्यांनी नमूद केले.

'पीटर ड्रकर यांचे व्यवस्थापनातील योगदान' या विषयावर डॉ. मुकुंद रानडे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवादाचेही आयोजन करण्यात आले.

डॉ. एस. जी. बापट, डॉ. व्ही. व्ही. भाटे, डॉ. बी. एच. अगलगट्टी, डॉ. शरद जोशी हे त्यामध्ये सहभागी झाले होते.

व्यवस्थापनविषयक संस्थांच्या सुमारे ३० विद्यार्थ्यांसाठी ड्रकर यांच्या कार्यावर आधारित स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्याची पारितोषिके टिळक यांच्या हस्ते देण्यात आली.

### * साहित्य संस्कृती मंडळ अध्यक्षपदाचा राजीनामा

संतवाङ्मयाचे अभ्यासक डॉ. यू. म. पठाण यांनी राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद स्वीकारण्यास असमर्थतता दर्शविणारे पत्र मुख्यमंत्र्यांना पाठवले.

नागपूर अधिवेशनाच्या काळात विश्वकोश मंडळ व साहित्य संस्कृती मंडळांची पुनर्रचना करण्यात आली. परंतु डॉ. पठाण यांनी मात्र नियुक्ती करण्यापूर्वी सांस्कृतिक खात्याकडून साधी विचारणाही न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. संमेलनाचे अध्यक्षपद, बऱ्याच विद्यापीठांची सन्माननीय डॉक्टरेट असे सन्मान मिळालेले आहेत. यावेळी प्रकृतीच्या कारणास्तव आपण पुरेसा वेळ देऊ शकणार नाही, असे डॉ. पठाण यांनी कळविले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### * बाळकृष्ण रेणके

भटक्या विमुक्त जातीजमातींच्या विकासासाठी केंद्र सरकारने अलीकडेच स्थापन केलेल्या आयोगाच्या अध्यक्षपदी बाळकृष्ण रेणके यांची निवड झाली आहे. भारतातील जवळजवळ सर्व प्रांतांत भटक्याविमुक्त जातीजमाती अस्तित्वात आहेत, आणि त्यांच्या प्रश्नांसंबंधी कामेही चालू आहेत हे लक्षात घेता हा मान महाराष्ट्राला मिळाला हे या राज्यात सातत्याने गेली पंचवीस वर्षे नेटाने चाललेल्या चळवळीचे यश आहे असेच म्हटले पाहिजे. १९८० च्या सुमारास लक्ष्मण माने यांचे 'उपरा' हे पुस्तक आले आणि केवळ साहित्यिक वर्तुळातच नव्हे, तर

महाराष्ट्राच्या एकूणच समाजजीवनात मोठी खळबळ माजली. त्याआधीचे दशक आंबेडकरी प्रेरणेने लिहिल्या गेलेल्या गावकुसाबाहेरील विषमतेच्या दर्शनाने ढवळून निघालेले असताना गावकुसातही जागा नसलेल्या, गावोगाव पालं टाकून वणवणणाऱ्या भटक्यांचे हे जग समोर आले. माने यांच्याप्रमाणेच रेणके हेही सोलापूरचेच. ब्रिटिशांनी गुन्हेगारीचा शिक्का मारून तारांच्या कुंपणांत बंदिस्त झालेली जी सेटलमेंट्स उभारली होती त्यांचा प्रभाव भारतीय समाजावर आजही आहे नि भटक्या-विमुक्तांची पाहणी आणि त्याआधारे केलेली प्रश्नाची मांडणी महत्त्वाची ठरली. एका जागी थांबण्याची सवयच नसलेल्या भटक्यांची संघटना बांधणे ही मोठी अवघड बाब. त्यात भटक्यांच्याही अनेक जातीजमाती. तितक्याच त्यांच्या चालीरीती. ही सगळी मोट बांधायची तर त्यासाठी त्या माणसांविषयी आस्था नि संघटनाबांधणी ही निष्ठेची तसेच बांधिलकीची बाब असायला हवी. अनेकदा असे दिसते, की आस्था असते पण संघटनाबांधणीची चिकाटी नसते. रेणके यांचे वैशिष्ट्य हे की कोणत्याही पदाची किंवा प्रसिद्धीची अपेक्षा न करता ते ही सर्व कामे करीत राहिले. मधल्या काळात मानेंबरोबरची त्यांची वाटचाल सुटी झाली, रस्ते बदलले, पर्यायाने संघटनांचे बॅनरही बदलले. रेणकेंची स्वत:ची संस्था अस्तित्वात आली. 'परममित्र' नावाचे वेगळे नियतकालिक आले. रचनात्मक कामाला रेणकेंनी प्राधान्य दिले. जागतिकीकरणाच्या बदलत्या काळात भटक्या-विमुक्तांना तगून राहण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींवर त्यांनी लक्ष केंद्रित करावयाचे ठरवले आहे. सामाजिक आणि आर्थिक सतरावर आजही कफल्लक असलेल्या भटक्या-विमुक्तांपर्यंत केवळ शिक्षण पोहोचून उपयोगी नाही, कौशल्येही आत्मसात व्हावी असा त्यांचा हेतू आहे. शेती, पाणी, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन अशा मुद्द्यांवर विविध सहकारी संस्थांच्या साहाय्याने त्यांचे प्रयोग चालू आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांना ही संधी मिळाली आहे ही आश्वासक बाब म्हणायला हवी.

### * रोहिदास साहित्य संमेलन

नव्या पिढीतील तरुण-तरुणींनी लेखनासाठी प्रोत्साहित करावे म्हणजे चर्मकार समाजातही नवीन साहित्य निर्माण होईल, असे मत संत रोहिदास साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. आ. कारंडे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्रीय चर्मकार संघाच्या जिल्हा शाखेतर्फे पिंपरीतील एच. ए. सांस्कृतिक भवनात आयोजित संमेलनाचे उद्‍घाटन माजी मंत्री बबनराव घोलप यांच्या हस्ते झाले. संमेलनाचे निमंत्रक ज्ञानेश्वर कांबळे, जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, हरिभाऊ इसवे, गोरोबा गुजर, भानुदास इसवे, आनंद गवळी आदी उपस्थित होते.

कारंडे म्हणाले, पारतंत्र्याच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका व संघटित व्हा आणि संघर्ष करा, असा संदेश दिला होता. शिक्षणाच्या जोडीने त्यांनी दलित समाजात राजकीय जागृतीदेखील केली. डॉ. आंबेडकरांनी लिहिलेला



एक ग्रंथ संत रोहिदास, संत कबीर व महात्मा ज्योतिबा फुले यांना अर्पण केला आहे, असेही ते म्हणाले.

घोलप म्हणाले, समाजबांधवांच्या संघटनांसाठी या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. चर्मकार समाजाचा इतिहास सर्वांना माहिती व्हावा, यासाठी समाजाशी संबंधित कथा, अडचणी साहित्यातून मांडाव्यात. समाजातील अनेक बांधव गरिबीचे जीवन जगत आहेत.

सुलोचना बोबडे (आदर्श माता), नामदेव थोरात (कार्यकर्ता), किसन हेळकरे (गुणवंत कामगार), अशोक पटेकर, प्रा. दत्तात्रय शिंदे (शिक्षक), मंगला कांबळे (रोहिदास प्रबोधन पुरस्कार) यांचा सत्कार करण्यात आला. संमेलनापूर्वी संत रोहिदास ग्रंथदिंडीची मिरवणूक काढण्यात आली.

### * संमेलनात पुस्तक प्रकाशित करण्याचे 'शुल्क' ५०० रुपये!

नाशिककरांचा कित्ता गिरवत सोलापूरकरांनीही यंदा, साहित्य संमेलनात पुस्तक प्रकाशित करायचे असेल तर ५०० रुपये भरा, असा फतवा काढला होता.

दरवर्षी अनेक हौशी, तरुण लेखक तसेच प्रकाशक संमेलनात जमतात आणि संमेलनाच्या अध्यक्षांनी आपल्या पुस्तकाचे प्रकाशन करावे, अशी इच्छा बाळगतात. पण गेल्या वर्षी नाशिक आयोजन समितीने प्रत्येक पुस्तकाच्या प्रकाशनासाठी ५०० रुपये मागितले. त्याचाच कित्ता गिरवत सोलापूर संयोजन समितीनेही पुस्तक प्रकाशनाची विनंती करणाऱ्या सर्वांना लेखी पत्र पाठवून रोख पैसे भरा किंवा चेक/ड्राफ्ट काढा, असे फर्माविले.

या शुल्काबद्दल आपल्याला फक्त (खरेतर संमेलनासाठी तयार असलेलाच) हॉल मिळेल, बाकी व्यवस्था करावी लागेल, अशी लेखी ताकीदही या पत्रात होती. लक्षावधी रुपये गोळा करणाऱ्या संयोजनकांनी प्रकाशनाचे पैसे का घ्यावेत, असा प्रश्न लेखक-प्रकाशकांना पडला. अनेक मासिके/नियतकालिके साहित्य संमेलनाच्या निमित्ताने खास अंक काढतात. सोलापूरच्या 'आशय'ने यंदा असा विशेषांक काढला. मुंबईचे 'वसंत' मासिक अनेक वर्षे विशेषांक काढते. दरवर्षी त्याचे प्रकाशन अध्यक्षांनी करायचे, अशी रीत. पण त्यांच्याकडेही पैसे मागण्यात आले.

एक माजी अध्यक्ष म्हणाले की, अध्यक्षांकडे प्रकाशन करण्यासाठी पुस्तकांची रांग लागते. त्यात वेळही खूप जातो. ऐनवेळी अनेकजण शिरतात. त्यांनाही नाराज करता येत नाही. पण यावर पैसे घेणे हा उपाय नाही.

### * बेळगावची घटना क्लेशकारक

''बेळगावच्या महापौरांवर झालेला हल्ला अन्यायकारक होता. सर्व कन्नड साहित्यिकांनी त्याचा निषेध केला होता. या प्रकारच्या 'ठोकशाही'विरुद्ध पुलंनी आवाज उठवला होता; पण सध्या दुर्दैवाने हाच प्रकार वाढतोय,'' अशी खंत

गिरीश कर्नाड यांनी व्यक्त केली. बेळगावमध्ये झालेल्या घटनेबद्दल कन्नड साहित्यिकांकडून कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न झाल्याचा पडसाद मराठी साहित्य आणि नाट्य संमेलनामध्ये उमटला. मात्र, तो चुकीच्या समजुतींवर बेतलेला असल्याचे सांगून श्री. कर्नाड म्हणाले, ''महापौरांवर झालेल्या हल्ल्याचा निषेध कन्नडमधील सर्व लेखकांनी व्यक्त केला होता. महाराष्ट्रामध्ये चाहते आहेत म्हणून निषेध नोंदवला पाहिजे असा विचार चुकीचा आहे.''

### * साहित्य-संस्कृतीच्या 'संपलेल्या विषयाची कहाणी'

१ जुलै २००४ या दिवशी साहित्य संस्कृती महामंडळाच्या अध्यक्षपदावरून तडकाफडकी पायउतार व्हावे लागलेल्या प्रा. रा. रं. बोराडे यांना झालेला अपमान इतका जिव्हारी लागला की, त्यानंतर त्यांनी 'एका संपलेल्या विषयाची कहाणी' नावाचे एक प्रकरणच लिहून काढले... हे छापील तीस-बत्तीस पाने भरतील एवढ्या लांबीचे प्रकरण प्रकाशकाच्या प्रतीक्षेत पडून आहे. महामंडळाच्या पावणेचार वर्षांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत केलेल्या कामाचा आणि आलेल्या अनुभवांचा लेखाजोखा, असे या पुस्तिकेचे स्वरूप आहे. 'मराठ्यांची प्रशासनव्यवस्था' या पुस्तकातील मजकुरामुळे चिघळलेले व अपमानास्पद पदच्युतीनंतरच शमलेले प्रकरण त्यांना अस्वस्थ करते. ते म्हणाले, विचारवंतांचे आवाज क्षीण होतात, तेव्हा सांस्कृतिक पडझड होते. कोणा एका व्यक्तीचे नुकसान माझ्यालेखी महत्त्वाचे नाही, ही पडझड होत असल्याचे दु:ख मोठे आहे.

या लेखनात व्यक्तिगत उल्लेख किंवा हेत्वारोपही नाहीत, तटस्थपणे सर्व गोष्टी मांडल्या आहेत, असे प्रा. बोराडे म्हणाले. महामंडळावर नेमणूक करताना सरकार पूर्वसंमती घेत नाही हे योग्य आहे का, असे विचारता ते म्हणाले, अहो आम्हीच लाचारासारखे नेमणुकीसाठी रांगेत उभे असलो तर त्यांना पूर्वसंमती घ्यायची गरज काय? विश्वकोश मंडळाच्या अध्यक्षपदी आज तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी असते, तर त्यांनाही प्रभावीपणे काम करता आले नसते. तिथे प्रशासकीय क्षमता असलेला आणि फील्डवर्क करणारा माणूसच आज हवा आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### * व्यंगचित्रकलेचे महत्त्व

''कमीत कमी शब्दांत आशय व्यक्त करणे हे व्यंग्यचित्रकाराचे काम आहे. या कलेला साहित्याचाच दर्जा आहे,'' असा सूर मान्यवर व्यंगचित्रकारांच्या चर्चेतून निघाला. व्यंगचित्रात शब्द असावेत की नाही, हा मुद्दा गौण आहे, असे मत हास्यचित्रकार वसंत सरवटे यांनी व्यक्त केले; तर व्यंगचित्र अधिक स्पष्ट होण्याकरिता शब्दांची आवश्यकता आहे, असे मंगेश तेंडुलकर यांचे म्हणणे होते. 'पुलोत्सवा'मध्ये झालेल्या या चर्चेत शि. द. फडणीस, विकास सबनीस आणि खलील खान



यांनीही भाग घेतला.

सरवटे म्हणाले, ''व्यंगचित्रे म्हणजे वेडीवाकडी चित्रे असा गैरसमज असला, तरी वरवर सोपी वाटणारी ही कला अत्यंत अवघड आहे. ती चित्रकलेतील वरची पायरी असून ललित साहित्याइतकीच दर्जेदार आहे. चांगले व्यंगचित्र येण्यासाठी चित्रकलेचे अचूक ज्ञान हवे.''

फडणीस म्हणाले, ''लहानपणी शाळेत असताना शिक्षक चित्र बिघडू देऊ नको, असे सांगत. मात्र, या क्षेत्रात आलो आणि पूर्णपणे बिघडलो. दृश्य माध्यमाची ही भाषा आव्हानात्मक आहे.''

तेंडुलकर म्हणाले, ''जीवनाच्या वाटचालीत जे जे सापडले, ते लोकांपर्यंत न्यावेसे वाटले. आपण जगतो ते आयुष्य खरे की विसंवादाने भरलेले व्यंगचित्र खरे असा प्रश्न सतावत होता. नेमकी हीच विसंगती मी टिपली.''

सबनीस म्हणाले, ''उत्तम व्यंगचित्र काढणे हे आमचे तहहयात व्यसन आहे. व्यंगचित्र काढल्याशिवाय आम्हाला चैनच पडत नाही.''

### * कोमसातर्फे पहिले महिला साहित्य संमेलन

मराठीतील थोर साहित्यिका मालतीबाई बेडेकर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे पहिले महिला साहित्य संमेलन मु. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड येथे ११ व १२ फेब्रुवारी २००६ रोजी घेण्यात आले. मालतीबाई बेडेकर कोकणात जन्मल्या तरी त्यांच्या वाङ्मयीन विचारांचा प्रभाव संपूर्ण महाराष्ट्रातील महिला साहित्यिकांवर पडलेला होता व त्याचाच प्रभाव म्हणून आजची मराठी साहित्यिका नव्या भानाने, नव्या मूल्य विचाराने महत्त्वपूर्ण लेखन करीत आहे. यासाठी मालतीबाईंचे कृतज्ञ स्मरण या संमेलनाच्या माध्यमातून केले गेले.

संमेलनाध्यक्ष लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर होत्या. दिंडी झाल्यानंतर संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष व मुंबईच्या माजी महापौर निर्मला सामंत प्रभावळकर यांच्या हस्ते झाला. गिरिजा कीर यांच्या अध्यक्षतेखाली झालेला कथाकथनाचा कार्यक्रम माधवी घारपुरे, वैशाली पंडित, मंजिरी महादळकर यांचा सहभाग होता.

कवयित्री संमेलनात उषा मेहता, नीरजा, प्रज्ञा लोखंडे, सिसिलिया कार्व्हालो, कविता महाजन, ललिता बांठिया, सरोज जोशी, दमयंती भोईर, मीनाक्षी तांडेल, स्वाती ठकार, सुप्रिया दाभोळकर, ज्योती कपिले आदींचा सहभाग होता. मंगला आठलेकर यांच्या अध्यक्षतेखाली 'स्त्री साहित्याची वाटचाल आणि अपेक्षा' या विषयावर परिसंवाद झाला. प्रा. ज्योतिका ओझरकर, डॉ. पुष्पा राजापुरे तापस, प्रार्थना सदावर्ते, वृषाली मगदूम, नीरजा, प्रज्ञा लोखंडे यांचा यात सहभाग होता.

## * इरावती कर्वे विशेषांक

मानववंशशास्त्राचा अभ्यास हा व्यापक परीघ आहे. अनेक सामाजिक समस्या सोडवण्यासाठी त्याचा कल्पकतेने उपयोग करता येईल, असे विचार ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र मानवविज्ञान परिषदेच्या वतीने 'हाकारा' या नितयकालिकाच्या 'डॉ. इरावती कर्वे स्मृती विशेषांका'चे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार डॉ. शरच्चंद्र गोखले यांच्या हस्ते करण्यात आले. मराठवाडा मित्रमंडळाचे प्राचार्य भाऊसाहेब जाधव, परिषदेचे अध्यक्ष रा. के. मुटाटकर, ग. शां. पंडित उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, इरावती कर्वे यांनी केलेले मानववंशशास्त्रातील संशोधन मूलभूत आहे. त्यांच्या या संशोधनाचा आजच्या काळात अधिकाधिक उपयोग करून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही संस्कृतीच्या बांधणीसाठी भूगोलाचा अवकाश लागतो. भूगोल हा संस्कृतीचा गर्भ आहे. ज्ञानाची परंपरा हे संस्कृतीचे लक्षण असते.

ज्ञानपरंपरा ओळखणारा समाज निर्माण होणे महत्त्वाचे असते. वर्तमानकाळापुरता जगणारा आजचा समाज या पार्श्वभूमीवर सुसंस्कृत कसा ठरणार? संस्थानिर्मिती करण्यात मराठी माणूस नेहमी पुढे असतो; पण संस्था दीर्घकाळ टिकावी यासाठी पायाभरणी करण्यात तो कमी पडतो, महाराष्ट्रात विद्वत्ता भरपूर असली तरी 'व्हिजन' देणारा माणूस नाही, या सर्व गोष्टींचे भान देण्याचे कार्य इरावती कर्वे यांनी केले आहे, असे ते म्हणाले. मुटाटकर यांनी प्रास्ताविकात इरावती कर्वे यांच्या कार्याचा आढावा घेतला.

## * भारतीय स्त्री साहित्याचा मागोवा

भारतीय भाषांतील स्त्री-साहित्याचा मागोवा घेण्याचे काम साहित्यप्रेमी भगिनी मंडळाने हाती घेतले आहे, अशी माहिती डॉ. मंदा खांडगे यांनी दिली. घटनेने मान्यता दिलेल्या सर्व २२ भारतीय भाषांतील स्त्री-साहित्याचा मागोवा मंडळ घेणार असून, त्यासाठी अन्य भाषांतील स्त्री-साहित्याचा मागोवा मंडळ घेणार असून, त्यासाठी अन्य भाषांतील लेख येण्यास सुरुवात झाली आहे. यापूर्वी मंडळाने मराठी स्त्री-साहित्याचा मागोवा घेतला होता.

मराठीची पीछेहाट होतेय, असे वाटत नसल्याचे सांगून डॉ. खांडगे म्हणाल्या, ''मात्र मराठीला व्यवहारात दुय्यम स्थान मिळतेय. नुकताच झालेला मराठी पाट्यांचा बदल एक स्वागतार्ह गोष्ट आहे. हुजूरपागेचा शालेय साहित्य संमेलनाचा हा उपक्रम स्तुत्य आहे. तो पुण्यातील सर्व शाळांनी मिळून राबवण्यास हरकत नाही. प्रत्येक विद्यार्थिनीने स्वत:चे ग्रंथालय तयार करावे. त्याकरिता गटागटाने पुस्तके खरेदी करावीत. मुलांवरील अभ्यासाचे ओझे वाढते आहे, त्यामुळे दमून-भागून घरी परतल्यावर त्यांना हॅरी पॉटरच वाचायला आवडेल; साने गुरुजींचे साहित्य नाही. हॅरी पॉटरची जाहिरातबाजी खूप झाली आणि त्यातून लेखक-प्रकाशकांनी कोट्यवधी डॉलर्स कमावले. तुलनेने आपल्याकडे बालसाहित्यिकांना मानधन कमी मिळते.''



## * किर्लोस्कर मासिक– १००० अंकांची मजल

वैचारिक वादळ उठविण्याचे सामर्थ्य असणाऱ्या तरुण पिढीच्या जडणघडणीचे काम वर्षानुवर्षे करणारे व नव्या विचारांचा अंगीकार करायला शिकविणारे मासिक म्हणून किर्लोस्कर मासिक आजपर्यंत प्रभावी ठरले आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांनी व्यक्त केले.

किर्लोस्कर मासिकाच्या १००० अंकांच्या प्रदर्शनाचे प्रकाशन द. मा. मिरासदार, संदीप खरे व डॉ सलील कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. किर्लोस्कर मासिकाचे ४० वर्षे संपादक असलेले मुकुंदराव किर्लोस्कर उपस्थित होते.

संदीप खरे व डॉ. सलील कुलकर्णी या तरुण कलाकारांनी त्यांच्या 'आयुष्यावर बोलू काही' या कार्यक्रमाच्या निमित्ताने येणारे अनुभव किस्से सांगितले.

''एवढे नाजूक आहे वय तुझे माझ्या फुला, रंगदेखील पाकळ्यांवर भार वाटू लागले'' अशा तरुणाईच्या हुंकाराची कविता आणि मनाने चिरतरुण असणाऱ्यांच्या मनातील भावनांना कवितेच्या सादरीकरणातून साद घातली. किर्लोस्कर अंक, शंकरराव किर्लोस्कर यांची व्यंगचित्रे व किर्लोस्कर मासिकाची मुखपृष्ठे यांचे प्रदर्शन पुणे मराठी ग्रंथालयाच्या सभागृहात भरविण्यात आले होते.

## * पुणे शहराचे 'दिनविशेष'

प्रसिद्धी माध्यमांनाच नव्हे तर सर्वसामान्य पुणेकरांनाही उपयुक्त ठरेल असा शहराची सर्वांगीण माहिती देणारा 'दिनविशेष' हा ग्रंथ डॉ. शां. ग. महाजन यांनी तयार केला आहे. डॉ. प्र. ल. गावडे यांच्या हस्ते १५ फेब्रुवारी रोजी त्याचे प्रकाशन झाले.

महत्त्वाच्या घटना आणि वर्षभर पाळण्यात येणारे विविध आंतरराष्ट्रीय दिन ही सर्व माहिती गोळा करण्यासाठी केसरी मराठा ग्रंथालय, जयकर ग्रंथालय, एस.एन.डी.टी. विद्यापीठ ग्रंथालय, ब्रिटिश लायब्ररी आणि आबासाहेब गरवारे कॉलेज ग्रंथालयांचा उपयोग झाल्याचे महाजनांनी नमूद केले. या ग्रंथासाठी पालिकेने पुणे शहर ज्ञानकोश प्रतिष्ठानला ५० हजार रुपयांची देणगी दिली.

## * महिला साहित्य संमेलन

''पर्यावरण आणि स्त्रीहितरक्षण या मानवी सुखाचा पाया असलेल्या गोष्टी आजच बाजारीकरणाने धोक्यात आल्या आहेत. अशावेळी गोंधळलेल्या मध्यम आणि उच्च मध्यमवर्गीय स्त्रीने आत्मसंतुष्टतेच्या कोषातून बाहेर येऊन आम स्त्रीला साथ देण्याची वेळ आली आहे,'' असे प्रतिपादन लोक वाङ्मयाच्या

अभ्यासक आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांनी कोकण मराठी साहित्य परिषदेच्या पहिल्या महिला साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना केले.

अलिबागजवळ आवास या विख्यात साहित्यिका मालतीबाई बेडेकर यांच्या जन्मगावी ११ आणि १२ फेब्रुवारी रोजी 'कोमसाप'चे महिला साहित्य संमेलन अपूर्व उत्साहात साजरे झाले. बाबासाहेब नाझरे हायस्कूलच्या प्रांगणात मालतीबाई बेडेकर साहित्य नगरी उभारण्यात आली होती. मुख्य प्रवेशद्वाराला दुर्गाबाई भागवत, यांचे, तर व्यासपीठाला इरावती कर्वे यांचे नाव देण्यात आले होते. स्त्री संतांचे साहित्य असलेल्या पालखीच्या जोडीला मालतीबाई, सावित्रीबाई फुले, कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे यांच्या साहित्याने सुशोभित झालेली पालखी घेऊन निघालेल्या दिंडीचे आवास ग्रामस्थांनी जोरदार स्वागत केले. संमेलनाच्या स्वागताध्यक्षा रेखा नार्वेकर यांनी, हे संमेलन म्हणजे पुरुषद्वेष्टेपण नव्हे, किंवा वेगळी चूल मांडण्याचा प्रयत्नही नव्हे, असे स्पष्ट केले. 'विभावरी' स्मरणिकेचे डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते यावेळी प्रकाशन करण्यात आले. त्या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की, स्त्रीला शरीर, मन व बुद्धिवरच्या आपल्या अधिकाराचे सन्मानाने जतन करण्यासाठी नवीन पायाभूत व्यवस्था निर्माण करावी लागेल. त्यासाठी समविचारी पुरुषांची संख्या वाढवून त्यांची साथ मिळवावी लागेल. संमेलनाचे उद्घाटन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा निर्मला सामंत प्रभावळकर यांच्या हस्ते झाले.

संमेलनात झालेल्या कथाकथन कार्यक्रमात माधवी घारपुरे, वैशाली पंडित, मंजिरी महादळकर या लेखिकांनी कथा सादर केल्या. ज्येष्ठ कथालेखिका गिरिजा कीर या सत्राच्या अध्यक्ष होत्या. डॉ. ज्योती लांजेवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनात उषा मेहता, नीरजा, उज्ज्वला केळकर, अनुपमा उजगरे, नीलम माणगावे, कविता बांठिया वगैरे कवयित्रींनी भाग घेतला. दुसऱ्या दिवशी बहिणाबाई कविकट्ट्याचे आयोजन केले होते.

दुसऱ्या दिवशी शोभा डे यांची वासंती वर्तक यांनी घेतलेली मुलाखत रंगली. 'स्त्री साहित्याची वाटचाल आणि अपेक्षा' या विषयावर परिसंवाद झाला. 'आयदान'कार उर्मिला पवार, नंदिनी पालशेतकर, डॉ. मीना प्रभू, सुरेखा दळवी यांचे अनुभवकथन श्रोत्यांना अंतर्मुख करून गेले.

### * संसद ग्रंथालयाचा 'खजिना' अभ्यासक, संशोधकांना खुला

लाखो ग्रंथ, महत्त्वाची कागदपत्रे व सभागृहातील चर्चेच्या नोंदी असा समृद्ध दस्तऐवज असलेल्या संसद ग्रंथालयाचा खजिना अभ्यासक व संशोधकांसाठी आता खुला झाला आहे.

संसदेच्या ग्रंथालयातील पुस्तके व दस्तऐवज यांची संख्या तब्बल सव्वा लाख आहे.

संसद ग्रंथालयाच्या नियमावलीनुसार फक्त संसद सदस्य व सचिवालयातील अधिकारी यांनाच या ग्रंथालयाचा उपयोग करता येतो. परंतु लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चटर्जी यांनी यात बदल केला असून, या समृद्ध ग्रंथालयाचा लाभ संशोधकांनाही करून देण्याचे ठरविले आहे.

लोकसभा सचिवालयातर्फे पुणे-मुंबईसह देशभरातील महत्त्वाच्या शिक्षणसंस्थांना यासंदर्भात पत्र पाठविण्यात आले आहे.

विहित नमुन्यात अर्ज केल्यास १५ दिवस हे ग्रंथालय संशोधकांना वापरता येऊ शकेल. यापूर्वी अगदी अपवादात्मक परिस्थितीत व अधिवेशन नसतानाच्या काळातच संशोधकांना या ग्रंथालयाचा उपयोग करता येत होता. परंतु आता ही अटही काढून टाकली आहे.

www.parliamentoflIndia.nic.in या वेबसाइटवर विहित नमुन्यातील अर्ज मिळू शकेल. सात दिवसांसाठी सुरुवातीला पास मिळेल व नंतर त्यास मुदतवाढ मिळू शकेल.

❒

**मेहता मराठी ग्रंथजगत**
**दि रजिस्ट्रेशन ॲक्ट ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल रूल्स : १९५६)**
**नियम क्र. ८ अन्वये निवेदन फॉर्म ४**

१) प्रकाशन स्थळ : मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१ सदाशिव पेठ, पुणे ३०.
२) प्रकाशन काल : मासिक
३) मुद्रक, प्रकाशक व संपादक : सुनील अनिल मेहता, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ३०
४) प्रकाशनाची मालकी : सुनील मेहता, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ३०.
५) राष्ट्रीयत्व : भारतीय
मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो, की वर दिलेला तपशील माझ्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे बरोबर आहे.

दि. १.३.२००६

सुनील मेहता
प्रकाशक

विशेष वार्ता

# पद्मश्री सुधा मूर्ती यांची 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ला स्नेहभेट

इन्फोसिस फौंडेशनच्या अध्यक्षा, प्रख्यात कन्नड लेखिका आणि समाजसेविका सुधा मूर्ती यांनी दिनांक २ फेब्रुवारी रोजी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ला स्नेहभेट दिली. 'पुण्यभूमी भारत' या श्रीमती मूर्ती यांच्या आगामी पुस्तकाचे हस्तलिखित प्रदान करणे हा या स्नेहभेटीमागील प्रमुख उद्देश होता.

श्रीमती सुधा मूर्ती यांना त्यांच्या समाजकार्याबद्दल भारत सरकारतर्फे नुकताच पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. सदर पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्या प्रथमच पुण्यात आल्या होत्या. त्यानिमित्ताने त्यांची भेट घेण्यासाठी पुण्यातील साहित्यप्रेमींनी, वाचकांनी आणि पत्रकारांनी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'मध्ये मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.



**'पुण्यभूमी भारत'** या आगामी पुस्तकाचे हस्तलिखित प्रदान करताना मा. सुधा मूर्ती. डावीकडून सुनील मेहता, मा. लीना सोहोनी, मा. सुधा मूर्ती, अनिल मेहता.



मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मा. सुधा मूर्ती यांचे प्रकाशक-लेखक या नात्याने ऋणानुबंध जोडले गेले आहेत. त्यांची 'महाश्वेता', 'वाईज अँड अदरवाईज' आणि 'गोष्टी माणसांच्या' ही लोकप्रिय पुस्तके 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे प्रकाशित करण्यात आली आहेत. सुधा मूर्ती लिखित आणि मा. लीना सोहोनी अनुवादित 'वाईज अँड अदरवाईज' या पुस्तकाला नुकताच महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

श्रीमती मूर्ती यांचे 'The old man & his God discovering the spirit of India' हे आगामी पुस्तक 'पुण्यभूमी भारत' या शीर्षकाने प्रकाशित होणार आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना सुधा मूर्ती यांनी आयुष्यात आलेले विविध अनुभव व संस्मरणीय गोष्टींना उजाळा दिला. इन्फोसिस फौंडेशनच्या निमित्ताने देशभर प्रवास करता आला. सर्व स्तरावरील लोकांशी संवाद साधताना देशातील समाजजीवनाचे प्रतिबिंब जाणून घेता आले आणि तेच लेखनरूपाने प्रकटले. 'पुण्यभूमी भारत'च्या लेखनामागे इन्फोसिस फौंडेशनची प्रेरणा व प्रोत्साहन असल्यामुळे हे पुस्तक फौंडेशनलाच समर्पित केले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

सौ. लीना सोहोनी या माझ्या पुस्तकांचे मराठीत अनुवाद करतात, माझ्या भावना अगदी योग्यपणे जाणून घेत असल्यानेच त्यांचा अनुवाद माझ्या लेखनाशी जुळलेला आहे. बहुधा त्यामुळेच मराठीतल्या माझ्या पुस्तकांचा खप इतर भाषांतील अनुवादित पुस्तकांपेक्षा अधिक असावा, असे त्यांनी सौ. लीना सोहोनी यांचे कौतुक केले, तसेच 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची वेबसाईट देखील मोठ्या उत्सुकतेने पाहून मराठी प्रकाशनविश्वात 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने घेतलेल्या भरारीबद्दल गौरवोद्गार काढले.

'पुण्यभूमी भारत' हे पुस्तक ऑक्टोबरमध्ये प्रकाशित होईल अशी माहिती अनिल मेहता यांनी दिली.

## मोहिनी

**पारू नाईक**

**मराठी साहित्यक्षेत्रात ही कादंबरी आपल्या वेगळ्या विषयमांडणीमुळे लक्षवेधी ठरेल असे वाटते**

**डॉ. आनंद यादव**




**'मोहिनी'** खानदानी संस्कारांनी संपन्न असलेली स्त्री. पती प्रतापरावांसमवेत पारंपरिक संस्कार, जीवनमूल्ये जपत मनसोक्त आनंद व सुख उपभोगत असते.
मोहिनीला एकापाठोपाठ एक अशा दोन मुलीच होतात. मग इनामदारांच्या वंशाला वारस कोण...?
मोहिनीच्या मनात हे भय खोलवर रुजते. कारण त्यामुळे तिची प्रतिष्ठा पणाला लागते. तिच्या भावी जीवनाचे अस्तित्व त्यावर अवलंबून राहते.
बऱ्याच कालावधीनंतर तिला मुलगा होतो मात्र तो अल्पायुषी ठरतो. त्यामुळे मोहिनी स्क्रिझोफ्रेनियाने ग्रस्त होते.
मनोरुग्ण नायिकेचे रंगरूप उलगडून दाखवणारी पारू नाईक यांची पहिलीच स्वतंत्र कलाकृती.





# शिक्षणाने माणसाला वाचायला शिकविले परंतु काय वाचावे हे शिकविले नाही. ही उणीव येथे भरून निघेल

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

(**सौजन्य :** राजीव जाधव, शीला पल्लडवार)




## प्रीती, क्रांती आणि हिरवा चाफा यांना सामावून घेणारी खांडेकरांची नवजागृत नायिका

वाडवडील आणि रूढीनीती यांचा बडिवार न मागवता प्रीती आणि क्रांती यांच्या वाटेवर निर्भयपणे जाणारी नायिका, सुलभा ही केंद्रस्थानी असणारी 'हिरवा चाफा ही वि. स. खांडेकर यांची पाचवी कादंबरी प्रथम १९३८ साली प्रकाशित झाली. तिची अकरावी आवृत्ती नुकतीच मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे बाजारात आली आहे.

सत्तर वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या या कादंबरीच्या कथानकातील व्यवहार आणि ध्येयवाद, तरल प्रीती आणि उत्कट भक्ती, आत्मप्रेम आणि मानवताधर्म, पैसा-प्रतिष्ठा-प्रभुत्व यामागे लागलेल्या मध्यम वर्गाने समाजातील निम्न स्तराबद्दल दाखवलेली बधीरता आणि त्याबद्दल निर्माण होणाऱ्या सूडबुद्धीतून निम्नस्तरातून उफाळून येणारी क्रांतीची ठिणगी– यासारख्या आशयसूत्रांची तीव्रता आजही कमी झालेली नाही. त्याचबरोबर सुलभा या ध्येयवादी नायिकेच्या रेखाटनात त्यावेळी दाखवलेली विद्रोहाची चुणूक– आजही तेवढीच धाडसी, धडाडीची वाटते. आपल्या या नायिकेला खांडेकरांनी १९३५ च्या महाराष्ट्रातील नव्या तरुणीचे प्रतिनिधित्व करायला लावले आहे.

प्रीती ही क्रांतीची वैरीण नाही, तर ती तिची मैत्रीण आहे यावर ठाम श्रद्धा ठेवणारी सुलभा ही नायिका आईबापांना काय वाटेल किंवा समाज काय म्हणेल याची पर्वा न करता आपल्या विवेकबुद्धीला, आपल्या आंतरिक प्रेरणेला प्रमाण मानून त्यानुसार आचरण करण्याचे धारिष्ट्य दाखवते. त्यासाठी मानसिक, कौटुंबिक, सामाजिक पातळीवर संघर्ष करण्यास सिद्ध राहते. 'सुलभा'ला खांडेकरांनी आपल्या आधीच्या कादंबऱ्यांतील नायिकांच्या तुलनेने अधिक मोकळेपणा आणि आत्मभान दिलेले आहे. ''सुलभेपूर्वीच्या माझ्या सर्व नायिका पिंजऱ्यात कोंडलेल्या पाखरांसारख्या



होत्या'' असे सांगून खांडेकर म्हणतात की, ''निर्दय रूढी, क्रूर दारिद्र्य, पदोपदी माणसात आढळून येणारी आत्म्याची बधीरता, अंध समाजपुरुषाची मूर्ख परंपराप्रियता इत्यादी पोलादी गजांनी बनविलेल्या पिंजऱ्यातून'' बाहेर पडणाऱ्या आणि अर्धवट स्वप्नाळू दृष्टीने पिंजऱ्याबाहेर विशाल वृक्षशिखराकडे आणि दूरवर पसरलेल्या आकाशाकडे पाहणाऱ्या नव्या युगाच्या नव्या तरुणीचे प्रातिनिधिक स्वरूप प्रकट करण्याच्या उद्देशाने 'सुलभा' या व्यक्तिरेखेची उभारणी केली गेली आहे. 'सुलभा'सारखे आत्मबल दाखवणाऱ्या अनेक स्त्रिया आज समाजात आहेत; परंतु तेवढे आत्मबल दाखवू न शकणाऱ्या स्त्रियांची संख्याही प्रचंड आहे, हेही वास्तव नाकारण्यात हशील नाही. त्यामुळे 'हिरवा चाफा'ची आवाहकता आजही कोमेलजेली नाही असे मानायला हरकत नाही. सत्तर वर्षांनंतरही या कादंबरीच्या कथावस्तूतील बहुविध संघर्षकेंद्रे तेवढीच तीव्र उत्कट आहेत, असे दिसून येते.

'पार्श्वभूमी'मध्ये खांडेकरांनी मराठी कथाकादंबऱ्यांतील नायिकांच्या बदलत्या प्रतिमेचा तसेच मध्यमवर्गाच्या बदलत्या मानसिकतेचा मार्मिक निर्देश केला आहे. हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांतून १८९० ते १९१५ या पाव शतकातील महाराष्ट्रीय मध्यमवर्गाचा व्यापक पट उलगडून दाखवला गेला आहे. खाणेपिणे, राहणे, पोशाख, पुस्तके, प्रीती, भक्ती, नीती या सर्व बाबतीत इंग्रजांचे अनुकरण करण्यात धन्यता मानणारा, आपली भाषा, आपली संस्कृती, आपली धार्मिकता, आपली जीवनशैली याबद्दल न्यूनगंड बाळगणारा, अज्ञान-दारिद्र्याच्या कर्दमात रुतलेल्या बहुजनसमाजाकडे पाठ फिरवून इंग्रजांची इमानेइतबारे सेवा करण्यात इतिकर्तव्यता मानणारा– ज्ञान म्हणजे पोपटपंची, विलास म्हणजे विकास, कार्य म्हणजे सभासंमेलनातला सहभाग अशा मोहनिद्रेत मध्यमवर्ग मग्न होतो. न्यायमूर्ती रानडे, महात्मा फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, सुधारककार आगरकर यांनी मराठी माणसाला या मोहनिद्रेतून बाहेर काढले. सामाजिक-राजकीय शृंखलांचे भेसूर स्वरूप स्पष्ट केले. गुलामगिरी झुगारून देण्यासाठी विविध क्षेत्रात नवनवीन चळवळींना जन्म दिला.

'हिरवा चाफा'ची आवाहकता आजही कोमेलजेली नाही असे मानायला हरकत नाही. सत्तर वर्षांनंतरही या कादंबरीच्या कथावस्तूतील बहुविध संघर्षकेंद्रे तेवढीच तीव्र उत्कट आहेत, असे दिसून येते.

हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतील नायक संन्यस्तवृत्तीने राहून समाजसेवेचा आणि सामाजिक प्रबोधनाचा प्रयत्न करतात तर नायिका आपल्या वैयक्तिक विकासाच्या मार्गात येणाऱ्या प्रकट रूढींच्या शृंखला तोडू पाहतात; पण त्या इतक्या दबलेल्या

आहेत की, आपल्या मनातले विचार अस्फुटपणेही प्रकट करू शकत नाहीत. पुरुषाची भ्रमरवृत्ती आणि समाजाची निर्दय नीती यांच्या कात्रीत सापडलेल्या त्यांच्या नायिका अगतिक, असहाय्य, करुण वाटतात.

१९१५ ते १९३५ या दोन दशकांच्या दरम्यान स्त्रीशिक्षणाचा झपाट्याने प्रसार झाला. कर्वे विद्यापीठ, सेवासदन, अनाथ बालिकाश्रम... मध्यमवर्गातल्या स्त्रिया शाळा-कॉलेजात जाऊ लागल्या, सायकलवरून ऐटीत फिरू लागल्या, सभासंमेलनात धीटपणे बोलू लागल्या, सुटसुटीत वेषभूषा करू लागल्या. प्रेमाची-प्रणयाची उघडपणे वाच्यता करू लागल्या. शिक्षणाचा उपयोग समाजासाठी व्हावा, कुटुंबासाठी व्हावा असा ध्येयवाद बाळगू लागल्या. सत्याग्रह, स्वदेशी वगैरे महात्मा गांधीजींच्या कल्पनांना साद देत राजकारणातही रस घेऊ लागल्या. तारुण्यसुलभ स्वप्नाळूपणा आणि सामाजिक-राजकीय क्रांतीचा कालस्वर यांच्यातला मेळ घालण्यासाठी त्या प्रयत्नशील राहू लागल्या.

प्रीती आणि क्रांती यांची वाट निर्भयपणे चोखाळण्याचे आत्मभान जागे झालेल्या तरुणीचा पुढचा टप्पा खांडेकरांना अपेक्षित होता. तो सुलभा या मानसकन्येच्या निर्मितीने खांडेकरांनी प्रत्यक्षात आणला.

कुटुंबातील वाडवडिलांचा आणि सामाजिक रूढीनीतींचा बडिवार न माजवता, प्रीती आणि क्रांती यांची वाट निर्भयपणे चोखाळण्याचे आत्मभान जागे झालेल्या तरुणीचा पुढचा टप्पा खांडेकरांना अपेक्षित होता. तो सुलभा या मानसकन्येच्या निर्मितीने खांडेकरांनी प्रत्यक्षात आणला.

**सुलभा**

सुलभा ही नामवंत कायदेपंडित तात्यासाहेब कालेलकर यांची कन्या. डॉक्टर होऊन आता इंटर्नशिप करणारी. तिच्या लग्नाची तात्यासाहेबांना घाई झालेली आहे. त्यासाठी वकिली पेशातील विजय देशपांडेचे स्थळ त्यांच्या मनात भरते. एका जहागिरीचा वारसा हक्क त्याला मिळणार असतो. त्यामुळेही तात्यासाहेबांना त्याच्याबद्दल अधिक आकर्षण वाटते. 'स्त्रीपुरुषांची समानता' या विषयावर वसंत व्याख्योनमालेत त्याचे व्याख्यान असते, त्या निमित्ताने तो पुण्याला तात्यासाहेबांकडेच मुक्कामाला येतो. विजय देशपांड्याचे सुलभावर प्रेम बसले तर ती सहज लाख-दीडलाख उत्पन्नाची जहागीरदारीण होईल. गरिबांची प्रकृती तपासणारी असली जहागीरदारीण महात्मा गांधीजींनी बघितली तर लगेच सुलभाला रामराज्याचे शिफारसपत्रदेखील मिळून जाईल असे तात्यासाहेबांचे मनोराज्य स्वैर भराऱ्या घेत असते. त्यासाठी मुंबईला रुग्णालयात काम करणाऱ्या सुलभालाही आठ दिवस रजा काढून तात्यासाहेबांनी बोलावलेले असते.



**मुकुंद**

सुलभाला मात्र तिचा लहानपणापासूनचा सवंगडी मुकुंद याचे जोडीदार म्हणून अधिक आकर्षण असते. हा मुकुंद खरे तर तात्यासाहेबांच्या शिरगावच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीचा भाचा... मॅट्रिकला जगन्नाथ शंकरशेट मिळवणारा स्कॉलर... त्याच्याच प्रेरणेने डॉक्टर होऊन समाजसेवा करण्याची महत्त्वाकांक्षा तिच्यात प्रबळ झालेली... तो पुढे शिक्षणासाठी मुंबईला जातो... आयसीएस होऊन श्रीमंतीची स्वप्ने बघणारा मुकुंद मुंबईतील कामगार-दीनदलितांचे जीवन बघतो तेव्हा शिक्षणावरचे त्याचे लक्ष उडते. 'बड्या पगाराचा दुबळा सभ्य गृहस्थ' न होता तो 'विशाल हृदयाचा कणखर मनुष्य बनतो. कराचीला जाऊन तो एक संप लढवतो. त्यामुळे कराचीतून त्याला तडीपार केले जाते. तो मुंबईला परत येतो... आणि अचानक सुलभाची रेल्वेप्रवासात गाठ पडते. त्याची बहीण पुष्पा आजारी असते; तिला बघायला सुलभा त्याच्या खोलीवर जाते... मुकुंदच्या त्यागाचे तिला अप्रूप वाटते. मुकुंद हा तिला अलौकिक पुरुष वाटतो... श्रीमंती, विद्वत्ता, कीर्ती हे सारे तिला फोल वाटते... मुकुंदवरचे तिचे प्रेम उफाळून येते... शिरगावला होणाऱ्या साखर कारखान्यासाठी अनेक शेतकऱ्यांची जमीन लागणार असते. या जमिनीचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना मिळावा म्हणून मुकुंद त्यांना संघटित करतो... कारखान्याचे मालक शेठ मनसुखलाल यांच्याकडे खरे तर सुलभाच्या शिफारशीवरून तो हिशेबाचे काम पाहात असतो... परंतु त्याची विवेकबुद्धी त्याला शेतकऱ्यांच्या हितरक्षणाच्या बाजूने संघर्षासाठी पुढे ढोसत राहते. सुलभाही मुकुंदाबरोबर खेड्यापाड्यात जागृतीसाठी जाण्याचे ठरवते.

मुकुंद हा तिला अलौकिक पुरुष वाटतो... श्रीमंती, विद्वत्ता, कीर्ती हे सारे तिला फोल वाटते... मुकुंदवरचे तिचे प्रेम उफाळून येते...

**मनोहर**

सुलभाचा भाऊ मनोहर याचेही एक वेगळेच उपकथानक या कादंबरीत आहे. वडिलांच्या बडेजावापुढे व धाकापुढे दबलेल्या मनोहरचा लहानपणापासूनच कोंडमारा होत राहतो. मनोहरचा सालस स्वभाव आणि संगीताची आवड याकडे दुर्लक्ष करून त्याला ते आपल्या इच्छेप्रमाणे शिकायला भाग पाडतात... एका खटल्यात त्याच्यावर शिरगावच्या एका नायकिणीचा खून केल्याचा आरोप होतो... तो खोटा ठरवण्याएवढा पुरावा सापडत नाही; म्हणून मनोहर कलकत्त्याला जाऊन अभय मित्र हे नाव धारण करून संगीताचा वर्ग चालवतो. त्याच्याकडे

संगीताचा अभ्यास करण्यासाठी केशर ही अभिनेत्री येते. केशरचे सौंदर्य आणि तिचे लाघवीपण बघून मनोहरचे तिच्यावर प्रेम जडते. तिलाही मनोहरचा ओढा वाटतो... एका चित्रपटाच्या कामासाठी केशर मुंबईला येते... तेव्हा मनोहरही मुंबईला येण्याचा विचार करतो. केशरला पत्र लिहून तो कळवतो, ''तुझ्यासारखी लक्षाधीशाची मुलगी माझ्यासारख्या फटिंगाला मिळणे अशक्य आहे हे मला कळते. पण कळणे आणि वळणे यात फरक आहे. एवढ्याचसाठी मुंबईतल्या एका बोलपट कंपनीतली नोकरी पत्करून मी तिकडे येत आहे.''

मनोहरवर खुनाचा आरोप आल्याने त्याला परागंदा व्हावे लागलेले असते. एक पठाण त्याच्या मागावर असतो... वगैरे तपशील काहीसे बुचकळ्यात टाकणारे वाटतात. शिरगाव संस्थानच्या हद्दीतील तात्यासाहेबांचे वास्तव्य... त्यामुळे मनोहर ब्रिटिश राज्यात सुरक्षितता शोधतो... मनोहरच्या या ससेहोलपटीबद्दल सुलभा तात्यासाहेबांनाच दोष देते. ''तात्यांच्या कठोर हाताळणीमुळेच मनोहर हाताबाहेर गेला. स्वत:च्या मोठेपणापुढे तात्यांना दयामाया काही नाही...'' शिरगावला केशरच्या संगीत कार्यक्रमासाठी आलेल्या मनोहरला तेथील संस्थानचे पोलिस पकडतात; तेव्हा तात्यांच्या डोळ्यांतून एक टिपूसही येत नाही म्हणून सुलभा नाराजी प्रकट करते. उलट मुकुंद हा तिला तात्यांपेक्षा अधिक चांगला पुरुष वाटतो. कारण तो गोरगरिबांच्या हक्कासाठी लढत असतो. ''माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न करा. या प्रयत्नात मरण आलं तरी बेहत्तर! तुमच्या राखेचं खत मिळून तुमच्या मुलाबाळांचं शेत पिकेल.'' हे मुकुंदाच्या तोंडचे उद्‌गार सुलभाच्या अंगावर शहारे आणतात. भांडवलशाहीच्या चरकात शेतकरी आणि कामगार यांची कशी पिळवणूक होते ते तो उत्तमप्रकारे समजावून सांगे. कुठल्या झोपडीत मिळेल ती ओली कोरडी भाकर खाऊन तो भर उन्हातून पायी चालत राही. सात दिवसांच्या या पदयात्रेची सांगता शिरगावला जाहीर मेळाव्याने होते. त्यावेळी कदम नावाचा एक इसम एका पठाणावर गोळी झाडतो... त्या पठाणाला मिशनरी हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. सुलभाही मुकुंदच्या सांगण्यावरून हॉस्पिटलमध्ये जाते. त्याचवेळी मुकुंदाची बहीण पुष्पा तेथे मरणासन्न अवस्थेत असते. पण मुकुंद तिला भेटायला जात नाही. ''सारा जन्म दु:खात गेल्यावर जीव जाताना तरी सुख कोठून मिळणार?

''माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न करा. या प्रयत्नात मरण आलं तरी बेहत्तर! तुमच्या राखेचं खत मिळून तुमच्या मुलाबाळांचं शेत पिकेल.'' हे मुकुंदाच्या तोंडचे उद्गार सुलभाच्या अंगावर शहारे आणतात.



ताई मला सोडून जात असली तरी ही निशाणं, ही माझी माणसं सोडून मला कुठेही जाता येत नाही.'' असे तो म्हणतो... नंतर झालेल्या लाठीमारात निशाण धरलेल्या मुकुंदाला मार बसतो. त्याजकडून सुलभा ते निशाण घेते; तिलाही काठी लागते... पण तरीही ती सभेत भाषण करते.

नायकिणीचा खून करणारा इसमही कबुलीजबाब देतो. ''मनोहर गाणं ऐकायला जिच्या घरी येत असे त्या नायकिणीला वश करण्याचा माझा प्रयत्न फसल्याने मी रागाच्या भरात ठार केले. मनोहरला अब्रूची भीती घातल्याने तो पळून गेला... त्यामुळे त्याच्यावर खुनाचा आरोप ठेवला गेला... मरणाच्या दारात खोटं कशाला बोलू?'' असे तो इसम सांगतो.

...ध्येयवाद, समाजवाद, सामान्य जन यांचाच अखेर विजय होणार हे सूचित करीत ही कादंबरी संपते.

खांडेकरांच्या सुभाषितवजा वाक्यांची पखरण याही कृतीत भरपूर दिसते. ''प्रीतीचा मार्ग उंचसखल असतो... पण प्रीती हीच जगातली सर्वात मोठी शक्ती नाही का?''[९३]

''आयुष्य ही एक फार विचित्र लढाई आहे. या घनघोर संग्रामात माणसाला समाजाशी लढावं लागतं. आपल्यावर प्रेम करणाऱ्या नातलगांशी लढावं लागतं. फार काय, स्वत:शीही लढावं लागतं.''[१०१]

''आयुष्य ही एक फार विचित्र लढाई आहे. या घनघोर संग्रामात माणसाला समाजाशी लढावं लागतं. आपल्यावर प्रेम करणाऱ्या नातलगांशी लढावं लागतं. फार काय, स्वत:शीही लढावं लागतं.''

* स्त्रीपुरुषांतली भांडणे वाढण्याचे कारण एकच आहे ते म्हणजे लग्न. लग्न हा दोघेही स्वस्तातला सौदा मानतात. केवळ अन्नावारी, बिनपगारी, न चोरणारी स्वयंपाकीण आणि रात्री खोलीच्या दारातून हाकलून न देणारी स्त्री. नवरा मिळवू पाहतो. बायको आपल्याला हौसेने शृंगारणारा व उद्या मुलेबाळे झाली की त्यांच्याकरिता मरमर मरणारा बंदा गुलाम शोधीत असते. शेवटी गाठ पडली ठकाठका असा अनुभव येतो. दोघेही एकमेकांना खाऊ पाहतात; पण तोंडात अर्धवट अडकल्यामुळे दोघांचीही धडपड सुरू होते.[१०८]

* समाजात सर्वत्र विषमता असताना स्त्रीपुरुषांतच तेवढी समता कोठून येणार?[१०८]

* पुरुषाने आपल्या पराक्रमाचे मंदिर उभारले की मूर्ती म्हणून त्यात पूजा करून घ्यायला कोणतीही स्त्री हसत पुढे येते असा जणू काही सिद्धांतच होता.[१२३]

* ध्येय हाच जीवनाच सुगंध! विजयच्या आयुष्यात तो कुठे होता? मोटार बंगला, जमीनजुमला, जहागीर! सारी कागदी फुले![१०३]

* ध्येय म्हणजे स्वत:चे सुख विकून त्याच्या मोबदल्यात घेतलेले दुसऱ्याचे दु:ख असाच त्याचा अर्थ होत नाही का?[१०४]

* त्यागाची शक्ती हेच मनुष्याचे अलौकिकत्व![११३]

* दु:खाप्रमाणे आनंदही मनुष्याला वेडे करून सोडतो.[११९]

* प्रेमाच्या वेलीलाच मत्सराचे काटे असतात... प्रेमाची भाषा मानभावी लिपीसारखी सांकेतिकच असायची![१२४]

* पण तिचे हृदय आईचे असले तरी शरीर पत्नीचे होते.[१२९]

* सुधारणा म्हणजे निसर्ग आणि समाज यांची सुखकारक सांगड घालण्याचा प्रामाणिक प्रयत्न.[१६२]

* स्त्री हृदयाने प्रेम करते. पुरुष ते बुद्धीने करीत असतो. स्त्रीच्या मनात प्रेम निर्माण झाले की तेच तिचे जग बनते. पण पुरुषाचे प्रेम कितीही उत्कट झाले तरी त्याचे जग त्या प्रेमाबाहेर थोडेतरी राहतेच राहते.[१६८]

स्त्री हृदयाने प्रेम करते. पुरुष ते बुद्धीने करीत असतो. स्त्रीच्या मनात प्रेम निर्माण झाले की तेच तिचे जग बनते. पण पुरुषाचे प्रेम कितीही उत्कट झाले तरी त्याचे जग त्या प्रेमाबाहेर थोडेतरी राहतेच राहते.

* पांढऱ्या चाफ्याच्या झाडासारखं मनुष्याचं आयुष्य आहे. ते पानांनी गजबजून जातं तेव्हा त्याच्यावर एकही फूल नसते. त्याच्यावर फुलांचे तुरे लटकू लागले की त्याची सारी पानं नाहीशी होतात. जणू काही चाफ्याच्या पानांचं आणि फुलांचं हाडवैरच आहे... मनुष्याच्या आयुष्यातही सुख आणि ध्येय यांचा असाच विरोध नाही का?[१७५]

* आजच्या समाजाच्या दु:खाचे मूळ मनुष्याच्या स्वभावात नाही, मालकी हक्काच्या मोहिनीत आहे.[१७७]

* प्रीती ही क्रांतीची माता आहे. आपल्या प्रिय माणसाप्रमाणे जो बदलत नाही तो खरे उत्कट प्रेम करूच शकत नाही.[१७९]

* कुठल्याही गोष्टीचे दान करण्याला स्त्री एकदम तयार होणार नाही. पण तिने दानाला सुरुवात केली की सर्वस्वाचे दान केल्याशिवाय तिचे समाधानच होत नाही.[१७९]

* ध्येय आणि प्रेम या दोनच गोष्टी मनुष्याचा विकास करू शकतात.[१७९]

खांडेकरांच्या चिंतनशील, ध्येयप्रवण आणि समाजमनस्क मानसिकतेचा हा आविष्कार आज सत्तर वर्षांनंतरही आपली आवाहकता टिकवून आहे; कारण कथावस्तूची उभारणी करताना काही चिरंतन मूल्यांमधील संघर्ष भविष्यदर्शी प्रज्ञेतून त्यांना स्पष्ट दिसत असतो. आपल्या अस्तित्वाचे मूलभूत अधिष्ठान जाणून घेण्याची असीम जिज्ञासा त्यांना बदलत्या समाजवास्तवाचे लहानमोठे तपशीलही त्यांना अंतर्मुख करत असतात. आणि मानवी मनाच्या व स्वभावाच्या व्यामिश्रतेचे व विसंगतीचे समोर येणारे नमुने त्यांना सैरभैर करीत असतात. 'हिरवा चाफा'च्या रूपाने सुलभा ही नव्या जमान्यातील नायिका मराठी वाचकांसमोर उभी करण्याचा त्यांच्या प्रयत्न त्यांनाही अपूर्व वाटत होता, तरीही मलाईका शेरावत, पूजा भट, वगैरे बिनधास्त नायिकांनी मारलेली मजल पाहून ते खूष झाले असते असे वाटत नाही. स्वातंत्र्याच्या मर्यादाही ते मानत होते. सुलभेचे हिरव्या चाफ्याचे फूल हे हिंदमातेच्या पूजेसाठी होते. देहाच्या व लालसेच्या स्वैर प्रदर्शनासाठी किंवा आविष्कारासाठी नव्हते, असे ते शेवटी सांगतात तेव्हा त्यांचा हेतू अधिकच प्रकर्षाने प्रकट होतो.

**पृष्ठे : २०२ ● किंमत : १५०रु. ● सभासदांना : ११३ रु. ● पोस्टेज: २० रु.**




## अनाथश्रमात जन्मलेल्या, रिमांड होममध्ये वाढलेल्या तरुणाची कर्तृत्वसंपन्न सेवाभावी वाटचाल

'खाली जमीन वर आकाश' हे एक वैशिष्ट्यपूर्ण आत्मकथन आहे. 'रविवार सकाळ'मध्ये इ.स. २००० मध्ये ते सदर म्हणून ४८ लेखांच्या रूपात प्रथम प्रसिद्ध झाले. सुट्या सुट्या प्रकरणांतून एका व्यक्तीच्या वाटचालीची कल्पना येते त्याचप्रमाणे तिच्याशी संबंधित संस्था आणि त्यांच्या कार्याचे स्वरूपही समोर येते. हे लेख आता पुस्तकात एकत्र वाचताना डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या व्यक्तिमत्त्वाबरोबरच त्यांच्या कार्याचीही ओळख पटते; आणि अक्षरश: शून्यातून त्यांनी उभ्या केलेल्या विश्वाचे अप्रूप वाटते.

हे आत्मकथन वैशिष्ट्यपूर्ण आणि वेगळे ठरते, कारण या आत्मकथनाचे निवेदक सुनीलकुमार लवटे यांचे बालपण पंढरपूरच्या एका अनाथाश्रमात गेले; आईवडील, नातलग, जात, धर्म, कुळ, गोत्र अशा आपल्या ओळखीच्या पारंपरिक खुणांपासून वंचित राहिलेल्या आणि एक काल्पनिक, कल्पित ओळख धारण करून जगणे क्रमप्राप्त ठरलेल्या या आत्मकथेच्या नायकाला स्वत:लाच आपले आकाश निर्माण करीत, आपले सखेसोबती, आपले आवडीचे कार्यक्षेत्र निवडणे भाग पडले. आपले प्रेय आणि श्रेय शोधत आपल्या जगण्याला अर्थ आणि आशय मिळवून देणे अटळ ठरले; आणि त्या प्रयत्नात लक्षवेधक कार्यकर्तृत्व दाखवून एक प्रकारची कृतकृत्यतेचीही सुखद अनुभूती मिळवणे शक्य झाले.

जन्मदात्या पित्याने विश्वामित्री पवित्रा घेतल्याने कुमारी मातेने अनाथाश्रमात जन्म देऊन कायमचे दूर लोटलेल्या या अर्भकाला, अनाथाश्रम आणि रिमांड होममध्ये राहून आपले शिक्षण पूर्ण करून उदरनिर्वाहाचा मार्ग शोधावा लागला. आक्रोश, आक्रस्ताळेपणा, आरोप यांना बगल देत, सवर्ण-अवर्ण यांच्या पलीकडचे रक्तसंबंध, जातपंचायत, धर्मसभासंस्काराच्या चाकोरीला भेदून जाणाऱ्या स्वत:च्या माणूसपणाचा वेध घ्यावा लागला. आणि सभ्यतेचे रीतिरिवाज यथाशक्ती पाळत त्याबद्दल लेखनाचा घातलेला हा घाट– आपल्या मध्यमवर्गीय संवेदनक्षमतेला सैरभैर केल्याशिवाय राहणार नाही.



पंढरपूरच्या नवरंगे बालकाश्रमात एक पालक आपल्या गरोदर मुलीला घेऊन १९४९ साली येतात... ती मुलगी ११ एप्रिल १९५० रोजी एका मुलाला जन्म देते. त्या नवजात मुलाला आश्रमात काम करणाऱ्या परित्यक्ता उमाबाई यांच्या पदरी टाकून ती कुमारी माता दोन महिन्यांनी आश्रमाचा निरोप घेते... पुढे काही दिवस आपल्या मुलाच्या तब्येतीची चौकशी ती करीत राहते... पण पुढे तिचे लग्न होते आणि या मुलाशी तिचा कसलाच संपर्क उरत नाही. त्या मुलाला आश्रमात सुनील म्हणूने नाव मिळते.

उमाबाई त्या मुलाला आईची माया देतात. त्यांना स्वत:चीही त्याच दरम्यान जन्मलेली एक मुलगी असते. पण ती पोलिओग्रस्त असते. उमाबाईंच्या अंगावरचे दूधच त्या मुलीप्रमाणे त्या मुलालाही मिळते. उमाबाईंलाही आश्रमाचा आश्रय घ्यावा लागलेला असतो. आश्रमातल्या तीनशे जणांच्या कुटुंबासाठी भाकऱ्या बडवून ती आपले तेथील राहणे कायम करू पाहते. पुढे ती नर्सिंग करू लागते. तिला स्वतंत्र खोली राहण्यास मिळते. त्या खोलीत तिच्या पोलिओग्रस्त मुलीप्रमाणेच सुनील आणि इतर दहापंधरा मुलांना आईची माया मिळते. या खोलीत राहणारी सगळी मुलं (स्नेहा आक्का, विकासदादा, अभय, रतन, लहानू, शुभांगी, शालिनी, शकू कुसुम, बेबी) एकमेकांशी तशी कुठल्याच रक्तानात्याची नसतात. पण ती एकत्र वाढतात... आणि पुढं आश्रमातून बाहेर पडल्यावर आपापल्या परीने शिकून स्वतंत्र, स्वावलंबी आणि स्थिर होतात.

> **आईवडील, नातलग, जात, धर्म, कुळ, गोत्र अशा आपल्या ओळखीच्या पारंपरिक खुणांपासून वंचित राहिलेल्या आणि एक काल्पनिक, कल्पित ओळख धारण करून जगणे क्रमप्राप्त ठरलेल्या या आत्मकथेच्या नायकाला स्वतःलाच आपले आकाश निर्माण करीत, आपले सखेसोबती, आपले आवडीचे कार्यक्षेत्र निवडणे भाग पडले.**

त्या आश्रमात दर्शनी व्हरांड्याला लागून प्रशस्त वॉर्ड होता; त्यात पाचपन्नास पाळणे ओळीने लावलेले असत. त्यात तान्ही बाळं रडत-हसत लोळत असत. आश्रम बघायला येणाऱ्यांना, पर्यटकांना व यात्रेकरूंना ती बाळं बघून कळवळा येई... संस्थासेवक त्यातील मोजक्या धनिकांना आश्रम अगत्याने आतून दाखवत. आश्रमाचं मार्केटिंग करण्याचे विशिष्ट तंत्र वापरीत. मुलांचं खुलं प्रदर्शन, मुलींचा शिवणवर्ग, वाचनालय-ग्रंथालय, बालमंदिर वगैरे विभाग व्यवस्थित दाखवले जात. आश्रमात दत्तकीकरण, बाळंतपण, सणवार, डोहाळे, हळदीकुंकू, माहेरपण, व्रतउत्सव वगैरेही थाटामाटात साजरे होत. आश्रमाला भेट देणाऱ्यांना त्यामुळे

आश्रमाबद्दल आत्मीयता वाटे. वारकरी चक्क पाचदहा पैसे शुल्क देऊन ही अजाण, निष्पाप लेकरे बघत आणि देवाचेच दर्शन घेतल्याच्या भावनेने सद्‌गदित होऊन जात. पंढरपूरच्या लोकांनाही हे प्रेक्षणीय स्थळ अभिमानास्पद वाटे. राष्ट्रपती पंतप्रधानांपासून सारेजण त्याला भेट देत.

...अशा आश्रमात सुनीलचे बालपण... पूर्वप्राथमिक शिक्षण... चालू राहिले. पुढे आश्रमाजवळच्याच चार नंबरच्या शाळेत प्रवेश... नंतर १९५९ मध्ये दहा वर्षांच्या सुनीलला कोल्हापूरच्या रिमांड होममध्ये भरती केले जाते... मातृसत्ताक आश्रमातूने एकदम पितृसत्ताक रिमांड होममध्ये झालेली ही पाठवणूक... चमनगोटा, पांढरे मांजरपाट बनियन... खाकी खादीची पँट, माशांनी घोंगावणारं गार जेवण, खोलीतली मुलं थोराड, चोऱ्यामाऱ्या करून आलेली... त्या पहिल्या रात्री रॅगिंग... सुनीलचं बालपण कुस्करलं जातं. जन्मत:च पोरकेपण लाभलेले... त्यात हे विदारक रॅगिंग... स्वत:बद्दलच शिसारी आणणारे! सुदैवाने कोर्ट त्याला लवकरच 'कमीट' करते. १८ वर्षे होईपर्यंत संस्थेने सांभाळ करण्याबाबत कोर्टाची ऑर्डर होते.

**संस्थासेवक त्यातील मोजक्या धनिकांना आश्रम अगत्याने आतून दाखवत. आश्रमाचं मार्केटिंग करण्याचे विशिष्ट तंत्र वापरीत. मुलांचं खुलं प्रदर्शन, मुलींचा शिवणवर्ग, वाचनालय-ग्रंथालय, बालमंदिर वगैरे विभाग व्यवस्थित दाखवले जात.**

संस्थेजवळच्याच शाहू दयानंद मोफत विद्यालयात चौथीच्या वर्गात शिकायची व्यवस्था होते. रिमांड होमची बंदिस्त कार्यपद्धती. सकाळी पाच वाजता उठणे. सार्वजनिक आंघोळ... कुबट वासाचा टॉवेल... आठवडाभर तोच बनियन... सर्वांना खरूज... त्यावर पांढरं एक्सेबियल औषध लावून उन्हात उभं राहणं... तुंबलेले संडास... ठराविक वेळीच लघवी व संडास यासाठी बाहेर काढण्याची शिस्त... कवायत... अभ्यास, भोजन, शाळा, परत आल्यावर हजेरी. प्रार्थना, जेवण, अभ्यास, झोप... हा दिनक्रम.

चौथी-पाचवी-सहावी... काही कनवाळू शिक्षक... देवमाणूस. हिंदी-गणित-वगैरे विषयांची गोडी लागते. चांगले मित्र मिळतात. त्यांच्या मैत्रीचं अभय कवच लाभतं... स्काऊटमुळे सामुदायिक जीवनाचे प्राथमिक धडे या शाळेत मिळतात. सफाई, शिस्त, नेटकेपणा यांचे संस्कार होतात...

पुढचे शिक्षण होते आंतरभारती विद्यालयात. मुख्याध्यापिका स्नेहलता रायबागकर... प्रेमळ शिक्षक. त्यांना रिमांड होमच्या या मुलांबद्दल कळवळा होता... माणूस म्हणून या मुलांना प्रथमच सन्मानाची वागणूक तेथे मिळाली... एस. एम. जोशी, खांडेकर, नानासाहेब गोरे, कुसुमाग्रज– वगैरेंची भाषणे येथे ऐकायला



मिळाली. सुनीलला वक्तृत्व स्पर्धा, नृत्यस्पर्धा, गायन, काव्यलेखन, बँड, लेझीम... यात सहभागी होण्याची संधी. शाळेत हे संजीवक वातावरण... पण रिमांड होममध्ये मात्र तीच शिस्तबद्ध घुसमट...

एस.एस.सी.च्या निरोप समारंभाला वि. स. खांडेकर पाहुणे... त्यांनी मुलांना आइस्क्रीम खाऊ घातले. त्या समारंभाचा फोटो म्हणजे एक अमूल्य ठेवाच अशी सुनीलची भावना असल्यास नवल नाही... संस्कारशील मूल्यपेरणीचा हा आंतरभारतीमधला काळ होता.

एस.एस.सी.नंतर काय?... सुनील मौनी विद्यापीठाच्या डिप्लोमा इन रुरल सर्व्हिसेसच्या (डीआरएस) कोर्सला प्रवेश घेतो. कम्युनिटी डेव्हलपमेंट, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र वगैरे विषयांप्रमाणे एनसीसी, वादविवाद, समाजसेवा शिबिरे यातही सहभाग. ग्रंथालयामुळे पुस्तकांचे भरपूर वाचन... प्रिपरेटरीला पहिला वर्ग... डीआरएस हा बीए-बीएडला समकक्ष कोर्स. तीन वर्षांचा... स्टायपेंड... इतरांचीही मदत... तशातच डॉ. चिक्कारमने यांनी दाखवलेला लोभ... लेखनाला वृत्तपत्रात मिळालेली प्रसिद्धी. म्हणूनच मौनी विद्यापीठातील दिवसांनी आपलं चित्र, चरित्र आणि चारित्र्य घडवलं अशी त्यांची भावना आहे. शेवटच्या परीक्षेत या कोर्समध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याने सर्टिफिकेट ऑफ मेरिट लाभले. रिमांड होमच्या इतिहासात असे यश मिळवणारा पहिलाच विद्यार्थी म्हणून कौतुक झाले.

आंतरभारती विद्यालयाने शिक्षक म्हणून नोकरीसाठी पाचारण केले.

शिक्षण घेताना शाळा म्हणून आंतरभारतीने व्यक्तिमत्त्व विकासात मोठे क्षितिज दाखवले. नोकरीत पहिल्याच वर्षी पिंपळगाव या दुर्गम गैरसोयीच्या गावी नवी शाळा काढण्यासाठी पाठवले... सगळेच हाल... पण एक माणूस व शिक्षक म्हणून सामुदायिक जीवन, सहकार, संघटनकौशल्य, शिक्षणामागची तपश्चर्या आणि तळमळ यांचे भान येथील वर्षभराच्या वास्तव्यात आले. या खेड्याने मातीची शपथ घालून आकाशात भराऱ्या घेऊ पाहणाऱ्या शिक्षकव्यवसायात नव्याने येऊ पाहणाऱ्या उमेदवाराला जमिनीची व वास्तवाची जाण दिली.

नोकरीत पहिल्याच वर्षी पिंपळगाव या दुर्गम गैरसोयीच्या गावी नवी शाळा काढण्यासाठी पाठवले... सगळेच हाल... पण एक माणूस व शिक्षक म्हणून सामुदायिक जीवन, सहकार, संघटनकौशल्य, शिक्षणामागची तपश्चर्या आणि तळमळ यांचे भान येथील वर्षभराच्या वास्तव्यात आले.

एम.ए. करायचे होते पण पिंपळगावला राहून ते जमण्यासारखे नव्हते.

पुढच्या वर्षी कोल्हापूरला आंतरभारतीमध्ये एक उपक्रमशील शिक्षक म्हणून त्यांची धडपड सुरू झाली. विद्यार्थ्यांच्या वह्यांवर अक्षराबद्दल वाईट असा शेरा

मारताना आपले स्वत:चे अक्षर तरी कुठे चांगले आहे हे जाणवले; आणि सुलेखनाची वही आणून वर्षभर या शिक्षकानेच स्वत: कित्ता गिरवून 'सुवाच्य लेखन हवे' असा वहीवर शेरा मारण्याचा हक्क स्वत:ला मिळवून दिला. दहावीचा वर्गशिक्षक म्हणून अनेक उपक्रम राबवले. विद्यार्थ्यांची परिस्थिति बघून मदतीचा व सामंजस्याचा हात नेहमीच पुढे ठेवला. कुणाच्याही पाठीवर हात ठेवला तो मारण्यासाठी नाही तर शाबासकीसाठी! विद्यार्थी चूक कबूल करतात तेव्हा स्वत:लाच शिक्षा करून घेतली आणि 'कठोर शिक्षका'ऐवजी विद्यार्थ्यांना मित्र-सुहृद वाटावे अशी स्व-प्रतिमा निर्माण करण्याचा सराव केला.

त्याचवेळी आश्रमातच वाढलेल्या रेखा या मुलीशी आश्रमातील हितचिंतकांच्या आग्रहावरून लग्न केले. पंढरपूरलाच आश्रमात शिक्षक-मुलामुलींच्या साक्षीने लग्न झाले. लग्नाच्या वेळी वर तापाने फणफणलेला होता...

'आंतरभारती'मुळे अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या दौऱ्यात त्यांच्या सेवेसाठी जाण्याची संधी लाभली. विनोबाजींना भेटता आले. योगायोगाने इंदिरा गांधी विनोबांना त्याचवेळी भेटायला आल्या. आणीबाणीचे ते दिवस. "बाबा मुझे आशीर्वाद चाहिये." विनोबांनी पाटीवर उत्तर दिले, "मेरा सबको आशीर्वाद है." इंदिराजींनी बाहेर पत्रकारांना सांगितले, "बाबाने मुझे आशीर्वाद दिया है." लोकांना वाटले– जयप्रकाशांच्या विरुद्ध चाललेल्या लढाईला, आणीबाणीला विनोबांनी हिरवा कंदील दाखवला... विनोबांना भेटून आल्यावर पवनारला आचार्यकुल परिषदेचे आयोजन केले गेले. त्याला उपस्थित राहून जैनेंद्रकुमारांना भेटण्याचा योग आला. त्या संमेलनाने आपल्यात आचार्यवृत्ती रुजवली. प्रबोधन झाले. राष्ट्रभाषा प्रचारप्रसाराचे कार्य करण्याची प्रेरणा मिळाली, असे ते मानतात.

"बाबा मुझे आशीर्वाद चाहिये." विनोबांनी पाटीवर उत्तर दिले, "मेरा सबको आशीर्वाद है." इंदिराजींनी बाहेर पत्रकारांना सांगितले, "बाबाने मुझे आशीर्वाद दिया है." लोकांना वाटले- जयप्रकाशांच्या विरुद्ध चाललेल्या लढाईला, आणीबाणीला विनोबांनी हिरवा कंदील दाखवला...

'आंतरभारती'मध्ये संस्थात्मक पातळीवर बऱ्याच गोष्टी खटकणाऱ्या घडत होत्या. त्यामुळे शिक्षकवर्गात असंतोष होता. सेवाज्येष्ठता डावलली जाई. पूर्ण पगाराऐवजी थोडीच रक्कम देण्यात येई. शिक्षकसंघटनेवर शिक्षकांचा प्रतिनिधी म्हणून सुनीलकुमार लवटे यांची नेमणूक झाल्यावर संस्थाचालकांशी संघर्षाचे प्रसंग वरचेवर येऊ लागले. दबाव-दडपण येऊ लागले. जिल्हा शिक्षक संघटनेच्या घटनेत दुरुस्ती करून संस्थाचालक व मुख्याध्यापक यांना शिक्षकांचे प्रतिनिधी म्हणून संघटनेवर येण्यास मज्जाव करण्यात आला. ही दुरुस्ती मंजूर झाल्याने



जिल्हाभरच्या शाळा व शिक्षक मुख्याध्यापक आणि संस्थाचालक यांच्या जोखडातून, वेठबिगारीतून मुक्त झाले... आंतरभारती संस्थेतही शुद्धीकरणाची व लोकशाहीकरणाची चळवळ सुरू झाली... संस्थेला घटना बदलणे भाग पडले. नव्या घटनेमुळे शिक्षकांचा प्रतिनिधी म्हणून लवटे यांना निवडले गेले... अनेक गैरप्रकार त्यांच्या लक्षात आले. ध्येयवादाने स्थापन झालेल्या या संस्थेत तत्त्वांची पायमल्ली सर्रास होत होती; तेव्हा या संस्थेत राहायचे नाही असे लवटे यांनी ठरवले. खांडेकरांना ज्ञानपीठ मिळाले; ते संस्थेचे अध्यक्ष... त्यांना या सर्व प्रकाराची कल्पना दिल्यावर तेही अस्वस्थ झाले... पण खांडेकरांचे सप्टेंबरमध्ये निधन झाले. त्यावेळी शोकसभेत लवटे यांना बोलू देण्यात आले नाही. त्यांनी एक पत्र लिहून सर्वांना पाठवले (सप्टेंबर १९७६). शेवटी आंतरभारतीचा राजीनामा देऊन लवटे बाहेर पडले (जून १९७९). मधल्या दोनतीन वर्षांत हिंदी साहित्यकार यशपाल यांच्यावरील पीएचडी. प्रबंधाचे काम पूर्ण केलेले होते. सुनीलकुमार लवटे... आता डॉ. सुनीलकुमारे लवटे झाले. पंढरपूरचा नवरंगे आश्रम आणि कोल्हापूर रिमांड होम येथेही भावपूर्ण सत्कार झाले. कोल्हापूरच्या महावीर कॉलेजमध्ये डॉ. लवटे यांना लेक्चररशिप मिळाली. विद्यापीठाच्या पदव्युत्तर वर्गांना शिकवण्यासाठीही आमंत्रण आले. ऐन तिशीत डॉक्टरेट... संघर्ष... संघटन... यातून तावूनसुलाखून निघालेले हे व्यक्तिमत्त्व... ध्येयवाद आणि आत्मविश्वासाने ओतप्रोत...

सुनीलकुमार लवटे... आता डॉ. सुनीलकुमारे लवटे झाले. पंढरपूरचा नवरंगे आश्रम आणि कोल्हापूर रिमांड होम येथेही भावपूर्ण सत्कार झाले. कोल्हापूरच्या महावीर कॉलेजमध्ये डॉ. लवटे यांना लेक्चररशिप मिळाली. विद्यापीठाच्या पदव्युत्तर वर्गांना शिकवण्यासाठीही आमंत्रण आले. ऐन तिशीत डॉक्टरेट... संघर्ष... संघटन...

महावीर कॉलेजच्या मागास विद्यार्थी वसतिगृहाचे रेक्टर म्हणूनही जबाबदारी अंगावर पडली. तेव्हा त्यांनी मुलांशी सुसंवाद साधून, मुलांचा विश्वास संपादन केला. संस्थात्मक पातळीवरचे प्रश्न मात्र सोडवणे अवघड असल्याचे जाणवून रोज मनाचे मुडदे अनुभवणे प्राप्त ठरे. या काळात अध्यापनाबरोबर ग्रंथलेखन, हिंदी प्रचाराचे कार्य, वृत्तपत्रीय लेखन वगैरे चालू होते. व्यक्ती की विचार, व्यवहार की आदर्श, संबंध की संदर्भ असे संघर्ष उभे राहात, तेव्हा व्यक्ती, संबंध आणि व्यवहार यांची फारकत करून सैद्धांतिक भूमिका घेण्याची वृत्ती– त्यांना नवे बळ देत असे.[११] या अध्यापनाबरोबर रिमांड होम, अनाथाश्रम यातील मुलामुलींचे जीवन सुधारावे यासाठीही प्रयत्न सुरू राहिले. 'स्नेहसहयोग'च्या रूपाने विज्ञाननिष्ठा, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, बंधुता, समता, विकासाची संधी... अनाथ भावनेचे उच्चाटन, संघर्षापेक्षा समन्वयावर भर... सत्याग्रही मार्गाचा अवलंब... असे

लक्ष्य समोर ठेवून वाटचाल सुरू राहिली.

१९८२ मध्ये मुलींच्या रिमांड होमसाठी जागा मिळवणे व इमारत उभी करणे हा लवटे यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा व कसोटीचा कालखंड ठरला. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांजकडून मिळालेला '३१ मार्चपूर्वी पैसे मिळतील असे पहावे' हा शेरा मंत्रासारखा फलदायी ठरला. निधी नाही असे म्हणून जे अर्थसचिव बोळवण करीत तेच आता तुम्हाला चेकऐवजी ड्राफ्टच देतो– तो ट्रेझरीतून लगेच एनकॅश करता येईल असे सांगतात... दोन लक्षांचा तो डीडी... मुख्यमंत्र्यांच्या अधिकाराची जाणीव देणारा... [११२]

डॉ. लवटे यांनी पुढे रिमांड होमच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणाऱ्या महाराष्ट्र राज्य परिवीक्षा आणि अनुरक्षण संघटनेवर काम केले. त्यावेळी अनेक नवे उपक्रम सुरू करून त्यांच्या कार्यपद्धतीत आणि कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेत बदल घडवून आणला. मुलामुलींना केस वाढवायचे, केशरचना करण्याचे स्वातंत्र्य दिले. ब्युटीपार्लरचे वर्ग संस्थेने सुरू केले. गणवेशाचे स्वातंत्र्य दिले, सणउत्सव पाळण्यास प्रोत्साहन दिले, स्वयंपाकासाठी आधुनिक साधनांचा वापर सुरू केला. जेवणाचा दर्जा सुधारला. अंडरवेअर्स रोज बदलण्याची व्यवस्था केली. खरूज-खवडे-उवा यासाठी डॉक्टरांकडून नियमित उपचार सुरू केले. रिमांड होमला गोकुळ, नंदनवन सारखी नावे ठेवण्याची अनुज्ञा मिळवली. 'बालकल्याण संकुल' असे नाव रिमांड होमला देऊन संस्थेला जणू अळीतून फुलपाखरात परिवर्तित केले. 'अनिकेत निकेतन'ची जोड दिली. शुश्रुषा गृह काढले. वात्सल्य बालसदन हे अर्भकालय सुरू केले. आंतरराष्ट्रीय संस्थांकडूनही मदतीचा हात मिळाला. मुलांच्या पुनर्वसनाचेही प्रयत्न कमीजास्त यशस्वी होत गेले. सुसंस्कार विद्यालय ही प्राथमिक शाळाही याच संकुलात उभी राहिली (१९८६). अनिकेत निकेतन, वात्सल्य बालसदन यांचे दशकपूर्ती समारंभ १९९६-९७ मध्ये उत्साहाने साजरे झाले. तसेच किशोर अनुरक्षण गृह हे १६ ते १७ वयोगटातील मुलांसाठी काढण्यात आले. काही मुलांची लग्नेही लावून देण्यात आली. पुनर्वसनाच्या कार्यक्रमातून कोणी इंजिनिअर, कोणी शिक्षक, कोणी इंटरनेट तज्ज्ञ, कोणी सोशल वर्कर झाले. कोणी ब्युटी पार्लर काढले. कोणी औषध विक्रीचे काम करू लागले...

अनेक नवे उपक्रम सुरू करून त्यांच्या कार्यपद्धतीत आणि कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेत बदल घडवून आणला. मुलामुलींना केस वाढवायचे, केशरचना करण्याचे स्वातंत्र्य दिले. ब्युटीपार्लरचे वर्ग संस्थेने सुरू केले. गणवेशाचे स्वातंत्र्य दिले, सणउत्सव पाळण्यास प्रोत्साहन दिले, स्वयंपाकासाठी आधुनिक साधनांचा वापर सुरू केला.

शांताराम कृष्णाजी वालावलकर यांनी रुग्णालयासाठी पाच एकर जागा



दिली. वालावलकर ट्रस्टतर्फे दरवर्षी एक कोटी रुपयांचा निधी लोककल्याणकारक कामांना दिला जाई. त्याचे सचिवपद सुनीलकुमार लवटे यांजकडे आले... एकदा त्यामुळे ट्रस्टच्या विश्वस्तांच्या घरी धाडी घालण्यात आल्या. लवटे यांजकडे फक्त ४२ रुपये मिळाले. घरात जप्त करण्यासारखे काही नव्हते. काटकसरीचा ओढग्रस्तीचा त्यांचा संसार पाहून छापा घालणारे अधिकारीही गलबलले.

मुंबईच्या चिल्ड्रेन्स एड सोसायटीवरही काम करण्याची संधी लवटे यांना मिळाली. तिच्या त्रैमासिकाचे चोखंदळ संपादन करून त्यांनी वाहवा मिळवली.

भारत-फ्रान्स मित्रमंडळातर्फे फ्रान्सचा दौरा करून तेथील बालकुमार निराधार अनाथांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या समाजसेवी उपक्रमांचा अभ्यास केला (१९९०). या दौऱ्याने नवे भान व नवी दृष्टी लाभली. तेथे संस्थांतर्गत व्यवस्थेत सरंजामी धाटणीऐवजी सर्वजण सहकारी म्हणून काम करतात. पदाधिकारी म्हणजे मालक व कर्मचारी म्हणजे नोकर अशी दरी तेथे नाही... कुमारीमाता गृह, निराधार महिला निवारा गृहे, अर्भकालये, बालगृहे, सुधारगृहे, पुनर्वसन केंद्रे, व्यवसाय प्रशिक्षण गृहे– समस्या सोडवण्यासाठी तेथील लोक व सरकार अनेक अभिनव मार्ग हाताळतात हे लक्षात आले.

पुढे जपानचाही दौरा झाला. तेथे शासनातर्फे कोणत्याही कल्याणकारी संस्था चालवल्या जात नाहीत. मात्र त्यांना योग्य ती मदत देण्यात येते. अनाथ, अपंग, वृद्ध यांना जपानमध्ये समृद्ध जीवन जगता येते. निरंतर समृद्धी तेथे आहे. समृद्धीनंतरही नम्र राहण्याची तेथील जीवनशैली बघितल्यावर भारताच्या दारिद्र्याच्या पार्श्वभूमीवरील स्वत:ची वर्तमानसमृद्धीही अस्वस्थ करू लागते.

वयाच्या पन्नासाव्या वर्षी डॉ. लवटे यांनी अनाथसंगोपन व पुनर्वसन कार्यातून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. रिमांड होम संघटनेचे अध्यक्षपद, बालकल्याण संकुलाचे कार्यवाहपद यांचा राजीनामा दिला. या राजीनाम्यामागची कारणेही आपल्याला अंतर्मुख करणारी ठरावीत.

इ.स. २००० मध्ये वयाच्या पन्नासाव्या वर्षी डॉ. लवटे यांनी अनाथसंगोपन व पुनर्वसन कार्यातून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. रिमांड होम संघटनेचे अध्यक्षपद, बालकल्याण संकुलाचे कार्यवाहपद यांचा राजीनामा दिला. या राजीनाम्यामागची कारणेही आपल्याला अंतर्मुख करणारी ठरावीत. रिमांड होम– अनाथाश्रम यांच्यात वर्षानुवर्षे कामे करणाऱ्या मंडळींच्या हेतूंबद्दल, कामाबद्दल आणि राजकारणाबद्दल साशंकता निर्माण होते. नको असणाऱ्या व्यक्तींबद्दल खऱ्याखोट्या तक्रारी करून त्यांना त्रास देण्याचा, त्यांना बदनाम करण्याचा उद्योगही बहुतेक सेवासंस्थांमधून चालू असतो. डॉ. लवटे यांनाही त्याचा फटका बसला. राजीनाम्यानंतर त्यांचे

सभासदत्व रद्द करण्यापर्यंत तत्कालीन विश्वस्तांची मजल गेली. त्यांना नामोहरम करण्याचे प्रयत्न झाले.

त्याबद्दल काहीसा कडवटपणा डॉ. लवटे यांच्या मनात उरलेला आहे. कारण आपली वीस वर्षांची बालकल्याण संकुलातील मेहनत त्यांच्यानंतर सांभाळली गेली नाही. ''म्हातारी मेल्याचे दु:ख नाही. काळ सोकावेल'' म्हणून डॉ. लवटे त्याबद्दल लिहिण्यास प्रवृत्त होतात. ''सामाजिक जीवनात नाकर्ती मंडळी कर्ते सुधारक म्हणून मिरवताना मला दिसली तेव्हा त्यांच्यापासून मी दोन हात दूर राहून स्वत:ला सुरक्षित ठेवले... संस्था वाचावी म्हणून प्रयत्न करीत राहिलो... पण हट्टाला पेटलेल्यांना अशा वेळी विध्वंस हाच विकास वाटू लागतो... आपली माणुसकी, मूल्यं जपण्या-जगवण्यासाठी बालकल्याण संकुलसारखं अपत्यवत जपलेलं कार्य सोडणं मी पसंत केलं. माणूस मेला तरी मूल्यं जिवंत राहावीत म्हणून...''(११४)

सामाजिक कार्यातून लक्ष कमी केल्यावर डॉ. लवटे यांनी खांडेकरांच्या अप्रकाशित साहित्याचा शोध घेऊन, त्यातून तेरा पुस्तकांच्या संपादन-प्रकाशनाची योजना आखली. शिवाजी विद्यापीठात खांडेकर स्मृती संग्रहालय उभारण्यात सिंहाचा वाटा उचलला. डॉ. लाभसेटवार प्रतिष्ठानच्या सहकार्याने खांडेकर व्याख्यानमालेचा उपक्रम सुरू केला. त्याच धर्तीवर महर्षी कर्वे यांचं स्मृती संग्रहालय उभं करण्याचा संकल्प आता धरला आहे. डॉ. लवटे यांचा मोठा मुलगा निशांत याने आंतरधर्मीय विवाह केला; तर धाकटा मुलगा मरीन इंजिनिअर होऊन सातासमुद्रात संचार चालवला आहे. कोल्हापूर भूषण पुरस्कार देऊन कोल्हापूर महापालिकेने डॉ. लवटे यांचा सन्मान केला. हिंदी अकादमीने अनंत गोपाळ शेवडे हिंदी सेवा विशेष पुरस्कार दिला.

''सामाजिक जीवनात नाकर्ती मंडळी कर्ते सुधारक म्हणून मिरवताना मला दिसली तेव्हा त्यांच्यापासून मी दोन हात दूर राहून स्वत:ला सुरक्षित ठेवले... संस्था वाचावी म्हणून प्रयत्न करीत राहिलो... पण हट्टाला पेटलेल्यांना अशा वेळी विध्वंस हाच विकास वाटू लागतो...


हे आत्मकथन म्हणजे एक कन्फेशन आहे, कालच्या व आजच्या जगातलं अंतर इतकं प्रचंड आहे की हा गतकाल आपलाच होता यावर विश्वास बसू नये. सर्वच वंचितांना असा सुखद सार्थकाचा अनुभव यावा अशी इच्छा ते प्रकट करतात.

अनाथ म्हणून आश्रमात जगणे नशिबी आलेल्या व्यक्तीलाही स्वकर्तृत्वाने, स्वप्रयत्नाने आपल्या मनासारखे सेवाभावी, कर्तृत्वसंपन्न जीवन घडवता येते, आयुष्य सार्थकी लावता येते अशी आशावादी अंतर्ज्योत जागवणारे हे आत्मकथन वाचकांना प्रेरणादायक ठरेल.

**पृष्ठे : २११ ● किंमत : १५०रु. ● सभासदांना : ११३रु. ● पोस्टेज : २०रु.**



## आपल्या ग्रीक, रोमन, इजिप्शियन व हिंदू पूर्वजांनी सांगितलेल्या नक्षत्रांच्या कथा




आपण पृथ्वीवर राहतो. पृथ्वी सूर्याभोवती फिरते. पृथ्वीप्रमाणेच मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनी वगैरे ग्रह सूर्याभोवती फिरतात. त्याशिवाय अनेक तारकापुंज आकाशात आपल्याला दिसतात. या सर्वांची मिळून एक आकाशगंगा होते. ही आकाशगंगा म्हणजे एक लाख प्रकाशवर्षे व्यासाची महाकाय तबकडी असून तिच्यात २०० अब्ज तारे, तेजोमेघ, विविध प्रकारचे वायू आढळतात... आणि आश्चर्य असे की आपल्या या आकाशगंगेसारख्या कोट्यवधी दीर्घिका या विश्वामध्ये आहेत. म्हणूनच आपले विश्व अनंत आहे असे म्हटले जाते.

आपल्या आकाशगंगेतले काही तारकापुंज हे वृषभ, वृश्चिक, धनु, मीन, मृग, मयूर, तूळ, हंस, मेष, त्रिशंकू वगैरे आकाराचे दिसतात; म्हणून त्या त्या तारकापुंजांना त्या आकारावर आधारित नावे देण्यात आली आहेत. अशा ८८ तारकापुंजांची माहिती 'तारकांच्या विश्वात' या मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकात देण्यात आली आहे. ह्या पुस्तकाला अभ्यासकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. खगोलशास्त्रावरचे हे पुस्तक शास्त्रीय परिभाषा वापरून तारकापुंजांची ओळख करून देणारे असूनही सर्वसामान्य वाचकांनाही आकृष्ट करणारे ठरले. त्यामुळे खगोलशास्त्रावरील आणखी काही पुस्तके प्रकाशित करण्यास प्रोत्साहन मिळाले. 'कथारूपी खगोलशास्त्र' हे लीना दामले यांचे पुस्तकही वाचकांना चित्तवेधक वाटेल असेच आहे.

**कथारूपी खगोलशास्त्र या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे आकाशातील नक्षत्रे, राशी व इतर तारकापुंजांची माहिती देताना हिंदू, ग्रीक, रोमन, इजिप्शियन पौराणिक कथाही सांगण्यात आल्या आहेत.** माधुरी मावशी आणि जान्हवी यांच्यातील संवादाच्या रूपात लिहिलेल्या ४६ लेखांचे संकलन

या पुस्तकात आढळते. रात्रीच्या वेळी उत्तर दिशा ठरवायला ध्रुव या ताऱ्याचा उपयोग केला जातो. हा ध्रुव तारा शर्मिष्ठा आणि सप्तर्षी या तारकासमूहामुळे नेमका ओळखतो येतो. सप्तर्षीच्या चौकोनातील वरच्या दोन ताऱ्यांवरून क्षितिजाच्या दिशेने वाढवलेल्या रेषेवर जो मंद तारा लागतो तोच ध्रुव. तो संपूर्ण रात्रभर आणि वर्षातील प्रत्येक दिवशी दिसतो. अढळ असतो. ध्रुवबाळाची गोष्ट त्याच्याशी निगडित आहे. उत्तानपाद राजाच्या नावडत्या राणीचा मुलगा ध्रुव राजाच्या मांडीवर खेळत असताना आवडती राणी सुरुची त्याला राजाच्या मांडीवरून खेचून खाली उतरवते. तेव्हा ध्रुव अपमानाने संतप्त होऊन तपश्चर्या करून देवाकडून अढळपद मागण्याचे ठरवतो. 'ज्या पदापासून आपल्याला कोणी हलवू शकणार नाही' अशा स्थानी मग तो विराजमान होतो.

सप्तर्षी तारकासमूहाला ग्रेट बेअर (अस्वल), नांगर, चार्लसचा गाडा, खाटकाची सुरी म्हणूनही ओळखले जाते. ग्रीक पुराणातील झिअस हा देव कॅलिस्टो या सुंदर तरुणीच्या मागे लागतो तेव्हा त्याची राणी हेरा चिडून त्यांना मारायला निघते. झीअस कॅलिस्टोचे रूपांतर अस्वलात करतो. या अस्वलरूपातील कॅलिस्टोला या रूपांतराबद्दल अनभिज्ञ असणारा तिचाच मुलगा मारायला निघतो, तेव्हा झीअस त्यालाही अस्वल बनवतो; आणि या मायलेकरांना आभाळात भिरकावून देतो. म्हणून या तारकापुंजाला मोठे अस्वल व छोटे अस्वल अशी नावे मिळाली आहेत. ध्रुवाला ध्रुवमत्स्य असेही म्हणतात...

सप्तर्षीच्या चौकोनातील वरच्या दोन ताऱ्यांवरून क्षितिजाच्या दिशेने वाढवलेल्या रेषेवर जो मंद तारा लागतो तोच ध्रुव. तो संपूर्ण रात्रभर आणि वर्षातील प्रत्येक दिवशी दिसतो. अढळ असतो. ध्रुवबाळाची गोष्ट त्याच्याशी निगडित आहे.

शर्मिष्ठा, देवयानी आणि ययाती यांची गोष्टही शर्मिष्ठा नक्षत्राच्या संदर्भात आपल्याकडे प्रचलित आहे; तर ग्रीक पुराणात इथिओपियाची गर्विष्ठ राणी कॅसिओपिया समुद्रातील देवांना चिडवण्यासाठी आपले सिंहासन समुद्रकिनाऱ्यावर आणून ठेवते; समुद्रातील खवळलेल्या श्वापदांसाठी राजा सेफियस आपली कन्या अँड्रोमिडा हिला बळी म्हणून पाठवतो. त्या श्वापदांना मारून पर्सिअस अँड्रोमिडाला सोडवतो आणि कॅसिओपियाला तुझे सिंहासन तिरके होईल असा शाप देव देतात.

कोरोना बोरिॲलिस– उत्तर मुकुट नावाचा सुंदर तारकासमूह भूतप आणि स्वाती नक्षत्रांमध्ये आढळतो. त्याबद्दलही ग्रीक पुराणात एक चमत्कारिक गोष्ट आहे. क्रीटचा राजा मिनॉस डिडॅलेसकडून चक्रव्यूहासारखी लेबिरिन्थ ही इमारत बांधून घेऊन तिच्यात मिनेटॉर राक्षसाला बंदिवान करून ठेवतो. त्या राक्षसाला



भोजन देण्यासाठी सात तरुण व तरुणींना बळी देण्यासाठी नियमितपणे पाठवावे लागते. 'बळी' म्हणून पाठवलेला तरुण थिसिअस चक्रव्यूहात प्रवेश करून मिनेटॉरला ठार मारतो आणि मिनॉस राजाची कन्या आरियाडने हिला घेऊन पळ काढतो. तिच्याशी लग्न करतो. देव तिला मुकुट देतात. तो नुसता मुकुट आकाशात आपल्याला दिसतो.

## हस्त

हस्त नक्षत्राला 'कॉर्व्हस' म्हणजे कावळा म्हणून पाश्चात्त्य ओळखतात. हा कावळा प्रथम म्हणे पांढराशुभ्र होता; तो सूर्यदेव अपोलोचा लाडका होता. त्याला एकदा पाणी आणायला सांगितले तर त्याने पाण्याऐवजी सापच पंजात धरून आणला. तेव्हा देवांनी पाण्याचा चषक व साप यांना आकशात स्थिर केले आणि कावळ्याला काळा रंग दिला... भारतीय कथेप्रमाणे प्रजापती तारकासमूहाच्या उजव्या हाताचा पंजा म्हणजे हस्त. (कॉर्व्हस्)

'मघा' हा सिंह राशीतला तारा. रोमन सेनापती रेग्युलसवरून त्याला रेग्युलस असेही नाव पडले. रेग्युलसने कार्थेजियन लोकांचा पराभव केला. पण त्याच्या तहाच्या अटी फेटाळून रेग्युलसवर हल्ला करून त्याला पकडले. अपमानास्पद अटी त्याच्यावर लादल्या. त्या रोमनांनी नाकारल्याने रेग्युलसला ठार मारण्यात आले. त्याच्या देशप्रेमाचे स्मारक म्हणून त्याचे नाव ताऱ्याला देण्यात आले.

डेल्फीच्या देवतेने हर्क्युलिस या ग्रीक शूरवीराला बारा धाडसी कृत्ये करण्याची आज्ञा दिली. ती केली तर तुला अमरत्व मिळेल असेही म्हटले. त्याने ती कृत्ये यशस्वीपणे करून दाखवली म्हणून त्याला आकाशात अमर नक्षत्राचे स्थान मिळाले; ही कथा हर्क्युलिस (शौरी) बद्दल सांगण्यात येते.

**अरुंधती केश** किंवा कोमा बेरिनिसिस हा तारकापुंज केसाच्या तीन वेण्यांसारखा दिसतो. त्यातील बेरिनिस ही इजिप्तचा राजा तिसरा टॉलेमी याची राणी. आपल्या नवऱ्याचा सीरियाविरोधात युद्धात जय झाला तर मी माझे केस देवाला अर्पण करीन असा तिचा नवस असतो... ते केस देव स्वत:बरोबर आकाशात नेतात अशी कथा प्रचलित आहे.

## शौरी

डेल्फीच्या देवतेने हर्क्युलिस या ग्रीक शूरवीराला बारा धाडसी कृत्ये करण्याची आज्ञा दिली. ती केली तर तुला अमरत्व मिळेल असेही म्हटले. त्याने ती कृत्ये यशस्वीपणे करून दाखवली म्हणून त्याला आकाशात अमर नक्षत्राचे स्थान मिळाले; ही कथा हर्क्युलिस (शौरी) बद्दल सांगण्यात येते. एक गुडघा टेकून

हर्क्युलिस बसलेला असून त्याच्या पायाशी कालेयाचे मस्तक आणि खांद्यावर सिंहाचे कातडे दाखवलेले– असे या नक्षत्राचे कल्पनाचित्र दाखवण्यात येते.

**ड्रॅको**

ड्रॅको (कालेय) या ताऱ्याबाबत ईव्हा या स्त्रीला सर्पाने भुरळ घातल्याची ख्रिस्ती आख्यायिका सांगण्यात येते. देवदानवांच्या युद्धात मिनर्व्हा देवीने या सापाला आकाशात भिरकावून दिले. इजिप्शियन लोकांनी ड्रॅकोमधील अल्फा ताऱ्याला ठुबान हे नाव दिले. हा तारा स्थिर असल्याने आपल्या उपनिषदातही त्याचा ध्रुवतारा असा उल्लेख सापडतो. 'ठुबान' ताऱ्याचा प्रकाश चेओपस राजाने गिझा येथे बांधलेल्या पिरॅमिडमधील गाभाऱ्यातील देवावर अखंडपणे पडत राहावा म्हणून एक लांबच लांब बोगदा ठेवण्यात आलेला आहे. आज हा तारा ध्रुव अढळ नाही; पण आणखी २१००० वर्षांनी तो पुन्हा ध्रुवतारा होईल असे तज्ज्ञांचे मत आहे.

> **मृग नक्षत्राला ग्रीक पुराणात ओरायन हे नाव आहे. ओरायन हा एक ग्रीक शिकारी. त्याच्याशी लग्न करायची इच्छा अपोलोची बहीण आणि शिकारीची देवता आर्टेमिस प्रदर्शित करते; पण ती मत्सरग्रस्त होऊन ओरायनला ठार मारते.**

दक्षिण गोलार्धात त्रिशंकूजवळ अजिबात तारे नसलेला एक छोटासा पॅच दिसतो, त्याला पाश्चात्यांनी कोळशाचे पोते वा ढग असे नाव देऊन टाकले आहे. (ब्लॅक मॅगेलानिक क्लाऊड)

**हॅड्रा**

समुद्रमंथनाच्या वेळी देवांनी मेरू पर्वताची रवी आणि वासुकीचा दोर म्हणून वापर केला. त्या वासुकीला (हॅड्राला) शंभर डोकी होती; आणि त्याला ठार मारण्याची कामगिरी हर्क्युलिसवर सोपवण्यात आली होती. या हॅड्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे एक शिर कापले तर त्या जागी दोन शिरे उगवतील. हर्क्युलिसने त्याची एक वगळून सर्व शिरे जाळली आणि उरलेले शिर जमिनीत खोल पुरले. त्यावर प्रचंड शिळा ठेवली.

सर्पिन्स ऑफिअकस नक्षत्र व सर्पिन्स या नक्षत्राचे सूचक म्हणून ऑफिअकस हा योद्धा वासुकी (हॅड्रा) आणि भुजंग (सर्पिन्स) यांना पायाखाली चिरडून विजयी मुद्रेने वृश्चिकाकडे बघत आहे असे दृश्य रेखाटले जाते. काठीभोवती गुंडाळलेला साप हे एस्कुलपिअस या ग्रीक वैद्यकीय तज्ज्ञाचे चिन्ह आजही प्रचलित आहे. त्याची कथाही ओफिअकस व सर्पिन्स नक्षत्रांशी निगडित आहे. बॅबिलोनियन लोकांच्या प्राचीन बांधकामात वृश्चिकाची चित्रे खोदलेली सापडतात. वृश्चिक रास आयनिक वृत्तावर म्हणजे सूर्याच्या भ्रमणमार्गावर असल्याने, 'सूर्यदेवाने बेसुमार



वेगाने दौडलेले घोडे वाटेतल्या वृश्चिकाला बघून उधळतात' या कथेलाही वास्तवाचे अधिष्ठान लाभते.

**ओरायन**

मृग नक्षत्राला ग्रीक पुराणात ओरायन हे नाव आहे. ओरायन हा एक ग्रीक शिकारी. त्याच्याशी लग्न करायची इच्छा अपोलोची बहीण आणि शिकारीची देवता आर्टेमिस प्रदर्शित करते; पण ती मत्सरग्रस्त होऊन ओरायनला ठार मारते. नंतर त्याबद्दल हळहळते; आणि ओरायनला नक्षत्रात स्थान देते अशी कथा आहे.

आकाशातील नक्षत्रांना नावे देताना वेगवेगळ्या संस्कृतींनी आपल्या पुराणकथांचा यथाशक्ती वापर केला आहे. कधी कधी या कथा नीतिमूल्यांच्या समर्थनाचे तर कधी मानवी स्वभाववृत्तीतल्या गुणदोषांचेही चित्रण-दिग्दर्शन करतात. विशिष्ट आकारांना समान समांतर अशा प्राण्यांचे वा वस्तूंचे नाव देण्याचाही मानवी छंद त्याद्वारे प्रकट होतो. अंतरिक्षातल्या ताऱ्यांना मानवी इतिहासातील व्यक्तींची प्रतीके बनवण्याची आपली प्रतिभा पुरातन काळापासून कार्यप्रवण आहे.

**पृष्ठे : १२८ ● किंमत : १००रु. ● सभासदांना : ७५रु. ● पोस्टेज : २०रु.**


**खगोलशास्त्रावरील इतर पुस्तके**



**तारकांच्या विश्वात**

पराग महाजनी


३५०रु.



**अंतरिक्षाचा वेध**

सुधा रिसबूड

१५०रु.




## एक नैसर्गिक औषध म्हणून पाण्याच्या विविध औषधी उपयोगांसंदर्भात केलेले संकलन

'पाणी' याला आपल्याकडे जीवन हा पर्यायी शब्द रूढ आहे. पाण्याशिवाय आपण फार काळ जगूच शकणार नाही.

पृथ्वीवर पाणी सर्वत्र मुबलक प्रमाणात आढळते, पृथ्वीच्या पृष्ठभागाचा तीन पंचमांश भाग पाण्याने व्यापलेला आहे. पाण्याचे भूमिगत आणि पावसाचे (पृष्ठीय) हे दोन मुख्य स्त्रोत आहेत.

'पाण्याची अद्भुत शक्ती' या छोटेखानी पुस्तिकेत एक नैसर्गिक औषध म्हणून पाण्याचे विविध औषधी उपयोग संकलित करण्यात आले आहेत. शरीराच्या विविध भागातील पाण्याचे प्रमाणे हे त्या त्या भागांचे कार्य नियंत्रित करीत असते; शरीराच्या सर्व भागांना योग्य त्या प्रमाणात पाण्याचा पुरवठा होत राहिला तर मेंदू, फुफ्फुसे, हृदय यांचे कार्य सुरळीत चालू राहते. शरीरातील सर्व रासायनिक प्रक्रियांसाठी पाण्याची गरज असते.

१. शरीराच्या आतील अवयवांच्या अस्तरातील आर्द्रता टिकवण्यासाठी पाणी लागते.

२. शरीरातील रक्त आणि लसिका यासारख्या द्रव पदार्थांचा पातळपणा आणि त्यांचे शरीरातील प्रमाण कायम राखायला पाणी आवश्यक असते.

३. शरीराचे तापमान पाण्याद्वारे नियंत्रित केले जाते.

४. लघवी, घाम, श्वासोच्छ्वास याद्वारे शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर टाकण्यासाठी पाण्याचा वापर होतो.

५. त्वचा निकोप व नितळ राहण्यासाठी, तिचे कार्य सामान्यपणे चालण्यासाठी पाण्याची गरज असते.

दररोज शरीरातून सुमारे चार लिटर पाणी बाहेर टाकले जाते. त्यामुळे तेवढे



पाणी किमान पिण्याची गरज असते. शरीरात पाणी कमी पडले तर निर्जलीकरण होऊन अपचन, अतिसार, उलट्या, त्वचा कोरडी पडणे, लघवीचे प्रमाण कमी होणे, वगैरे तक्रारी सुरू होतात. सांधेदुखी, तणाव व नैराश्य, उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्टेरॉल, दमा आणि ॲलर्जी वगैरे व्याधींचेही प्रमाण वाढते.

रोज आठदहा ग्लास पाणी तरी प्यायला हवे, मात्र ते पिण्याबाबतही काही पथ्ये पाळणे श्रेयस्कर ठरते. उदाहरणार्थ, जेवताना पाणी पिण्याचे शक्यतो टाळावे. जेवताना घेतलेल्या पाण्यामुळे अन्न चावण्याच्या आणि लाळ स्त्रवण्याच्या प्रक्रियेवर वाईट होतो; त्यातून अपचन, अजीर्ण संभवते. जेवण्याच्या आधी एक-दीड तास आधी पाणी प्यावे; जेवणानंतर तीन तासांनी पाणी प्यावे. लघवीचा रंग पांढरा असेल तर शरीराला पाण्याचा पुरवठा योग्य प्रमाणात होत आहे असे मानावे. लघवीचा रंग पिवळसर असेल तर पाणी कमी पडल्याने टाकाऊ पदार्थ बाहेर टाकण्यासाठी मूत्रपिंडांना अधिक काम करावे लागत आहे असे दर्शविले जाते.

पाणी घोटाघोटाने प्यावे; पाणी तोंडाने चावावे, चहा, कॉफी, सोडा, मद्य वगैरे पेये पाण्याचा पर्याय होऊ शकत नाहीत. पिण्यासाठी नैसर्गिक स्त्रोतांपासून मिळालेले खनिजयुक्त पाणी उत्तम ठरते. नैसर्गिक थंड पाणी पिणे श्रेयस्कर. त्यामुळे शरीराचे तापमान खाली आणले जाते. रक्त योग्य त्या प्रमाणात पातळ व सौम्य होते. त्वचेतून टाकाऊ पदार्थ उत्सर्जित होतात. मूत्रपिंडाचे काम सुरळीत चालते. आतड्यातून मलाचे उत्सर्जन व्यवस्थित होते.

गरम पाणीही गुणकारी असते. गरम पाण्याने जठराचे आतले अस्तर उत्तेजित होते आणि रक्तवाहिन्या आकुंचित होतात. त्यामुळे जठरातील आम्ल स्त्रवणाऱ्या ग्रंथींची क्रियाशीलता कमी होऊन, जठरातील आम्लाचे प्रमाण आटोक्यात येते.

गरम पाण्याने पोट स्वच्छ होते. जळजळ, अपचन, उलट्या, पोटदुखी, करपट ढेकर यापासून सुटका होते. मात्र पोटातील व्रणाचा त्रास असेल तर गरम पाणी पिणे हितकर नसते.

**गरम पाण्याने पोट स्वच्छ होते. जळजळ, अपचन, उलट्या, पोटदुखी, करपट ढेकर यापासून सुटका होते. मात्र पोटातील व्रणाचा त्रास असेल तर गरम पाणी पिणे हितकर नसते.**


या पुस्तकात दिलेली पाण्याच्या पॅक्सचीही माहिती उद्बोधक ठरेल. कंठ पॅक, छातीचा पॅक, पोटाचा पॅक, कमरेसाठी पॅक याद्वारे त्या त्या भागातील सूज, कळा वा वेदनांपासून आराम मिळू शकतो. स्नानाचेही थंडगार डुबकी

स्नान, उदासीन डुबकी स्नान, गरम डुबकी स्नान, सिट्झ स्नान (नितंब स्नान), भोवरा स्नान, गरम हवेचे स्नान, वाफेचे स्नान वगैरे प्रकार वेगवेगळ्या तक्रारींचे निराकारण करण्यास उपयुक्त ठरतात. क्रायोथेरपी, पूल थेरपी, गंधक स्नान, ब्राइन स्नान, मोहरी स्नान, स्पा थेरपी यांचाही वापर गरजेनुसार करणे इष्ट ठरते.

पाणी हे निसर्गोपचाराच्या दृष्टीने सर्वात स्वस्त आणि सुलभ साधन आहे हे या पुस्तिकेवरून वाचकांच्या लक्षात येईल. आरोग्यविषयक काही तक्रारी सहजपणे, डॉक्टरांकडे न जाताही दूर करण्याचा प्रयत्न त्याद्वारे करता येईल.

**पृष्ठे : ७०● किंमत : ३०रु. ● सभासदांना : २३रु. ● पोस्टेज :२०रु.**

## चला जाणून घेऊ या ! चक्रं आणि नाडी




**अनु. सुभाष जोशी**

आपल्या शरीरात मूलाधार स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्धी, आज्ञा आणि सहस्रार ही सात चक्रे (आपल्या मणिबंधावर) असतात; ध्यानधारणेने या चक्रांना जागृत करता येते आणि आपल्या आध्यात्मिक प्रगतीला वेग येतो. सहस्रार चक्रापर्यंत कुंडलिनी पोचणे म्हणजे मोक्ष मिळणे असे मानले जाते. ही कुंडलिनी शक्ती मूलाधारापाशी निद्रित अवस्थेत पहुडलेली असते; ती आपोआप जागी होत नाही. प्रयत्नाने तिला जागृत करावे लागते. जागृत झाल्यावर ती एकेक चक्र ओलांडत सहस्रारापर्यंत जायला हवी. मधल्याच कुठल्या चक्रापाशी थांबली तर मात्र त्या शक्तीचा दुराभिमान निर्माण होऊन पुढची आध्यात्मिक प्रगती थांबू शकते.

या चक्रांच्या बरोबरच आपल्या शरीरात ईडा (चंद्रमार्गी), पिंगला (सूर्यमार्गी) आणि सुषुम्ना (मध्यममार्गी) या तीन नाड्या असतात आणि त्या माणसाचे मानसिक, भावनिक, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व घडवतात. माणसाला दैवी शक्तीची, सच्चिदानंदाची अनुभूती देऊ शकतात असे मानले जाते. नाडी शारीरिक पातळीवर अस्तित्वात नसतात; त्या प्राण किंवा उर्जा या स्वरूपात मानण्यात येतात. पिंगला ही सकारात्मक, तरुण, मर्दानी चैतन्यशील, जीवनाची मूलभूत उर्जा आहे; तर ईडा ही स्त्रीलिंगी, नकारात्मक, ग्रहणक्षम, सहनशील, भावनाप्रधान मानली जाते. ईडा ही सोमोसायकिक अंतर्लक्षी असते, तर पिंगला ही मन व शरीराशी संबंधित



बाह्यलक्षी व कर्मेंद्रियांना प्राधान्य देणारी असते. या दोन विरुद्ध शक्तींत समतोल निर्माण झाला की सुप्तावस्थेत असलेली तिसरी महत्त्वाची शक्ती जागृत होते, ती सुषुम्ना. या सुषुम्नेद्वारेच कुंडलिनी जागृतीचा मार्ग खुला होतो. सुषुम्ना ही वैश्विक जाणिवेपर्यंत नेणारी उर्जावाहिनी आहे. ईडा व पिंगला या अनुक्रमे उजवा मेंदू आणि डावा मेंदू यांच्याशी संबंधित असून, ईडा आपल्या नावडींवर लक्ष ठेवते तर पिंगला आपल्या आवडी हाताळते. ईडा अंतर्ज्ञानी, सूक्ष्म व भावनाप्रधान असते; त्यामुळे आपला कल बुद्धिप्रवण, तर्कसंगत, सकारात्मक, वस्तुनिष्ठ पिंगलाकडे जास्त झुकतो. या दोहोंत संतुलन साधले जाणे म्हणजेच देवत्व लाभणे होय. अर्धनारीनटेश्वर हे त्याचे उत्तम उदाहरण.

या पुस्तिकेचे लेखक रवीन्द्रकुमार यांना कुंडलिनी जागृतीची अनुभूती आलेली आहे; ते योग व ध्यानधारणा नित्यनियमाने करतात; तीस वर्षांपेक्षा जास्त काळ त्यांनी गणित हा विषय वेगवेगळ्या विद्यापीठांमध्ये शिकवलेला आहे. मूलाधार चक्रावर कुंडलिनी जागृत झाली की ती पुढे इतर चक्रांना भेदत जाते; त्या मार्गात तीन ग्रंथी (गाठी) अडथळा आणतात. मणिबंधाच्या मुळाशी असणारी ब्रह्मग्रंथी जडत्व, चैनीच्या वस्तूंचा मोह व स्वार्थीपणा दाखवते. हृदयाच्या मधोमध असणारी विष्णूग्रंथी कृती, महत्त्वाकांक्षा, वासना, अंतर्ज्ञान दाखवते. भिवयांच्या मध्यभागी असणारी रुद्रग्रंथी सिद्धींच्या प्राप्तीमध्ये रस दर्शविते. आध्यात्मिक प्रगतीसाठी हे तिन्ही पातळीवरचे गुणवत्ता निकष पार करावे लागतात...

**आपल्या शरीरात ईडा (चंद्रमार्गी), पिंगला (सूर्यमार्गी) आणि सुषुम्ना (मध्यममार्गी) या तीन नाड्या असतात आणि त्या माणसाचे मानसिक, भावनिक, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व घडवतात. माणसाला दैवी शक्तीची, सच्चिदानंदाची अनुभूती देऊ शकतात असे मानले जाते.**

एकामागून एक चक्र उघडण्याचा सराव ही कुंडलिनी योगाची प्रायोगिक बाजू आहे असे रवीन्द्रकुमार सांगतात. कुंडलिनी जागृतीसाठी रोज सुमारे अडीच तासांच्या अवधीत सिद्धासन– त्रिबंध प्राणायाम, नासिकाग्र मुद्रा, वज्रोली-सहजोली, विपरीत करणी आसन, खेचरी मुद्रा, योनी मुद्रा, अजपाजप, त्राटक यांचा अवलंब करावा असा सल्लाही रवींद्रकुमार यांनी दिला आहे. तीन प्रमुख नाड्यांच्या उर्जामार्गाचा वापर करून कुंडलिनी मणिबंधातील चक्रांमधून आगेकूच करीत सहस्रार चक्रापर्यंत पोचते आणि माणसाला मुक्त महामानव बनवते; ही कल्पनाच किती रोमांचकारक आहे! या मार्गाने जायची इच्छा व क्षमता असेल तर आपणही पुढे का जाऊ नये?

**पृष्ठे : ७६ ● किंमत : ३०रु. ● सभासदांना : २३रु. ● पोस्टेज :२०रु.**




## चमत्कारांना थारा न देता पेश केलेले ज्ञानदेवांचे 'वास्तव'जीवनदर्शन

डॉ. आनंद यादव यांनी आपल्या स्वत:च्याच आयुष्याचा समग्र पट उलगडून दाखवणाऱ्या झोंबी, नांगरणी, घरभिंती आणि काचवेल या चार कादंबऱ्यांचा प्रकल्प पूर्ण केल्यावर पुन्हा काहीशा आत्मपर अशाच 'कलेच्या कातड्या'ला आकार दिला. आपल्या स्वत:च्याच आयुष्याला वाङ्मयीन साज देण्यामध्ये दहा-पंधरा वर्षे गेल्यावर अन्य वस्तुनिष्ठ सामाजिक लेखनाला हात घालणे अवघड जाते. परंतु आनंद यादव यांनी सत्तरीच्या टप्प्यावर हे धाडस दाखवले; आणि आपल्याच गतानुभवांमध्ये अडकून न राहता, संत ज्ञानेश्वरासारख्या विलक्षण व्यक्तिमत्त्वावर लिहिण्याचा घाट घातला, याचे कोणालाही आश्चर्यच वाटेल.

ज्ञानेश्वरांवर लिहिताना काही विशिष्ट सूत्रे त्यांनी स्वत:शी निश्चित केली; आणि बाराव्या शतकातल्या सामाजिक-राजकीय परिसरात, बहिष्कृत आईवडिलांच्या पोटी जन्मलेल्या, अनाथ म्हणून वाढलेल्या भावंडांची कहाणी– आणि तीही चमत्कार वगैरेंना थारा न देता शक्य तितकी वास्तव बनवण्याचा घाट त्यांनी घातला. ज्ञानदेवांनी वेदउपनिषदांचा अभ्यास केला; शिव आणि विष्णू या देवतांचा समन्वय साधून विठ्ठलाकडे एकात्मतेने पाहिले, विविध जातीजमातीतील संतांना एकत्र आणले, निरनिराळ्या तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. जनसामान्यांच्या भाषेत गीतेवर भाष्य करून संस्कृतमुळे आलेला दुरावा दूर केला; सर्वसामान्य शेतकरी कुटुंबांनाही ईश्वरभक्तीची, समानतेची, सदाचाराची माळकरी ओढ लावली; आणि प्रपंचात राहूनही अध्यात्माची साधना कळत-नकळत करण्याची मानसिकता दृढमूल केली. या दृष्टीने लोकांची माऊली म्हणून सर्व लहानथोरांच्या मनात आदराचे, प्रेमाचे स्थान मिळवले. आनंद यादव यांनी माऊलीच्या ऐवजी ज्ञानेश्वरांना 'लोकसखा' मानून तशी प्रतिमा रंगवण्याचा प्रयत्न केला आहे.



'लोकसखा ज्ञानेश्वर'मधील पहिली २०० पृष्ठे ज्ञानदेवांच्या विठ्ठलपंत-रुक्मिणी या मातापित्याच्या कहाणीने व्यापली आहेत.

पैठणच्या पाठशाळेतील बारा वर्षांचे अध्ययन संपवून बाहेर पडताना विठ्ठलच्या मनात पुढे भिक्षुकी करण्यापेक्षा ज्ञानसंपादन, तीर्थाटन व पंडितांशी चर्चा करून मनातील धर्मविषयक-तत्त्वज्ञानात्मक शंकाकुशंकांचे निरसन याला प्राधान्य मिळते. त्याप्रमाणे द्वारका, मथुरा, वृंदावन, काशी वगैरे स्थळांना भेटक देऊन आळंदी-सिद्ध बेटावर आल्यावर तेथील सिद्धोपंत कुलकर्णींच्या ग्रंथसंग्रहाने त्याला तेथे मुक्काम करण्याचा मोह होतो. सिद्धोपंतांच्या मुलीशी त्याचे लग्न होते. लग्नानंतर आपेगावला आपल्या आईवडिलांबरोबर विठ्ठल-रुक्मिणी हे दांपत्य राहते. सात वर्षांनी वडील व त्यानंतर आई यांचे निधन होते. तेव्हा विठ्ठल-रुक्मिणी यांनी आळंदीला येऊन राहावे असा प्रस्ताव सिद्धोपंत मांडतात. त्याप्रमाणे हे दांपत्य आळंदीला येते. **अपत्य नाही याची खंत असते. वैद्यकीय तपासण्या होतात; आणि कोणातच दोष नाही असे लक्षात येते. 'अपत्यप्राप्ती नसेल तर विचारी पुरुषाने संसारात रमू नये'** असे विठ्ठलपंतांना वाटू लागते आणि मुक्तपणे ईश्वरचिंतन व अध्ययन करण्यासाठी संन्यास घेण्याचा त्यांचा निर्णय होतो... ते घरसंसार सोडून, माझा शोध घेऊन नका असा संदेश ठेवून निघून जातात.

**''संन्यास हे एक ज्ञानसाधनेचे साधन असते. कर्माच्या फलाची अपेक्षा न धरता गृहस्थाश्रमात स्थिर व शांत राहून आत्मसाधना कर'' असे सांगून ते विठ्ठलाला संन्यासाश्रमातून मुक्त करतात.**

सहा वर्षांनी आळंदीत काशीचे श्रीपाद रामानंद स्वामी येतात; ते दर्शनासाठी आलेल्या रुक्मिणीला पुत्रवती भव आशीर्वाद देतात. रुक्मिणी म्हणते, ''हे कसे शक्य आहे?'' रामानंद स्वामी तिची कहाणी ऐकून घेतात. आपला शिष्य विठ्ठल हाच रुक्मिणीचा पती हे त्यांच्या लक्षात येते. सिद्धोपंत-रुक्मिणी यांना घेऊन काशीला जातात आणि विठ्ठलाला सांगतात, ''माझा आशीर्वाद सुफल व्हायचा असेल तर तुला परत आळंदीला जाऊन गृहस्थाश्रम स्वीकारणे एवढाच एक मार्ग रीतसर आणि वैध आहे.'' ''संन्यास हे एक ज्ञानसाधनेचे साधन असते. कर्माच्या फलाची अपेक्षा न धरता गृहस्थाश्रमात स्थिर व शांत राहून आत्मसाधना कर'' असे सांगून ते विठ्ठलाला संन्यासाश्रमातून मुक्त करतात.

संन्यास सोडून गृहस्थाश्रमात आलेल्या विठ्ठलपंतांवर आळंदीचे ब्राह्मण बहिष्कार टाकतात. विठ्ठलपंत सिद्धबेटावर शेतावर झोपडी बांधून राहतात. हैबती त्यांच्या सेवेत राहतो. पुढे निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई यांचा जन्म दोन-दोन

वर्षांच्या अंतराने होतो. आपले घराणे नाथसंप्रदायी असल्याने, त्र्यंबकेश्वरी जाऊन निवृत्तीला गहिनीनाथांच्या पायाशी घालावे असे विठ्ठलपंत ठरवतात. ब्रह्मगिरीवर वाघ मागे लागल्याने निवृत्तीला सिद्धनाथ काकांच्या मठात रात्रभर राहावे लागते. गुरुदेवांचे प्रवचन ऐकताना निवृत्तीची समाधी लागते. ती बघून गुरुदेव त्याला नाथपंथाची दीक्षा देतात. त्यासाठी अष्टांगयोग साधनेचे तंत्र त्याला शिकवतात. विठ्ठलपंत विविध ग्रंथांचे अध्ययन करून घेतात... मुलांच्या मुंजीच्या वेळा ब्राह्मणवर्ग आक्षेप घेतो. ब्रह्मवृंदाच्या सभेत गोविंदपंतांनी देहान्त प्रायश्चित्त प्रथम घ्यावे, नंतर मुलांच्या मुंजीचा निर्णय करू असे सांगण्यात येते... त्यामुळे गोविंदपंत-रुक्मिणी हे दांपत्य गाव सोडून निघून जाते. प्रयागतीर्थावर जाऊन देहविसर्जन करण्याचा संकल्प स्पष्ट करणारे आणि 'आमचा शोध घेऊ नका आणि शोकही करू नका' असे पत्र लिहून आईवडील घर सोडतात.

पहिल्या दोनशे पृष्ठांपर्यंत हा कथाभाग येतो.

> ज्ञानदेवी हा गीतेवर आधारलेला ग्रंथ. त्यात तुमचे कर्तृत्व ते काय असा सवाल काही विद्वज्जन करतात; त्यामुळे स्वतंत्र ग्रंथलेखन म्हणून ज्ञानदेव अनुभवामृत लिहायचे ठरवतात.

मुंजीची परवानगी मिळवण्यासाठी, शुद्धिपत्र मिळवण्यासाठी ही भावंडे पैठणला जातात; तेथील धर्मसभेत आपली बाजू मांडतात. रेड्याच्या तोंडून वेद वदवतात आणि शेवटी व्रतबंधाची परवानगी नसली तरी शुद्धिपत्र मिळवतात... पैठणला मूलधर्मतत्त्वावर ज्ञानदेव तीन दिवस प्रवचने देतात. हा सर्व वृत्तांत पुढची पन्नास पृष्ठे घेतो.

पैठणहून आपेगावला आपल्या हक्काच्या घरी राहण्यासाठी ही भावंडे येतात. गावकरी या मुलांचे स्वागत करतात. आपले घर व जमीन गावाला दानपत्र करून देतात. भगवद्गीतेवर भाष्य करायचा विचार ज्ञानदेवांच्या मनात येतो. त्यासाठी नेवासे येथील एकूण वातावरण त्यांना योग्य वाटते. तेथील पाटीलबुवा त्यांचे स्वागत करतात. त्यासाठी सर्व सुविधा देतात. सच्चिदानंद कुलकर्णी हे मृत झाले असून समजून अंत्ययात्रेची तयारी चाललेली असताना ज्ञानदेव तेथे जातात. ते त्या देहावरचे वस्त्र काढून अंगावरून हात फिरवतात. मालिश करतात. दीडदोन तासांनी देहात धुगधुगी येते... पंतांच्या कण्हण्याचा आवाज येऊ लागतो. डोळे उघडले जातात. ...पंत जिवंत झाले; ज्ञानदेवाने चमत्कार केला अशी सर्वत्र वार्ता पसरते. खणखणीत बरे झालेले सच्चिदानंद ज्ञानदेवांच्या गीताभाष्याचे शब्दांकन करण्यास सिद्ध होतात.[२९३] करवीरेश्वराच्या मंदिरात एका दगडी खांबाला मध्यावर धरून व्यासपीठाची बैठक



मांडली जाते... ज्ञानदेव 'ॐ नमोजी आद्या' म्हणून आरंभ करतात. ओवी सांगून निरूपण करतात... असा क्रम चौदा महिने चालू राहतो. शेवटच्या अध्यायाचे लेखन पूर्ण होते.(३१३) पसायदान होते. गावकरी चारही भावंडांना महावस्त्रे अर्पण करतात...

ही भावंडे आळंदीसाठी प्रस्थान ठेवतात. समाजाचे अवलोकन करतात. मांत्रिकांचा प्रभाव, ग्रामदेवतांवरील जनसामान्यांची श्रद्धा त्यांना चिंतनप्रवण करतात.

ज्ञानदेवी हा गीतेवर आधारलेला ग्रंथ. त्यात तुमचे कर्तृत्व ते काय असा सवाल काही विद्वज्जन करतात; त्यामुळे स्वतंत्र ग्रंथलेखन म्हणून ज्ञानदेव अनुभवामृत लिहायचे ठरवतात. आळंदीच्या परिसरातील लोकांसाठी भावार्थदीपिकेवर प्रवचने करावीत अशी मागणी लोक करतात तेव्हा एक महिनाभर रोज वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन ज्ञानदेव प्रवचने करतात. विसोबासारखे ब्राह्मणपंडित त्यावर टीका करतात. ज्ञानदेवांशी वाद घालतात. एकदा झोपडीला ताटी लावून ज्ञानदेव स्वत:ला कोंडून घेतात. मुक्ताई त्यांची समजूत काढते...

> ज्ञानदेव नंतर पंढरीच्या वारीवर जातात. नामदेवांना भेटतात. त्या सर्वांना घेऊन तीर्थयात्रेवर जातात. तुळजापूर, अंबाजोगाई, औंढ्या नागनाथ, पैठण, नेवासे, आळंदी, भीमाशंकर, नाशिक-त्र्यंबकेश्वर, नर्मदा नदी, द्वारका, मथुरा, अयोध्या, प्रयाग-काशी वगैरे क्षेत्रांना भेटी देऊन पंढरपूरला परत येतात.

ज्ञानदेव अमृतानुभवाचे लेखन पूर्ण करतात. त्याचे वाचन पंचक्रोशीतील निवडक जाणकारांपुढे करण्यासाठी ग्रंथचर्चेचा कार्यक्रम ठरवतात. त्यावेळी ग्रंथाचा आशयही विशद करतात.[३७५-३८०]

हठयोगी चांगदेव यांच्या कानावर ज्ञानदेवांची कीर्ती जाते. ते आपल्या दोन शिष्यांबरोबर पत्र पाठवण्याचे ठरवतात. पण काय लिहावे याबद्दल संभ्रम वाटून कोरेच पत्र पाठवतात. ज्ञानदेव त्या कोऱ्या पत्राला उत्तर म्हणून ६५ ओव्यांचा मजकूर पाठवतात. त्यामुळे ज्ञानदेवांच्या अध्यात्मसाधनेची कल्पना त्यांना येते. वाघ-सर्प बरोबर घेऊन ते आळंदीला येताहेत हा निरोप मिळाल्यावर ज्ञानदेव भिंतीवर बघून त्यांच्या स्वागताला जातात. ज्ञानदेवांशी झालेल्या चर्चेतून चांगदेवांना ज्ञानप्राप्ती होते. ते मुक्ताईचे लेकरू बनतात.[३९६]

ज्ञानदेव नंतर पंढरीच्या वारीवर जातात. नामदेवांना भेटतात. इतर संतांना भेटतात. त्या सर्वांना घेऊन तीर्थयात्रेवर जातात. तुळजापूर, अंबाजोगाई, औंढ्या नागनाथ, पैठण, नेवासे, आळंदी, भीमाशंकर, नाशिक-त्र्यंबकेश्वर, नर्मदा नदी, द्वारका, मथुरा, अयोध्या, प्रयाग-काशी वगैरे क्षेत्रांना भेटी देऊन पंढरपूरला परत येतात. ज्ञान आणि भक्ती या दोन मार्गांचा संगम त्या यात्रेने होतो. वारकरी

संप्रदायाची सूत्रे ठरतात... आणि 'अखंड ब्रह्मानंदात विरून जाण्यासाठी चिरस्वरूपाची समाधी घेण्याचा' निर्णय ज्ञानदेव घेतात. त्यांची भावंडेही त्याला संमती देतात...[४६१] समाधीचे वर्णन करून ही कादंबरी संपते.

ज्ञानदेवांच्या चरित्राची उपलब्ध असलेली स्थूल चौकट स्वीकारून, समाजवास्तवाचे व निसर्गवैशिष्ट्यांचे, ब्राह्मणवर्गाच्या आणि अन्य ग्रामजनांच्या मधील वर्णभेदाचे व वृत्तिभेदाचे तपशील भरत आनंद यादव यांनी या कादंबरीचा डोलारा उभा केला आहे. आठशे वर्षांपूर्वीचे आळंदी, आपेगाव नेवासे या गावांचे स्वरूप आजच्यासारखेच प्राधान्याने ग्रामीण असणार हे स्पष्टच आहे. पैठण काहीसे क्षेत्र म्हणून अधिक नागर असू शकेल. ग्रामीण लेखक म्हणून यादवांना असे ग्रामजीवन तपशीलवार रंगवणे हे सुलभ जाणे स्वाभाविक आहे. स्वत: पाहिलेल्या कागलसारख्या छोट्या गावचे व खेड्यापाड्यांचे चित्र त्यांच्यासमोर सहजपणे येत असणार. ज्ञानदेवांवरचे हे लेखन वास्तव व्हावे आणि त्यात चमत्कारांना स्थान असू नये ही मनोमन एक लक्ष्मणरेखा ठरवून एकूण मांडणी त्यांनी केली आहे, असे दिसते. तसे त्यांनी स्पष्टही म्हटले आहे.

**ज्ञानदेवांच्या चरित्राची उपलब्ध असलेली स्थूल चौकट स्वीकारून, समाजवास्तवाचे व निसर्गवैशिष्ट्यांचे, ब्राह्मणवर्गाच्या आणि अन्य ग्रामजनांच्या मधील वर्णभेदाचे व वृत्तिभेदाचे तपशील भरत आनंद यादव यांनी या कादंबरीचा डोलारा उभा केला आहे.**

एखाद्या ग्रामीण कादंबरीमध्ये असावे तसे पैठण, आळंदी, आपेगाव, नेवासे वगैरे गावांचे समाजजीवन चितारले आहे; तेथील बारा बलुत्यांचे त्यांनी जीवनदर्शन घडवले आहे. हे जीवन आठशे वर्षांपूर्वीचे आहे; पण ते आजचेही वाटावे इतके समकालीन आहे.

''...त्या शेतमळ्याशी, निसर्गाशी, प्राणिमात्रांशी आणि हैबतीच्या गोतावळ्याशी ज्ञानदेव एकजीव होऊन गेला होता. कोकीळ त्याला पहाटेच्या शुभमुहुर्तावर हाका घालत होते. कावळ्यांचे थवे **समूहगान** म्हणावे तसे खर्जात एका सुरात आवाज करत होते... विहिरीजवळचं आवळीचं झाड त्याला आवळे देऊ करत होतं. आमराईत तर तो फळवेड्या पख्यासारखा खूपच रमत होता. वैशाखात हैबती आंबे उतरून त्यांची अढी घाली. ते पिकले की मुलांना देई. कोणत्या झाडाचा आंबा, हे त्याचा रंग, चव पाहून ज्ञानदेव बरोबर सांगत असे. वर्षभर रानात कधी काकड्या, कधी भुईमुगाच्या शेंगा, कधी हरभरा पिके. ज्ञानदेवाच्या समोरचे ते पीक वाढत असे. रानात ते वाढताना त्याच्या नाना कळा ज्ञानदेवाला जाणवत. पिकं उन्हातान्हात वाढत; तरी वाऱ्यावर डोलत. कुणी येऊन काकडी खुडे, शेंगाचे वेल उपटी, हरभऱ्याचे डहाळे घेई. तरी कुणी पीक हूं की चूं करत नसे... मुकी कष्टाळू



औताची जनावरं, त्यांच्यामुळं पिकत असलेली शेती त्याला खूप काही शिकवी... प्रत्येक पिकाच्या काढणीच्या वेळी हैबती त्या पिकाची प्रथम पूजा करी.. ज्वारीच्या पेरणीच्या वेळी... अवजारांची पूजा केली जाई. बेंदराला बैलाची पूजा, अमावस्येला म्हसोबाची पूजा, गुऱ्हाळात उसाचा पहिला रस निघाला की प्रथम तो भूमीला भांडं भरून अर्पण केला जाई. थोडा विहिरीत ओतला जाई. गावातल्या देवळातल्या देवांच्या चरणी चार-चार थेंब अर्पण केले जात... निसर्ग आणि लोकसमाज हे परमेश्वरी शेत आहे. त्याची निगा शेतकऱ्याच्या रूपात करणारा मूळ तत्त्वधारी परमेश्वरच आहे... हैबतीची ही निसर्गपूजा हा भक्तियोगच आहे, असा प्रत्यय ज्ञानदेवांच्या तरल मनाला येत असे.''(१८१)

सगळेजण गोदावरीला प्रवरा जिथं मिळते त्या संगमावर टोके गावी येऊन पोहोचले. गाव छोटं असलं तरी माणसं खाऊनपिऊन सुखी होती. भरपूर बागायत शेती होती... प्रवरा-गोदावरीच्या संगमामुळं शेती बारमाही पिकं देत होती. जनावरं संगमाच्या कुरणात चरून धष्टपुष्ट झालेली. कोणताही ऋतू असला तरी हिरवा चारा भरपूर... दुधदुभतंही... असं **आत्मसंतुष्ट आत्ममग्न** गाव... संगमाच्या परिसरात दोन्ही नद्या... एकमेकींत लहरत एकमेकींच्या लहरींनी आनंदाचा झिम्मा खेळत होत्या. शिवशक्तीगत एकात्म होऊन पुढे जात होत्या...(२७६)

जलामध्ये, वृक्षांमध्ये, वृक्षांच्या पानापानामध्ये, डोलणाऱ्या पिकांमध्ये, वरच्या विशाल निळ्या आकाशामध्ये, वाऱ्यामध्ये सर्वत्र पसरलेल्या प्रकाशामध्ये परमेश्वर कसा भरून असतो याचा विलक्षण अनुभव ज्ञानदेव घेऊ लागले.

दूरवरचा संगम-सागर त्यांना विशाल मनाची शांतता कशी सर्वांवर पसरून असते, दैवी अंत:करणाची पातळी कशी प्रसन्न आणि मोहक असते, याचा प्रत्यय देत होता. जलामध्ये, वृक्षांमध्ये, वृक्षांच्या पानापानामध्ये, डोलणाऱ्या पिकांमध्ये, वरच्या विशाल निळ्या आकाशामध्ये, वाऱ्यामध्ये सर्वत्र पसरलेल्या प्रकाशामध्ये परमेश्वर कसा भरून असतो याचा विलक्षण अनुभव ज्ञानदेव घेऊ लागले. तल्लीन होऊन गेले. जणू भगवद्‌गीतेची दृष्टान्त सृष्टी त्यांना सर्वत्र पसरलेली दिसत होती. काहीतरी विलक्षण स्पंदन त्यांच्या मनात स्फुरू लागले. ही सृष्टी म्हणजे माझी पसरलेली गीताच आहे... काहीतरी विलक्षण त्यांना जाणवू लागलं... त्यांची समाधी लागली आणि ते जड जगातून नाहीसे झाले.[२७७]

पंचक्रोशीतील **तरुण मंडळी बैलगाड्या घेऊन आली** होती. अनेक तरुणांनी आपले खेळ करून दाखवले. निरनिराळी वाद्ये वाजून दाखवणे, दांडपट्टा, ढालतलवार, शक्तीचे प्रयोग इत्यादी अनेक प्रकार झाले. त्या सगळ्या **तरुणांना फेटा-पागोटं बांधलं.**[२९४]

निसर्गाच्या या स्वरूपाबाबतचा समकालीनपणा व्यक्तिरेखांच्या चित्रणातही जाणवतो. यातल्या व्यक्ती– विशेषत: ग्रामीण– या आजच्याच वाटतात. त्या आजचीच भाषा आणि संकल्पना वापरतात.

“हे ब्येस! अहो, गावचा **गणपती बसवण्याचा मोठा समारंभ** देवळाच्या पटांगणातच असतो. आसपासच्या पाच-सात गावची माणसं त्यासाठी हितं गाड्या घेऊन येत्यात. नाना तऱ्हांचं खेळ करत्यात. त्या वक्ताला पैला मान माझा असतो. तवा मी तुमच्या कीर्तन-निरूपणाबद्दल जाहीर करून सांगतो. म्हंजे मग दुसऱ्या दिसापासनं पंचक्रोशीतील माणसंबी येतील. कसं?” नेवाशाच्या पाटलांची ही प्रवचनाच्या आयोजनाची प्रसिद्धी योजना आधुनिक इव्हेंट मॅनेजमेंटचीच झलक दाखवणारी आहे. आठशे वर्षांपूर्वी आजच्यासारखे गणेशोत्सवांचे सामूहिक आयोजन गावपातळीवर होत असेल हे यातले गृहीतकृत्यही कदाचित् आव्हानात्मक असेल...

पाटील बाबांप्रमाणेच सच्चिदानंदपंत कुलकर्णींही ज्ञानेश्वरांच्या प्रवचनाबद्दलची जाहिरात तितक्याच जोरदारपणे करतात. “पंचक्रोशीतील भाग्यवान सभाजनहो, **निधिवासाच्या इतिहासात हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा** अशी घटना उद्यापासून या करवीरेश्वर शिवशंभूच्या आणि गणेशाच्या साक्षीनं घडत जाणार आहे. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णांनी सर्व वेदोपनिषदांचं सार काढून ठेवलेल्या गीतेचा आपणा सर्वांसाठी देशीभाषेनं अलंकृत होऊन **मराठमोळा अवतार** साकार होत जाणार आहे... नटूनथटून अलंकृत होऊन नव्या चैतन्याचं लेणं लेवून गीता आता **मराठमोळ्या** भाषेत अवतरणार आहे... आजच्या धार्मिक कर्मकांडाच्या, थोतांडांच्या चक्रव्यूहात अडकलेल्या श्रद्धाळू पण अज्ञ बहुजनांच्या उद्धारासाठी तीच गीता महाराज मराठी भाषेत आणणार आहेत... बहुजनांना खरा **मानवधर्म** दाखवून देणार आहेत... त्यामुळे धर्माच्या क्षेत्रात घुसलेल्या **दुष्ट प्रवृत्तींचा आपोआप नायनाट** होणार आहे. हे कार्य आजच्या कलियुगातील अवतारकार्यच आहे... ह्या महान यज्ञकर्माला आपण भक्तिभावानं उपस्थित राहावं ही प्रार्थना...”[२९६]

आजच्या धार्मिक कर्मकांडाच्या, थोतांडांच्या चक्रव्यूहात अडकलेल्या श्रद्धाळू पण अज्ञ बहुजनांच्या उद्धारासाठी तीच गीता महाराज मराठी भाषेत आणणार आहेत... बहुजनांना खरा **मानवधर्म** दाखवून देणार आहेत... त्यामुळे धर्माच्या क्षेत्रात घुसलेल्या **दुष्ट प्रवृत्तींचा आपोआप नायनाट** होणार आहे.

“मी नेवासा गावाचं कुलकरणीपणाचं काम करणार एक सामान्य कुलकरणी... माझ्याकडं येणाऱ्या लोकांत धूर्त, ढोंगी, खोटारडे, दांभिक, पोटभरू वृत्तीचेच लोक जास्त... त्यांना खंडणी आणि कर चुकवायचा असतो. खोटं बोलून स्वार्थ साधायचा असतो... मी एक संशयात्मा होतो... पण माझ्यातील दुष्ट अहंकाराचा



दुष्ट पशू ज्ञानदेवांनी हळुवार नष्ट करून मला माणसांत आणलं. मला नवा जन्म दिला... **भक्तिभावानं आणि सचोटीनं वागणारा सच्चिदानंदबाबा जन्माला आला... हा माझा पुनर्जन्म आहे...**”[२९७] ही सच्चिदानंदांची कैफियत आजच्या एखाद्या नोकरशहाच्या वळणावरचीच आहे.

ज्ञानदेवांची ‘वास्तव’ चरित्रकहाणी सांगण्यासाठी आणखीही एक पथ्य आनंद यादव यांनी पाळले आहे. ते म्हणजे ज्ञानदेवांच्या नावावर प्रचलित असलेले चमत्कार. ज्ञानदेवांनी पैठणला रेड्याच्या तोंडून वेदमंत्र वदवला, ज्ञानदेवांनी भिंत चालवली, ज्ञानदेवांच्या तप्त पाठीवर मुक्ताईने मांडे भाजले, वगैरे.

हे चमत्कार बुद्धिप्रामाण्यवादी, अंधश्रद्धाविरोधी मानसिकतेमध्ये स्वीकारार्ह ठरत नाहीत. तेव्हा त्यांचा काही तर्कसंगत अर्थ लावायला हवा असे अपरिहार्य वाटले असावे; त्यानुसार लेखकाने त्यांची तर्कसंगत स्पष्टीकरणे शोधलेली आहेत. ती पटवून घेण्याचा प्रयत्न साक्षेपी वाचकांना करावासा वाटला तर लेखकाच्या प्रतिभेचे सार्थक होईल.

हे चमत्कार बुद्धिप्रामाण्यवादी, अंधश्रद्धाविरोधी मानसिकतेमध्ये स्वीकारार्ह ठरत नाहीत. तेव्हा त्यांचा काही तर्कसंगत अर्थ लावायला हवा असे अपरिहार्य वाटले असावे; त्यानुसार लेखकाने त्यांची तर्कसंगत स्पष्टीकरणे शोधलेली आहेत.

ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या तोंडून वेदमंत्र वदवला या घटनेबाबत आनंद यादव यांनी मांडलेला तर्क असा.

ज्ञानदेव सांगतात की भूतमात्रांची शरीरे, देह वेगळे असले तरी सर्वांठायी एकच परमात्मा हा जीवात्मा म्हणून वसत असतो.

त्यावर संशयी केशवशास्त्री म्हणतात, “हा चिमुरडा पोर... आमच्याशी आत्म्याच्या एकरूपतेच्या गप्पा करतोय... आत्मा परमात्मा म्हणजे काय, तो कशाशी खातात हे तरी नीट माहीत आहे का?... पाठीमागे बघ. पखालीने पाणी वाहणाऱ्या गणूचा रेडा मागे उभा आहे. त्याचा आणि तुझा आत्मा एकच आहे का?”

ज्ञानदेव म्हणतो, “भूदेव महाराजांनी मला क्षमा करावी. पण माझा, तुमचा आणि त्या महिषाचा आत्मा एकच आहे...”

“अरे, मग तुझा आणि त्या रेड्याचा आत्मा एकच असेल तर तुझ्या आवडीचा वेद त्यालाही माहीत असला पाहिजे... तर त्या रेड्याच्या पवित्र मुखातून तुझा आवडतो वेद तरी ऐकव.”

“महाराज, निसर्गनियमानुसार रेड्याला वाचा आहे. पण तुमची आमची भाषा नाही. पण त्याची अशी एक वाचा आहे. ती आपणा ब्रह्मवेत्त्यांना कळू शकेल.”रेड्यापुढे गवत टाकून ज्ञानदेव उभा राहतो. “ॐ अग्निमीळे पुरोहित”

ही पहिला ऋचा म्हणते. रेडा **'आँऽ'** असा आपला स्वाभाविक आवाज काढतो... पुन: पुन्हा **'आंऽ'** म्हणतो. तेव्हा ज्ञानदेव त्या **आँऽ**चा अर्थ विशद करतो. तो म्हणतो, ''या महिषाच्या मुखातून जो ध्वनी एक नव्हे तीन वेळा बाहेर पडला तो मूळ स्वरूपातील 'ॐऽऽऽ' ध्वनी होता. तो तुम्ही **आँऽ** अशा पद्धतीने उच्चारला. तो **आँऽ** हे महिषाचे आपल्या दृष्टीने केवळ ओरडणे असले तरी महिषाच्या दृष्टीने तो ओंकाराचाच ध्वनी होता. महिषाची ही वेदवाणी त्याच्याशी एकरूप एकात्म झाल्याशिवाय कळणार नाही... पूर्वी एकच वेद होता. तो ओंकार स्वरूप होता. तोच ओंकार महिषाने उद्‌गारला. म्हणजेच आपला वाणीत आपला आपला वेद उच्चारला. आपल्या वाणीत आपली जाणीव व्यक्त केली... ओंकार हा सूक्ष्मस्वरूपातील वेद आहे... त्याचे मर्म महिषाच्या वेदवाणीने स्पष्ट होईल.''

...आणि वयोवृद्ध जाणकार ब्राह्मण ज्ञानदेवाचा गौरव करू लागतात. ते स्पष्टीकरण सर्वजण स्वीकारतात. ''तुम्ही केवळ ज्ञानदेव नाही, ज्ञानेश्वर आहात असे म्हणतात... रेड्याकडून वेदवाणी वदवणाऱ्या ज्ञानेश्वरांचा जयजयकार असो...'' असे म्हणतात.(२३४)

**महिषाची ही वेदवाणी त्याच्याशी एकरूप एकात्म झाल्याशिवाय कळणार नाही... पूर्वी एकच वेद होता. तो ओंकार स्वरूप होता. तोच ओंकार महिषाने उद्‌गारला. म्हणजेच आपला वाणीत आपला आपला वेद उच्चारला. आपल्या वाणीत आपली जाणीव व्यक्त केली... ओंकार हा सूक्ष्मस्वरूपातील वेद आहे...**

एकदा मांडे करायचे व खायचे असा बेत ठरतो. पण ज्ञानदेवांना त्याचवेळी भयानक मनस्ताप होतो; आणि ताप येतो. काही खाण्यापिण्याची इच्छाच उरत नाही. पाचसात दिवस तो ताप कायम राहतो. काही न खाल्ल्याने पोट खपाटीला जाते. ताप थोडा कमी झाल्यावर मुक्ताई म्हणते, ''देवदादा, आज तुझ्यासाठी मी छानपैकी मांडे करणार आहे. गेले पाचसहा दिवस तुझ्या मनातले मांडे मनातच राहिले आहेत. त्यांना आज बाहेर काढून सगळेजण खाऊन टाकूया... पाचसहा दिवस ते मांडे तुझ्या मनातच भाजत राहिल्यामुळे तुला खूप ताप आला... अंग तापलेल्या खापरासारखे ऊनजाळ झाले होते... तुझ्या पाठीला मी तेल लावलंय... ते मांडे मी तुझ्या ऊनऊनीत पाठीवरच भाजते. म्हणते तुझ्या शरीरातील उष्णतेने ते भाजतील... तुझे शरीरही थंड होईल. मांडेच्या मांडे भाजतील. तापही उतरेल... दुहेरी फायदा होईल.

- आणि मुक्ताईने केलेले मांडे सर्वजण चवीचवीने खातात.[३५९]

ही मुक्ताई ज्ञानदेवांच्या पाठीवर मांडे भाजत नाही. केवळ तशी कल्पना मांडते. लोक तीच एक चमत्कार म्हणून स्वीकारतात. ''ज्ञानदेवांनी योग सामर्थ्यानं



आपलं अंग उष्ण करून अंगात जाळ निर्माण केला... त्या जाळावर मुक्तानं मांडे भाजले'' अशी वार्ता घरोघर पोहोचते.(३६०)

ज्ञानदेवाने भिंत चालवली हा आणखी एक चमत्कार.

त्यासाठी लेखकाचे स्पष्टीकरण केवळ बोलीभाषेतील लकबीवर आधारलेले आहे. सिद्धबेटाजवळचा एक वाडा भुईसपाट झाला; एक भिंत तेवढी तग धरून राहिली. लोक तिच्यावर बसून दूरवरचा परिसर बघत. हवा खाण्यासाठी, खेळण्यासाठी त्य भिंतीकडे जातात. 'मी भिंतीवर गेलो होतो', 'भिंतीवरून आलो' यासारखी भाषा आळंदीकर वापरतात. जेव्हा चांगदेव वाघावर स्वार होऊन येतो तेव्हा ज्ञानेश्वर त्याला सामोरे जातात आणि म्हणतात, ''आळंदीत तुमचे स्वागत असो. तुम्ही तापीवासी वाघावर विराजमान होऊन आलात तर आम्ही झोपडीवासी भिंतीवरून परस्पर इकडे आलो. तुमचे शिष्य आम्हाला भिंतीवरच भेटले. त्यामुळे झोपडीकडे न जातात भिंतीवरून परस्पर इकडंच यावं लागलं...''(३९१)

**''आळंदीत तुमचे स्वागत असो. तुम्ही तापीवासी वाघावर विराजमान होऊन आलात तर आम्ही झोपडीवासी भिंतीवरून परस्पर इकडे आलो. तुमचे शिष्य आम्हाला भिंतीवरच भेटले. त्यामुळे झोपडीकडे न जातात भिंतीवरून परस्पर इकडंच यावं लागलं...''**

एकदा गोरोबा कुंभार ज्ञानदेवांना म्हणतात, ''या नामदेव महाराजांना तुम्ही काहीतरी सांगा... आम्ही वर्षातनं एकदोन वेळा पंढरीला येतो... पण बाकीचे दिवस घरी राहून प्रपंच करतो. कामधंदा करतो. परमार्थ साधतो. रोज काही पंढरीला येत नाही... पण नामदेव महाराजांना अजून हे उमगत नाही. त्यांना कुणी गुरूला भेटला नाही. त्यामुळं मडकं कच्चं राह्यलंय... नामदेव, घरदार, कामधंदा, पोरंबाळं समदं पार वाऱ्यावर सोडून देऊन सदान्‌कदा देवळाच्या दारात पायरीवर जाऊन बसत्यात... ह्येंच्या घरातली माणसं आमच्याकडं कायम तक्रार करत असत्यात... दीसभर देवाच्या पायरीवर असलं तरी त्येंच्या घरात वर्षा-दीड वर्षाला पाळणा हलतोय. पोरांचं लेंढार... असा पोराबाळांचा संसार वाऱ्यावर सोडून कुण्याबी संतानं नुसतं बसून खाणं चांगलं काय?'' त्यावर ''नामदेवाचं कच्चं मडकं तुम्हीच तुमच्या वाणीच्या थोपटण्यानं वरचेवर थापटून बडवून पक्कं करू शकता. तो तुमचा अधिकार आहे'' असे ज्ञानदेव सुचवतात.

नामदेवांच्या कीर्तनाच्या वेळी देऊळच फिरले, देवळाची पुढची बाजू मागे झाली; मागची पुढे या दंतकथेचे स्पष्टीकरणही देण्यात आले आहे. ते अगदी साधे स्पष्ट आहे. नामदेवांना कीर्तन करायचे होते; पण मुख्य मंडपात दुसऱ्या कोणाचे तरी कीर्तन चालू होते. तेथे श्रोते बसलेले होते. तेव्हा नामदेवांनी

देवळाच्या पिछाडीला उभे राहून आपले कीर्तन सुरू केले. श्रोते हळू हळू जमू लागले. मुख्य मंडपातील श्रोतेही मागे येऊन बसले. म्हणजे देवळाची मागची बाजू पुढे आणि पुढची बाजू मागे झाली. नामदेवांची भक्ती आणि आर्तता पाहून देऊळच फिरलं... नामदेवाचं कीर्तन ऐकण्यासाठी जनताजनार्दन नागनाथानं आपलं तोंड नामदेवाकडं फिरवलं आणि कर्मठ ब्राह्मणांकडं पाठ फिरवली.(४२०)

ज्ञानदेवांच्या चरित्रातील चमत्कारांची तर्कसंगत वास्तवता या प्रकारे आनंद यादव दाखवू पाहतात.

ज्ञानदेवांच्या आयुष्यातील मुख्य संघर्ष हे प्रस्थापित ब्राह्मण वर्गाच्या मतप्रणालीशी आणि आचारपद्धतीशी आहेत. ते आनंद यादव यांनी चांगले दाखवले आहेत.

विठ्ठलपंतांना परंपरागत भिक्षुकीमध्ये स्वारस्य नसते; उपनिषदांच्या अभ्यासाने त्यांचे समाधान होत नाही. वेद अपौरुषेय; त्यांचा अर्थ विशद करणारी दहा उपनिषदे. पण त्यांमध्ये ईश्वर, सृष्टी, वस्तुजात आणि प्राणिमात्र याविषयी भिन्न भिन्न विचार मांडले गेले आहेत. षट्दर्शनातही प्रत्येक जण अंतिम सत्य सांगण्याचा आव आणतो; पण द्वैत वा अद्वैत यापैकी कोण चूक, कोण बरोबर हे अनिर्णितच राहते. आस्तिक आणि नास्तिक यातलाही श्रेयस्कर पर्याय समोर येत नाही... पांडित्य आहे पण निर्णय नाही. साशंकता आहे. विपरीत अहंकार बुद्धी, तुच्छता बुद्धी, दुसऱ्याबद्दल संशय घेत उणेदुणे काढत असते. त्यामुळे सर्वनाश होतो. जिज्ञासाबुद्धीमुळे विठ्ठलपंतांना जखडबंद कर्मकांडातच– स्वतःला झोकून देणे जमत नाही; आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी अधिक अभ्यासाची गरज वाटते... घराण्यातील गहिनीनाथांची परंपराही त्यासाठी मदतीला येईल असे वाटते... अध्ययनानंतर लग्न आणि संन्यास; संन्यासानंतर पुनश्च गृहस्थधर्म– हा सर्व प्रवास तत्कालीन आचारधर्माच्या विपरीत असल्याने त्यांना वाळीत टाकले जाते. ब्राह्मणवर्गाने धर्मसभेत या बहिष्कारासाठी केलेला युक्तिवाद धुंडिराजशास्त्री, त्र्यंबकशास्त्री पेश करतात. (१२४-१२९) गहिनानाथांनी नाथपंथाची प्रकट केलेली भूमिका (१६५-१६९), विठ्ठलपंतांनी उपनिषदे, दर्शने, भगवद्गीता यांचा निवृत्ती-ज्ञानदेवसोबत केलेला अभ्यास (१७६-१७७) ज्ञानदेवांचे गीताविषयक स्वतंत्र चिंतन (१८०-१८१) यातून भावार्थदीपिकेच्या लेखनाची ज्ञानदेवांची पूर्वतयारी सिद्ध केली जाते.

पांडित्य आहे पण निर्णय नाही. साशंकता आहे. विपरीत अहंकार बुद्धी, तुच्छता बुद्धी, दुसऱ्याबद्दल संशय घेत उणेदुणे काढत असते. त्यामुळे सर्वनाश होतो. जिज्ञासाबुद्धीमुळे विठ्ठलपंतांना जखडबंद कर्मकांडातच– स्वतःला झोकून देणे जमत नाही;



केशवशास्त्री, गंगाधर शास्त्री, नारायण भट, चिंतामणशास्त्री हे सर्व मुंजीचा प्रश्न डावलून विठ्ठलपंतांनी प्रायश्चित्त घेण्यावर भर देतात; आणि हे प्रायश्चित्तही देहान्त्ताचे सुचवतात. धर्मसभेतील विचारमंथन बरेचसे एकतर्फीच होते.[१८८-१९४] रुक्मिणी त्याबाबत नंतर आपली मानवतावादी भूमिका घरातल्या घरात मांडते.[३०२-५] विठ्ठलपंत मुलांना आपल्या निर्णयाची कल्पना पत्रांद्वारे देतात.[२०६-२०९]

पैठणच्या धर्मसभेत मुंजीची अनुज्ञा नाही, पण शुद्धिपत्र दिले जाते. तेथे ज्ञानदेव आपली मते अत्यंत सम्यक, संयत शैलीत मांडतात.(२२२-२३६) त्याशिवायही अनेक तात्त्विक, आध्यात्मिक, विचार जागोजाग येतात. पाटीलबाबांशी बोलताना ज्ञानदेवांनी मांडलेली पुरोहिताची मध्यस्थी न घेता देवाची पूजा, भक्ती करण्याची कल्पना (२६०-६२), बुद्धिमान माणसाचं जीवनकार्य (२६७-६८), प्रस्थापित ब्राह्मणी धर्ममार्तंडांचा अहंकार (२८०-८१), ज्ञानदेवीचा पहिला अध्याय व गणेश वंदना (३००-३०२), गीतेतील विचार (३०५-३०८, ३१३-३२०), देवकल्पना, ग्रामदेवता, मूर्ती (३३५-३३७), देववाणी आणि प्राकृत भाषा (३५२-३५३), टीकेमुळे होणारा मनःस्ताप (३६२-६५), अनुभवामृतातील तत्त्वविचार (३७५-३८०), चांगदेव पासष्टी (३९१-३९४), वारकरी धर्माचे स्वरूप (४५३-४५७).


ज्ञानदेवांवर लिहिण्याच्या निमित्ताने आनंद यादव यांनी केलेला वेगवेगळ्या आध्यात्मिक-धार्मिक प्रवाहांचा अभ्यास या सर्व वादविवाद-चर्चांतून आपल्याला जाणवतो.

एकूण, ज्ञानदेवांच्या जीवनाचे आणि कार्याचे, विचारांचे आणि वृत्तीचे एक सलग, सुसूत्र आकलन या कादंबरीद्वारे वाचकापुढे चित्रपटासारखे उभे राहते. वास्तवाच्या पातळीवरून हे सर्व करताना ज्ञानेश्वर हा समकालीन झाल्यासारखा वाटतो; पण तो ज्ञानेश्वराच्या अखंड चैतन्याचाही आविष्कार आहे असे म्हणता येते. संजीवन समाधी घेतलेल्या ज्ञानदेवांचे अस्तित्व आजही चिरंजीव, चिरंतन आहे. आनंद यादव यांच्या या कृतीला म्हणूनच मोल आहे.

एकूण, ज्ञानदेवांच्या जीवनाचे आणि कार्याचे, विचारांचे आणि वृत्तीचे एक सलग, सुसूत्र आकलन या कादंबरीद्वारे वाचकापुढे चित्रपटासारखे उभे राहते. वास्तवाच्या पातळीवरून हे सर्व करताना ज्ञानेश्वर हा समकालीन झाल्यासारखा वाटतो;

**पृष्ठे : ४८३ ● किंमत : ३५०रु. ● सभासदांना : २६३रु. ● पोस्टेज : २०रु.**

**केसांची निगा कशी राखावी**
**याचे संपूर्ण मार्गदर्शन करणारे पुस्तक**




## चला जाणून घेऊ या!

### केसांची निगा

अनु. मीना टाकळकर

**३० रु.**

हे पुस्तक पूर्णपणे केसांच्या समस्यांवर आहे, ज्याला कोणाला निरोगी केस हवे आहेत त्या प्रत्येकासाठी आहे.

सर्व प्रकारचे वनस्पतीयुक्त, आयुर्वेदिक, योग इ. उपचार यात तपशीलासह दिले आहेत. लेप कसा बनवायचा? तो कसा लावायचा आणि किती वेळासाठी?

...केसांच्या सर्व समस्यांवर यथायोग्य मार्गदर्शन.



# आमची काही 'खास' पुस्तके



**स्वामी**
रणजित देसाई
१६०रु.



**श्रीमानयोगी**
रणजित देसाई
४००रु.




**संभाजी**
विश्वास पाटील
४८०रु.




**ययाति**
वि. स. खांडेकर
२००रु.



**झोंबी**
आनंद यादव
२५०रु.




**आय डेअर**
किरण बेदी
२२५रु



**रुचिरा भाग १**
कमलाबाई ओगले
१२०रु.




**स्पीड पोस्ट**
शोभा डे
२५०रु.




**वाइज अँड अदरवाइज**
सुधा मूर्ती
१५०रु.

## साधंसुधं...

# शिष्यवृत्ती

**प्रमोदिनी वडके-कवळे**

अश्विनी. सतत हसरी आणि आपल्या आयुष्यावर मनापासून खूष असणारी माझी मैत्रीण. त्या दिवशी मला ती जरा चिंतेत असल्यासारखी वाटली म्हणून विचारलं, ''का ग? काय झालं?''

आधी 'काही नाही ग' म्हणत तिने मला उडवूनच लावलं. पण अगदीच खनपटीला बसल्यावर 'कुणाला बोलू नकोस हं इतक्यात' म्हणत मला आपल्या काळजीचं कारण सांगितलं... 'अग सौरभला बहुतेक एक स्कॉलरशिप मिळतेय. तीन महिने परदेशी जाऊन तिथल्या भाषेचा, संस्कृतीचा अभ्यास करण्याची.''

''वा! मग यात चेहरा एवढा लांब करण्याचं काय कारण आहे? अग तीन महिने अगदी बघता बघता जातील बघ. तू सौरभची मुळीच काळजी करू नकोस. तो मुळातच हुशार आहे. कुठेही गेला तरी सहज जमवून घेईल.''

''मला त्याची नाही ग काळजी वाटत. उलट ही स्कॉलरशिप त्याला नक्की मिळेल ना याचीच चिंता आहे. म्हणूनच तुला म्हटलं कुठे बोलू नकोस.''

''का? अभ्यास झालाय ना त्याचा?'' मी चुकून पाषाणयुगातून इकडे आले असावे अशा नजरेने तिने माझ्याकडे पाहिलं. ''अभ्यासाचा काही संबंध नाही ग. या सगळ्या प्रोसेसमध्ये इतकी राजकारणं असतात ना... अगदी शेवटच्या क्षणापर्यंत काही सांगता येत नाही.''

''ते आहेच. पण ते आपल्या हातात थोडंच असतं? तो नशिबाचा भाग असतो.''

''तरीपण आधी गाजावाजा झाला तर उगीच नामुष्की होते ना. शिवाय इतर स्पर्धकांनाही आपल्या हालचालींचा अंदाज येतो.''

माझ्या मते मी चांगली सुशिक्षित आहे. शिष्यवृत्तीच्या परीक्षेच्या मांडवाखालूनही गेलेय दोनदा. पण तरीही अश्विनीच्या बोलण्याचा अर्थ मात्र मला कळला नाही.

काहीही असलं तरी शेवटी सौरभला ती स्कॉलरशिप मिळाली. अभिनंदन करायला गेले तेव्हा तो कुणीकुणी त्यासाठी प्रयत्न केले होते आणि तरीही ती आपल्यालाच कशी मिळालीय हे अभिमानाने सांगत होता. पण त्याचा स्वर ऐकून मला मात्र प्रश्न पडला की ह्याला नेमका कसला आनंद झालाय? आपल्याला



स्कॉलरशिप मिळाल्याचा की इतरांना ती न मिळाल्याचा?

मी भेट म्हणून दिलेली विद्वान लेखकाची पुस्तकं त्याने उघडून पाहिलीच नाहीत. ''मावशी, अगं पुस्तकं नेता येणार नाहीत फारशी. बॅग भरताना मी अक्षरश: एकेका ग्रॅमचा विचार करतोय.''

त्याचं ते कारण मला पटलं. एवढी साधी गोष्ट आपल्या लक्षात येऊ नये याबद्दल स्वत:च्या बावळटपणाची शरमही वाटली. पण चेहऱ्यावर ती दिसू न देता मी म्हटलं, ''राहू देत रे. ही पुस्तकं काय, नंतर इकडे आल्यावरही वाचता येतील. आत्ता तुला तिकडे केवढा अभ्यास करावा लागेल. वेगळं जग. वेगळी संस्कृती. किती छान अनुभव! खरंच नशिबवान आहेस अगदी.''

तो अभिमानाने हसला. ''बाकीचं जाऊ देत. पण निदान एक पैसाही खर्च न करता तिकडे जायला मिळणं आणि तीन महिने मजेत रहायला मिळणं सुद्धा खूप आहे. नाही का? नाहीतर मध्यमवर्गीय लोकं कशाला अशा वेगळ्या देशाच्या वाटेला जाणारयतं?''

मी पुन: अवाक्! ह्याच्या मते शिष्यवृत्तीचा अर्थ फक्त एवढाच?

काळ बदलला हा शब्दप्रयोग आपण अगदी सर्रास वापरतो... पण त्या शब्दांचा जरा खोल विचार केला की लक्षात येतं फक्त इसवी सनाचा आकडा बदललेला असतो. बाकी काळ तसाच असतो.

पूर्वीपासून– अगदी इसवी सनाची मोजणी सुरू व्हायच्याही आधीपासून– दिवस चोवीस तासांचाच आहे. सूर्य सकाळीच उगवतो. चंद्र अमावस्येच्या दिवशी न चुकता कॅज्युअल लीव्ह घेतो... हे सगळं ठाऊक आणि मान्य असूनही आपण सहजपणे म्हणून जातो ''पूर्वीसारखं काऽही उरलं नाही. काळ बदललाय आता.'' माणसांची वागणूक बदलली तरी आपण काळावरच ठपका ठेवून मोकळे होतो. पण खरंच नेमकं काय बदललेलं असतं?

काळ फक्त पुढे जातो. त्या वेगाने बदलतात ती माणसंच!

तिसरीची परीक्षा पास होऊन चौथीत आल्यापासून आमच्या चिमुकल्या मनावर कितीतरी गोष्टींचं टेन्शन आलं होतं. त्यातल्या दोन महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे सहस्रबुद्धे बाई आणि चौथीच्या स्कॉलरशिपची परीक्षा.

गेली कित्येक वर्षं सहस्रबुद्धे बाई मुलींच्या शाळेतला 'चौथी अ'चा वर्ग सांभाळत होत्या. त्यामुळे आम्ही पहिलीत दाखल झाल्यापासून त्यांची कीर्ती ऐकून होतो. त्या अतिशय कडक शिस्तीच्या होत्या. त्यांना प्रत्यक्ष पाहिल्यावर ही कीर्ती खरी असेल याची जराही शंका उरत नसे. उभाआडवा दणकट देह, त्याला साजेसा उग्र चेहरा, त्यावर सदैव रागीट भाव आणि काहीसा खरखरीत आवाज... चौथीच्या वयाला भीती वाटण्यासाठी आणखी

काय लागतं? दुसरं टेन्शन प्राथमिक शिष्यवृत्तीच्या परीक्षेचं. खरं म्हणजे या परीक्षेचं टेन्शन न वाटता अभिमानच वाटावा अशी एकूण सामाजिक परिस्थिती होती. मॅट्रिक– इयत्ता अकरावी, व्हर्नाक्युलर फायनल– इयत्ता सातवी आणि शिष्यवृत्तीच्या दोन खास परीक्षा– अनुक्रमे इयत्ता चौथी आणि सातवी. या सर्व परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यावेळी एक विशिष्ट सामाजिक प्रतिष्ठा लाभलेली होती. त्यांच्याकडे सगळा गाव आशादायी नजरेने बघायचा. नातेवाईकांत त्यांचं आणि त्यांच्या आईवडिलांचंही स्थान उंचवायचं. वर्गातल्या इतर मुलामुलींना आणि आपल्या भावंडांना तुच्छ लेखण्याचं 'स्टँडिंग लायसन्स' त्यांना आपोआप मिळून जायचं. बळी जाणाऱ्या बकऱ्याचे होत नसतील एवढे लाड या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे व्हायचे. पण तरीही आमच्या शाळेतल्या मुलींना या परीक्षेचं टेन्शन यायचंच. कारण या परीक्षेला बसणाऱ्या मुलींच्या अभ्यासाची तयारी सहस्त्रबुद्धे बाईच करून घ्यायच्या. रोज संध्याकाळी शाळा सुटल्यावर वर्गातल्या निवडक मुलींना तासभर थांबवून हा खास अभ्यास घेतला जायचा.

पण आमच्या बॅचचं नशीब जोरात होतं. आम्ही तिसरीत होतो त्याच वर्षी बाईंना मुलगी झाली. आणि आम्ही चौथीत गेलो त्यावेळी ती तान्ही असल्याच्या कारणावरून त्यांनी संध्याकाळच्या वर्गाची जबाबदारी नाकारली.

पण स्कॉलरशिपचा अभ्यासक्रम वेगळा. तो घेण्यासाठीचं खास ट्रेनिंग फक्त बाईंनीच घेतलेलं होतं. त्यामुळे स्कॉलरशिपच्या तयारीला आमच्या गावात तरी सहस्त्रबुद्धे बाईंशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

शेवटी बाईंनी संध्याकाळी आपल्या घरी शिकवण घ्यायचं कबूल केलं.

बाईचं घर शाळेच्या जवळच होतं. बाईंच्या शिस्तीच्या धाकाने पहिल्या दिवशी शाळा सुटल्यासुटल्या आम्ही त्यांच्या अंगणात हजर. बाईंच आमच्या नंतर घरी आल्या. अंगणात आम्हाला बघितल्याबरोबर बाई सात्त्विक संतापाने खेकसल्या, ''जरा उशिरा येत जा ग. आल्या आल्या लगेच कसलं?''

दुसऱ्या दिवशी शाळा सुटल्यावर आम्ही मधल्या सुटीत अर्धवट राहिलेला आट्यापाट्यांचा डाव पुरा करून मगच बाईंकडे गेलो. खेळून दमल्यामुळे सगळ्यांचेच चेहरे घामेजलेले. (दिवसभराच्या शाळेमुळे कोमेजलेलेही.) बाई आज उशिराबद्दल काहीच बोलल्या नाहीत. मात्र आमच्या सगळ्यांच्या हातावर त्यांनी खोबऱ्याची एकेक वडी ठेवली आणि मगच शिकवायला सुरुवात केली.

त्या वडीची चव पुढे क्लास चालू असेपर्यंत जवळजवळ दहा महिने जिभेवर तशीच राहिली. आमच्या तोंडात आणि बाईंच्या स्वभावातही. संध्याकाळी घरी गेल्यानंतरच्या बाई वर्गातल्या बाईंपेक्षा फारच वेगळ्या असायच्या. त्यांचा आवाज, नजर, सगळी देहबोलीच बदलायची. बाई कमालीच्या प्रेमळ होऊन जायच्या. गावातल्या मुलांच्या शाळेतली स्कॉलरशिप परीक्षेला बसलेली मुलंही याच वेळी



बाईंकडेच शिकवणीला यायची. आमच्यासारखीच खट्याळ वयातली. अभ्यास करताकरता खालमानेने आणि गंभीर चेहऱ्याने पण आम्हा मुलींना ऐकू येतीलशा आवाजात त्यांची काहीतरी मिश्कील बडबड चालू असायची. खाली मान घालून तिरक्या नजरेने त्यांच्याकडे बघून, खुसूखुसू हसत आम्ही त्यांच्या चेष्टांना दाद द्यायचो. भरीला बाईंची ती गोड तान्हुली. ती नुकतीच रांगायला लागली होती. तिला सारखं आमच्यात लुडबुडायचं असायचं. आमची पुस्तकं ओढायची असायची. आम्ही अवघड गणितं सोडवण्यात तल्लीन होऊन गेलो असलो की ती आमच्या समोर येऊन मान वाकडी करून इतक्या कुतुहलाने आमचे चेहरे न्याहाळायची की, हसून तिच्या गोबऱ्या गालाचा गालगुच्चा घ्यायचा मोह आवरताच यायचा नाही. आम्हाला शिकवताना एकीकडे बाई संध्याकाळच्या स्वयंपाकाची तयारी करायच्या. कधी मटार सोलता सोलता आम्हाला व्याकरण शिकवायच्या, तर कधी भूमितीच्या आकृत्या काढायला सांगून कणीक मळायला घ्यायच्या. कधीकधी भाजी चिरताना काकडीटोमॅटोची एखादी फोड आमच्या हातावर ठेवायच्या. आमच्या अभ्यासाला बाईंच्या हातच्या स्वयंपाकाचा खमंग दरवळ लाभायचा. मधेच उठून त्या देवापाशी आणि तुळशीपाशी दिवा लावून स्तोत्र गुणगुणत परत यायच्या. सुसंस्कृत घरातली संपन्न दिवेलागणी आमच्या आजूबाजूला वावरताना अक्षरश: जाणवायची.

एकही दिवस आम्हाला ही संध्याकाळची शिकवणी चुकवावीशी वाटली नाही. त्या दिवसातल्या सगळ्याच संध्याकाळी अशा खऱ्या अर्थाने सुविद्य झालेल्या होत्या.

खुद्द परीक्षा म्हणजेही एक हवाहवासा समारंभच होता. ती परीक्षा फक्त जिल्ह्याच्य ठिकाणी म्हणजे अलिबागलाच व्हायची. त्यासाठी आठ दिवस तिथे जाऊन एखाद्या ओळखीच्या किंवा दूरच्या नातेवाईकांच्या कुटुंबात राहणं, त्यांनी अगदी जावयासारखी बडदास्त ठेवणं, सकाळी दहाच्या ठोक्याला आणि रात्री ठीक साडेआठला जेवायला वाढणं, जेवताना बुद्धिपूर्वक म्हणून भरपूर तूप वाढणं, अभ्यासाच्या किंवा झोपेच्या वेळी लहान मुलांना गोंगाट करू न देणं इ.इ.

मात्र या शिकवणीचा आणि पाहुणचाराचा म्हणावा तसा उपयोग झाला नाही. त्या वर्षी आमच्या गावातलं एकही नाव स्कॉलरशिपच्या यादीत झळकलं नाही.

पुढल्या वर्षी मुलांच्या शाळेत एक माने आडनावाच्या बाई कुठूनतरी बदलून आल्या. त्यांचा मोठा मुलगा आता दहावी की अकरावीला होता आणि त्याने तो पाचवीत असताना माध्यमिक शिष्यवृत्तीची परीक्षा दिली होती– जी तोपर्यंत आमच्या गावात कुणालाच फारशी माहिती नव्हती. त्याचे वडीलही शिक्षकच होते. ते जवळच्याच कुठल्यातरी खेडेगावच्या शाळेवर बदलून आलेले होते.

आणि त्यांना या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेची सगळी सविस्तर माहिती होती. कसं कोण जाणे पण मुलांच्या शाळेतल्या मानेबाईंना स्कॉलरशिपला बसलेल्या आम्हा काही मुलींची नावं कळली. त्यांनी निरोप पाठवून आम्हाला बोलावून घेतलं आणि या माध्यमिक परीक्षेची माहिती सांगितली.

आमच्या अण्णांनी मला त्या परीक्षेला बसवायचं ठरवल्यावर माने गुरुजींनी आपणहून माझी शिकवणी घ्यायची कबूल केली. मात्र त्यांना शेजारच्या खेड्यातल्या शाळेसाठी सकाळी नऊलाच घरातून निघावं लागायचं. त्यामुळे मी त्याच्या आधी यायला हवं अशी अट घातली. माने बाई सहस्रबुद्धे बाईंच्या दसपट कडक शिस्तीच्या... याउलट माने गुरुजी त्यांच्यापेक्षा शंभरपट मवाळ स्वभावाचे! त्यांचं बोलणं अतिशय हळू पण नेमकं. शिकवणं इतकं मन लावून की जशी काही त्यांनाच परीक्षा द्यायचीय. या परीक्षेचा अभ्यासक्रम पूर्णपणे वेगळा होता. त्यामुळे त्यांना माझी वेगळी शिकवणी घ्यावी लागायची. माझ्या शिकवणीतून त्यांना कोणताही आर्थिक लाभ होणार नव्हता. उलट त्यांच्याकडे पैसे देऊन शिकवणीसाठी येणाऱ्या मुलांना माझ्यासाठी लवकर बोलवावं लागायचं. पण माने गुरुजींच्या चेहऱ्यावर कधीही त्याबद्दल वैताग किंवा कंटाळा दिसायचा नाही.

उशिरा सुरू झाल्याने ही शिकवणी तीनचारच महिने चालली.

मात्र या शिकवणीचा शंभर टक्के उपयोग झाला. मी या परीक्षेत नुसती पासच झाले नाही, तर जिल्ह्यात पहिली आले. अर्थात याचं सगळंच श्रेय माने गुरुजींना होतं. परीक्षेची पद्धत इतकी वेगळी होती की, त्यांनी सांगितलं नसतं तर मला काहीही आलं नसतं.

पेढे द्यायला तेव्हा एरवी स्थितप्रज्ञ वाटणाऱ्या माने गुरुजींच्या डोळ्यात आनंदाचं पाणी चमकत होतं.

मला आशीर्वाद देताना ते म्हणाले, "एक लक्षात ठेव. शिष्यवृत्तीतल्या वृत्ती या शब्दाला दोन अर्थ आहेत. एक म्हणजे शिक्षणासाठी तुम्हाला मिळणारं वेतन आणि दुसरा म्हणजे आयुष्यभर विद्यार्थीच राहण्याचा स्वभाव. तू जसा पहिला अर्थ जिंकलायस तसाच दुसरा अर्थही जिंकण्याचा प्रयत्न कर. त्या अर्थाचं पालन जास्त फायदेशीर असतं. आयुष्यभर विद्यार्थी राहिलं तरच जास्तीत जास्त ज्ञान पदरात पडतं."

माझ्या त्या वयाला त्यांचं बोलणं पचवणं जरा जडच होतं. स्कॉलरशिप मिळाल्याचा आनंद आणि अभिमान मनात इतका भरून राहिलेला होता की मी तो अर्थ पुरता जाणून घ्यायच्या फंदात पडलेच नाही. फक्त आज्ञाधारकपणे मान डोलावली. त्यावेळी गावात माझे बरेच सत्कारसमारंभ झाले. शाळेत, सार्वजनिक वाचनालयात आणि शेजाऱ्यापरिचितांच्या घरी. गांगल काकूंनी मला फराळाला



बोलावून गोडाचा शिरा केला. नव्या फॅशनच्या पट्टेदार रिबीनी भेट दिल्या. अण्णांच्या ऑफिसमधल्या अप्पा कुलकर्णींनी कौतुकादाखल नवीकोरी कंपासपेटी दिली. गावातल्या एकुलत्या एका फोटोग्राफरने पेपरसाठी माझे फोटो काढले त्याचे पैसे घेतले नाहीत.

सौरभच्या बोलण्यामुळे या सगळ्या आठवणी धावत आल्या. माझ्या महिना पंचवीस रुपये शिष्यवृत्तीचा अवघ्या गावाने वाटून घेतलेला आनंद आठवला. त्यामागची शिक्षकांची, अलिबागच्या त्या अनाम यजमानांची धडपड आठवली. सहस्रबुद्धे बाईंचं बदललेलं रूप, त्या श्रीमंत संध्याकाळी... सगळं सगळं आठवून गेलं.

स्कॉलरशिप मिळण्याची एकच घटना, पण तीसचाळीस वर्षांनंतर तिचे परिणाम एवढे वेगळे असू शकतात?


खरंच काळ बदललाय की...?

— — — — — — — — — — —

***प्रमोदिनी वडके-कवळे***
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

## क्रोशा विणकाम

**क्रोशा विणकाम या अत्यंत प्राचीन कलेबद्दल संपूर्ण मार्गदर्शन करणारे. प्रत्यक्ष वाचून विणता येईल अशा सुगम शैलीत लिहिलेले पुस्तक.**




**क्रोशा**
**विणकाम**
**प्रभावती पुरम**

**किंमत २०० रु.**

विणलेल्या टेबलमॅटस्, पडदे, रुमाल कुठेही असोत, त्यांची मनमोहक डिझाईन्स आपले लक्ष वेधून घेतात. आणि ही डिझाईन्स कशी केली असतील याचे कुतूहल वाटते. एका सुईवर दोऱ्याने केलेले क्रोशाकाम सर्वांनाच आवडते

या पुस्तकात अशी अनेक डिझाईन्स पहायला मिळतील. सुई हातात कशी धरायची, टाक्यांची माहिती इथपासून विविध लेस, फुले, टेबलमॅटस, टोप्या, कॉलर्स यांच्या साठी सुंदर डिझाईन कसे विणावे याची सचित्र माहिती असणाऱ्या या पुस्तकाच्या मदतीने स्वत: कलाकुसर करा आणि आपले घर मस्त सजवा.



# पुरस्कार

### * डॉ. सुभाष दांडेकर यांचा सत्कार

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित 'चाळिशीनंतरची वाटचाल'या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक डॉ. सुभाष दांडेकर यांना समाजोपयोगी कार्याबद्दल सातारच्या 'कर्तव्य सोशल ग्रूपतर्फे' नुकतेच सन्मानित करण्यात आले.

डॉ. दांडेकर गेली पस्तीस वर्षे विविध समाजसेवाकार्यात व्यस्त आहेत. नेत्रदान संकल्पासाठी नागरिकांमधील जागृती, झोपडपट्टी भागातील नियमीत रूग्णतपासणी, वृद्धाश्रम आणि वाचनालयासोबतच डॉ. दांडेकर यांनी आरोग्यपर लिखाणही केले आहे. योगसाधनेसंदर्भातील काही पुस्तकांचे त्यांचे अनुवादही 'मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे' प्रकाशित झाले आहेत.

डॉ. दांडेकर यांना याच वर्षी रोटरी क्लब सातारा यांतर्फे व्यवसाय सेवा पुरस्कार देऊनही गौरवण्यात आले आहे.



**मा. अरुण गोडबोले यांच्या हस्ते सन्मानपत्र स्विकारताना डॉ. सुभाष दांडेकर**

## * अदूर गोपालकृष्णन, महाश्वेता देवी निर्मला देशपांडे यांना पद्मविभूषण

प्रख्यात साहित्यिका महाश्वेता देवी समाजसेविका निर्मला देशपांडे, ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक अदूर गोपालकृष्णन, नगररचनाकार चार्ल्स कोरिया प्रभृतींना पद्मविभूषण सन्मान जाहीर झाला आहे.

दिग्दर्शक सई परांजपे, उस्ताद अब्दुल हालिम जाफर खान, डॉ. गुंटर क्रूगर (मरणोत्तर), माधव गाडगीळ, तेलगू अभिनेता के. चिरंजीवी, इन्फोसिसचे नंदन निलेकणी, मुंबईचे शेरीफ आणि एअर बदलून विक्रमवीर विजयपत सिंघानिया यांचा पद्मभूषण किताबाने सन्मान करण्यात येणार आहे.

टेनिसपटू सानिया मिर्झा, शास्त्रीय गायिका वसुंधरा कोमकली, सुधा मूर्ती, नाट्यकलावंत प्रसाद सावकार, पत्रकार सुचेता दलाल आदींचा 'पद्मश्री' विजेत्या मान्यवरांच्या यादीत समावेश आहे.

तामिळनाडूचे सी. आर. कृष्णस्वामी राव, ओबेद सिद्दीकी, नॉर्मन बोरलॉग, प्रकाश नारायण टंडन, न्या. व्ही. एन. खरे, मॅगसेसे पुरस्कारविजेते कॅन्सरतज्ज्ञ डॉ. व्ही. शांता, ए. के. हंगल, उस्ताद गुलाम मुस्तफा खान (कला), एअर कमोडोर जसजित सिंग, उद्योजक के. पी. पी. नंबियार, टीसीएसचे प्रमुख एस. रामदोराई वगैरे ३६ जणांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

पद्मश्री पुरस्कारासाठी निवड झालेल्या ६१ व्यक्तींमध्ये पंकज उधास (कला), सुवालाल छगनमल बाफना (समाजकार्य), बी. व्ही. निंबकर (विज्ञान), फातिमा रफीक झकेरिया (साहित्य), स्वामीनाथन शिवराम (विज्ञान आणि इंजिनिअरिंग), तेहम्टन उडवाडिया (वैद्यकशास्त्र), मृणाल पांडे (पत्रकार), उस्ताद रशीद खान (कला), डॉ. उपेंद्र कौल (वैद्यक), बहादूर सिंग, बॅडमिंटनपटू मधुमिता बिश्त (क्रीडा), सौंदर्यतज्ज्ञ शहनाझ हुसेन यांचा समावेश आहे.

## * विश्वविवेक पुरस्कार

विश्वविवेक फाउंडेशनच्या वतीने संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे, टाटा मोटर्सचे महाव्यवस्थापक मनोहर पारळकर, बांधकाम व्यावसायिक राजेशकुमार सांकला यांच्यासह २१ जणांना विश्वविवेक पुरस्कार २८ जानेवारी खासदार सुरेश कलमाडी, सहकारमंत्री पतंगराव कदम, पुण्याच्या महापौर रजनी त्रिभुवन, पिंपरीच्या महापौर मंगला कदम यांच्या उपस्थितीत रोजी देण्यात आले.

पुरस्कारविजेत्यांची नावे पुढीप्रमाणे – डॉ. रामचंद्र देखणे (सांस्कृतिक क्षेत्र), मनोज देवळेकर (क्रीडा), राजेशकुमार सांकला (व्यवसाय), मुक्ता मनोहर (कामगार), अरुण कांबळे (पत्रकारिता), अनिल ललवाणी (सामाजिक कार्य), मनोहर पारळकर (मनुष्यबळ विकास), डॉ. आशा पाचपांडे (शिक्षण), डॉ. दिलीप कामत (वैद्यकीय), कुंडलिक कारकर (प्रशासकीय), पी. आय. वर्गीस (उद्योग), तेजश्री अडिगे (कला), ॲड. एम. बालकृष्णन (कायदा), चंद्रकांत दोशी (चार्टर्ड अकाउंटंट), टाटा मोटर्स गृहिणी उद्योग, अध्यक्षा - प्रभाताई गुजराथी (सामाजिक संस्था), कुमार जोशी, मधुकर वडके, पंढरीनाथ कामठे, रमेश विटकर (ज्येष्ठ नागरिक), पै. विजय हनुमंत गावडे व सोनाली चंद्रकांत गारगोटे (उदयोन्मुख खेळाडू).

## * वामन होवाळ यांना 'मुकादम साहित्य पुरस्कार'

कराडमधील श्री.स.गा.म. विद्यालय आणि पां.दे. अध्यापक विद्यालय, कुसूरच्या माजी विद्यार्थी संघामार्फत वामन होवाळ यांच्या ऑडिट या साहित्यकृतीला २९ जानेवारी रोजी देण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे अध्यक्षस्थानी होते. रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव भोईटे हे उपस्थित होते.

## * आगरी साहित्याच्या विकासासाठी पुरस्कार

आगरी बोली, आगरी लोकसंस्कृती आणि लोकपरंपरा यांचे जतन व्हावे म्हणून प्रयत्न करणाऱ्या आगरी साहित्य विकास मंडळाच्या पेण शाखेतर्फे 'जिल्हास्तरीय आगरी साहित्य गौरव पुरस्कार' दिला जाणार आहे.

प्रथम पारितोषिक ३००१ रुपये, दुसरे २००१ व तिसरे १००१ रुपयांचे आहे. लेखनातील कामगिरीसाठी १००१ रुपयांचा पुरस्कार आहे.

१ जानेवारी २००४ ते ३१ डिसेंबर २००५ दरम्यान प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांच्या प्रती तसेच लेखनातील कामगिरीचा तपशील मुरलीधर गंगाराम म्हात्रे, शंकर रामा, म्हात्रे कॉम्प्लेक्स, चिंचापाडा रोड, नगरपालिकेसमोर, पेण, जि. रायगडे फोन (२५२४१५) किंवा सूर्यकांत पाटील, आर्टिस्ट हाऊस, रामवाडी, ता. पेण, जि. रायगड (फोन २५२७४४) येथे पाठवावा.

## * सुधीर फडके पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने सुधीर फडके पुरस्कार यंदा विभावती आपटे जोशी, राहुल घोरपडे तसेच निगडी येथील संवादिनी संगीत कला अकादमी यांना देण्यात आले.

संगीत क्षेत्रात विशेष ठसा उमटवणाऱ्या उमेदीच्या गायकास, संगीत दिग्दर्शकास तसेच संस्थेस हा पुरस्कार देण्यात येतो.

## * दाते स्मृतिसंस्थेचे पुरस्कार

विदर्भातील वाङ्मयीन उपक्रमात सातत्याने अग्रेसर असलेल्या यशवंतराव दाते स्मृती संस्थेचे पुरस्कार बाबाराव मुसळे, कविता महाजन, रवींद्र शोभणे आणि सुहास जेवळीकर यांना देण्यात आले.

कादंबरीकार बाबा पदमनजी यांच्या नावे दिला जाणारा पुरस्कार कादंबरीकार बाबाराव मुसळे यांच्या 'वारूळ' आणि कविता महाजन यांच्या 'ब्र' कादंबरीला संयुक्तरीत्या मिळाला. बापूराव देशमुख कथासंग्रह पुरस्कार डॉ. रवींद्र शोभणे यांच्या 'तद्‌भव' आणि सुमती वानखेडे यांच्या 'जाणता-अजाणता' या पुस्तकांना दिला गेला. यंदाच्या वर्षापासून सुरू केलेल्या सामाजिक प्रबोधनकार संत भगवानबाबा पुरस्काराचे पहिले मानकरी 'दहशतीची दैनंदिनी'चे कवी सुहास जेवळीकर ठरले.

### * डॉ. अशोक कामत यांना 'महात्मा गांधी पुरस्कार'

पुणे येथील डॉ. अशोक कामत यांना आचार्य राममूर्ती त्रिपाठी यांच्या हस्ते 'महात्मा गांधी पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. ५१ हजार रुपये, शाल-श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

हिंदी भाषेची सेवा हा माझा व्यवसाय नव्हे. मी ते व्रत समजतो. माझ्यासाठी ज्ञान, संपर्क आणि व्यक्तिमत्त्व विकासाची भाषा हिंदीच आहे, असे मनोगत डॉ. अशोक कामत यांनी व्यक्त केले. माझ्या मार्गदर्शनात ५० विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी प्राप्त केली. हिंदी भाषेच्या प्रचारकार्यासाठी मी यात्रेकरू झालो. पंजाबात नामदेवांच्या पाऊलखुणा शोधत मी शीख समुदायाचा इतिहास लिहिला. ४० वर्षांच्या साहित्य आणि सार्वजनिक वाटचालीत हिंदीने मला आधार दिला, अशी माहिती डॉ. कामत यांनी दिली.

उद्‌घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रभाषा प्रचार समितीचे अध्यक्ष मधुकरराव चौधरी होते. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे कुलपती डॉ. जी. गोपीनाथन, राष्ट्रभाषा प्रचार समितीचे प्रधानमंत्री अनंतराम त्रिपाठी प्रमुख पाहुणे होते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या कामकाजात हिंदीचा 'आंतरराष्ट्रीय भाषा' म्हणून समावेश झाला तर हा समृद्ध भाषेचा सन्मान ठरेल, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख यांनी १० व्या अखिल भारतीय राष्ट्रभाषा प्रचार संमेलनाच्या उद्‌घाटन प्रसंगी केले.

### * शंकर सारडा यांना मराठवाडा साहित्य परिषदेचा पुरस्कार जाहीर

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने २००४ या वर्षाचे वाङ्मय पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा (पुणे), डॉ. रेखा साने (पुणे), प्रा. प्रकाश देशपांडे, पी. डी. चौधरी (अमरावती) आणि मंगेश काळे (सोयगाव) व प्रा. त्र्यंबक महाजन (औरंगाबाद) हे पुरस्काराचे मानकरी आहेत.

गेल्या चार दशकांपासून मराठी पुस्तकांवर समीक्षणपर लेखन करणारे ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांना रा. ज. देशमुख स्मृती पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. ग्रंथ व्यवहारात महत्त्वाचे कार्य करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार देण्यात येतो. शंकर सारडा यांनी मराठी साहित्य सामान्य वाचकापर्यंत पोहोचविण्याचे



महत्त्वाचे कार्य केले आहे; त्यामुळे रा. ज. देशमुख पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. २००० रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

मराठीतील समीक्षा व वैचारिक वाङ्मय वा क्षेत्रातील उत्कृष्ट ग्रंथास दिल्या जाणाऱ्या म. भि. चिटणीस पुरस्कारासाठी पुण्याच्या डॉ. रेखा इनामदार-साने यांच्या 'अस्तित्ववाद आणि मराठी कादंबरी' या ग्रंथाची निवड करण्यात आली आहे.

नरेंद्र मोहरीर पुरस्कार अमरावतीचे पी. डी. चौधरी यांना मिळाला आहे. इतिहास, संस्कृती, सौंदर्यशास्त्र, कला आणि वाङ्मय यांची मीमांसा करणाऱ्या मराठीतील सर्वोत्कृष्ट ग्रंथास देण्यात येणारा नरेंद्र मोहरीर पुरस्कार पी. डी. चौधरी यांच्या 'सौंदर्यशास्त्राचे स्वरूप' या ग्रंथास देण्यात आला आहे.

### * पं. तुलसीदास बोरकर यांचा सत्कार

पं. तुलसीदास बोरकर यांना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सोहम प्रतिष्ठानतर्फे त्यांच्या सत्कारासाठी दीनानाथ नाट्यगृहात मैफल आयोजित केली होती. या 'संगीत रस सुरस' मैफलीतील सर्व कलाकारांना खुद्द पं. बोरकरांनी ऑर्गनवर साथ दिली.

ज्येष्ठ कलावंत लालजी देसाई यांची नांदी झाल्यानंतर सूत्रधार म्हणून रंगभूमीवर आलेल्या सागर-मुक्ता यांनी महाराष्ट्राच्या नाट्यपरंपरेचा धावता आढावा घेतला. यानंतर अर्चना गोरे यांनी 'मम आत्मा गमला' नाट्यगीत सादर केल्यावर मंजुषा कुलकर्णी-पाटील यांनी 'नाथ हा माझा', 'मधुकर वन', 'का धरिला परदेश साजणा' पदांनी श्रोत्यांना खूश केले. मंदार आपटे यांनी 'रतीहुनी सुंदर मदन' तर राहुल देशपांडे यांनी 'मृगनयना गुलजार नार', 'तेजोनिधी' तर स्वाती आपटे 'श्रीरंगा कमला कांता' गीत सादर केले. सर्वात शेवटी ज्येष्ठ गायक विजय कोपरकर यांनीही दोन पदे सादर केली. मध्यंतरात ज्येष्ठ तबलापटू पंढरीनाथ नागेशकर यांच्या हस्ते पं. बोरकर यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास आमदार विलास अवचट, सुभाष पुणेकर, अण्णाभाऊ साठे आदी उपस्थित होते.

### * डॉ. जब्बार पटेल यांना सेवागौरव पुरस्कार जाहीर

साहित्य संगीत कला अकादमीतर्फे दिला जाणारा सेवागौरव पुरस्कार यंदा दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना जाहीर झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील चित्रपटाची पुरस्कारासाठी निवड केल्याचे अकादमीचे अध्यक्ष सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी सांगितले.

अकादमीतर्फे देण्यात येणारे 'विशेष सेवा पुरस्कार' यंदा प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठलराव लहाणे, एड्स रुग्णांसाठी कार्यरत असलेले डॉ. उगिले, डॉ. कनकारिया आणि शिक्षक बाबासाहेब देशमुख यांना देण्यात येणार आहेत.

### * बवले, जोशी यांना (अंकुर) पुरस्कार

'अंकुर साहित्य संघा'तर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी चित्रकार रामदास बवले यांचे 'अक्षर संस्कार' व संगीता जोशी यांचे 'चांदणे उन्हातले' या पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. बवले यांच्या 'अक्षर संस्कार' या पुस्तकास नुकताच अखिल भारतीय मराठी प्रकाशन संघाचा राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार मिळाला आहे.

### * 'गोदागौरव' पुरस्कार

कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे एक वर्षाआड देण्यात येणाऱ्या गोदावरी गौरवासाठी यंदा प्रसिद्ध नाट्य दिग्दर्शिका विजया मेहता यांच्यासह शीतल महाजन, रवी परांजपे, भीमराव गस्ती, पंडित रामनारायण व अरविंदकुमार या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांची निवड केली आहे.

प्रत्येकी ११ हजार रुपये, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह असे 'गोदागौरव'चे स्वरूप आहे.

१० मार्च रोजी नाशिक येथे 'गोदागौरव' पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

मराठी रंगभूमीवर प्रायोगिकतेची चळवळ उभारून नाट्याला नव्या प्रवाहाचे वळण दिल्याबद्दल ज्येष्ठ दिग्दर्शिका विजया मेहता यांची निवड गोदागौरवसाठी झाली आहे. उत्तर ध्रुवावर उडी मारणारी पहिली भारतीय महिला असा बहुमान प्राप्त करणाऱ्या पुण्याच्या शीतल महाजनच्या साहसालाही प्रतिष्ठानने दाद दिली आहे. दर्जेदार रेखांकन, अजोड रंगभाने, लक्षवेधी चित्ररचना आणि चित्रविषयक उत्कट भावाविष्कार ही वैशिष्ट्ये जपलेल्या चित्रकार रवी परांजपे यांच्या कार्याची दखल प्रतिष्ठानने घेतली आहे. तसेच अंधश्रद्धा निर्मूलन व पर्यावरणासंदर्भात विशेष कामगिरी केल्याबद्दल डॉ. भीमराव गस्ती, 'सारंगी' या तारवाद्याला लोकप्रियता मिळवून देणारे पंडित रामनारायण व ज्ञान-विज्ञान क्षेत्रातील कामगिरीबद्दल डॉ. होमी भाभा विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. अरविंदकुमार यांचाही यंदाच्या मानकऱ्यांमध्ये समावेश आहे.

### * वैभव जांभेकर

इकॉनॉमिक टाइम्स आणि अमेरिकेतील व्हार्टन स्कूल ऑफ मॅनेजमेंटतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'नॉलेज ॲट व्हार्टन' या मासिकाने अलीकडेच एक निबंध स्पर्धा घेतली होती. विषय होता, भारत आणि चीन एकमेकांपासून काय शिकू शकतात?' या स्पर्धेमध्ये १८० भारतीय; तर ३०० चिनी विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यामध्ये पहिला नंबर पटकाणारे वैभव जांभेकर हे बंगलोर येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'चे विद्यार्थी. ते मूळचे नाशिकचे. त्यांचं शालेय शिक्षण बॉईज् पब्लिक स्कूलमध्ये झालं. नंतर ते गव्हर्नमेंट कॉलेज कराड येथून मेकॅनिकल



इंजिनिअर झाले. शिक्षण पूर्ण होताच पुण्यातील 'किर्लोस्कर ऑईल इंजिन'मध्ये नोकरीला लागले; पण वर्षभराने नोकरीतून बाहेर पडून ते एनआयटीआयईमध्ये दाखल झाले. 'इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग'चं पदव्युत्तर शिक्षण घेऊन नॉयडा येथील 'इंडस्ट्रिअल अँड फायनान्स सिस्टिम्स'चे इआरपी कन्सल्टंट म्हणून काम केले. परंतु आपल्या ज्ञानाच्या कक्षा सतत वाढविण्याचा ध्यास असलेल्या जांभेकरांनी त्या नोकरीलाही रामराम ठोकला आणि बंगलोर येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'मध्ये व्यवस्थापनशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण घेतले. स्ट्रॅटेजी स्वतंत्र बुद्धीने वाचन करणाऱ्यांमध्ये असा स्वतंत्र, तौलनिक, वस्तुनिष्ठ दृष्टिकोन विकसित होतोच. वर्तमानाचे भान जागते राहते. भविष्याचा वेध घेण्याची नजर तयार होते. अलीकडेच झालेल्या स्पर्धेत ते पूर्ण तयारीने उतरले आणि ४८० विद्यार्थ्यांत पहिले आले. त्यांचा निबंध इकॉनॉमिक टाइम्समध्ये प्रसिद्धही झाला. आता तो अमेरिकेतील 'नॉलेज ॲट व्हार्टन'मध्येही प्रसिद्ध होणार आहे. दोन्ही देशांची वस्तुनिष्ठ तुलना, उभय देशांच्या सरकारांच्या धोरणांचे दृश्य परिणाम, भारतीयांना झालेला इंग्रजी भाषेच्या ज्ञानाचा फायदा, चीनने आपल्या लोकसंख्येचा खुबीने करून घेतलेला उपयोग अशा अनेक मुद्द्यांचे विवरण जांभेकर यांनी केले आहे.

### * बंडा जोशी यांना 'हरि-गंगा पुरस्कार'

साहित्य व कला क्षेत्रातील कामगिरीबद्दल प्रतिवर्षी देण्यात येणारा 'हरि-गंगा पुरस्कार' प्रसिद्ध निवेदक बंडा जोशी यांना देण्यात आला. रोख पाच हजार एक रुपये, गौरवचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांच्या हस्ते धन्वंतरी सभागृहात पुरस्कार दिल्यावर र. ह. कुलकर्णी यांच्या 'अक्षरांचा मेळावा' या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले.

### * धर्मराज निमसरकार यांच्या कवितासंग्रहास पारितोषिक

'लोकानुकंपा' त्रैमासिकाच्या वतीने देण्यात येणारे उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीचे प्रथम क्रमांकाचे राज्यस्तरीय पारितोषिक धर्मराज निमसरकर यांच्या 'रणांगणावरील निळी गर्भाळ पहाट' या कवितासंग्रहाला मिळाले आहे.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या हस्ते वर्धा येथे या पारितोषिकाचे वितरण करण्यात आले.

### * रोमिला थापर यांना इतिहासाचार्य राजवाडे पुरस्कार

इतिहासकार रोमिला थापर यांना डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी सुरू केलेला इतिहासाचार्य वि. का. राजवाडे पुरस्कार मिळाला असून त्यांना तो विश्वभारती येथे नुकत्याच पार पडलेल्या हिस्टरी काँग्रेसमध्ये प्रदान करण्यात आला.

वि. का. राजवाडे या थोर मराठी इतिहासकारांनी आयुष्यभर तत्त्वाचा आग्रह म्हणून केवळ मराठीत लेखन केले. त्यामुळे त्यांचे नाव जगभर होऊ शकले

नाही. निदान त्यांचे भारतातल्या संशोधकांना स्मरण तरी राहावे, या हेतूने ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ आणि माजी कुलगुरू डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी स्वत: हिस्टरी काँग्रेसकडे सव्वा लाख रुपयांचा निधी दिला आहे. या निधीतून दर दोन वर्षांनी एका अभ्यासकाला राजवाडे पुरस्कार द्यावा, अशी योजना आहे. तो २५ हजारांचा पुरस्कार ज्येष्ठ संशोधक रोमिला थापर यांना देण्यात आला. विश्वभारती येथे तो दिला; तेव्हा स्वत: थापर मात्र हजर राहू शकल्या नाहीत. रवींद्रनाथांचे स्मरण करून विश्वभारती इथे झालेल्या यंदाच्या इंडियन हिस्टरी काँग्रेसचे वैशिष्ट्य म्हणजे पुढच्या, ६७ व्या काँग्रेसचे जनरल प्रेसिडेन्ट म्हणून मुंबईचे प्रा. जे. व्ही. नाईक यांची झालेली निवड. प्रा. नाईक मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख होते.

### * 'लमाण' ही मला स्वत:चीच कहाणी वाटते

''डॉ. लागू यांचे आत्मचरित्र वाचताना ते आपलेसे वाटते. इतके की मी त्यात एखादा परिच्छेद मिळविला असता, तरी चालून गेले असते. मी कधी आत्मचरित्र लिहिलेच; तर ते 'लमाण'सारखे असेल. 'लमाण' ही मला स्वत:चीच कहाणी वाटते,'' असे मत ज्ञानपीठ पुरस्कारविजेते ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गिरीश कर्नाड यांनी व्यक्त केले.

'पॉप्युलर प्रकाशना'तर्फे आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. लागू यांना 'लमाण' आत्मचरित्रासाठी 'सत्यभामाबाई गाडगीळ पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी गंगाधर गाडगीळ होते. पॉप्युलर प्रकाशनाचे रामदास भटकळ या वेळी उपस्थित होते.

मुंबईच्या 'वालचंद टेरेस'वर त्याकाळी अनेक नाट्यवेडे जमत, अशी आठवण सांगून डॉ. कर्नाड म्हणाले, ''तेंडुलकर, दुबे, डॉ. लागू, बादल सरकार अशा दिग्गजांच्या नाटकावर चर्चा होत. हा सगळा काळ पाहिल्यामुळे 'लमाण'शी जवळीक वाटते. नाटक ही परावलंबी कला आहे. तिच्यासाठी बराच त्रास सहन करावा लागतो; पण नाटक घडते, तेव्हा मिळणारा आनंद निराळाच असतो. माझ्या 'ययाती' नाटकामध्ये डॉ. लागूंनी अभिनय केला होता; पण ते त्याविषयी समाधानी नव्हते. 'तुघलक'मध्ये त्यांनी काम करावे, अशी माझी इच्छा होती.'' डॉ. लागू म्हणाले, '''लमाण'हे आत्मचरित्र नव्हे; तो माझा नाट्यप्रवास आहे. आत्मचरित्रात अनेक गोष्टी लिहायच्या नसतात; पण त्या वाचकांना हव्या असतात. 'लमाण' अनेकांना आवडते; पण का ते कळत नाही. मी आयुष्यभर नाटकच जगलो, यात काय कौतुक? यापुढे एकही पुस्तक लिहायचे नाही, असे ठरविले आहे.'' गाडगीळ म्हणाले, ''नवनाट्याच्या चळवळीची जिवंत कथा म्हणजे 'लमाण'. या कथेतील बारकावे आणि सौंदर्य अनुभवलेच पाहिजे.

### * गिरीश कर्नाड यांना पुल स्मृती पुरस्कार

''महाराष्ट्राला आवडणाऱ्या संगीत, नाटक, साहित्य आणि दातृत्व या कलांचा एकत्रित संगम 'पुलं'च्या व्यक्तिमत्त्वामध्ये होता. विविधांगी कलांचा सादरकर्ता 'पुल' म्हणजे एक उत्सवच,'' अशा शब्दांत ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर गाडगीळ यांनी 'पुलं'विषयीच्या भावना व्यक्त केल्या.

'आशय सांस्कृतिक' आणि 'परांजपे स्कीम्स'तर्फे आयोजिण्यात आलेल्या तिसऱ्या पुलोत्सवाचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते रसिकांवर पुष्प पाकळ्यांच्या वर्षावाने झाले. 'पु. ल. स्मृती पुरस्कारा'ने ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि लेखक गिरीश कर्नाड यांना सन्मानित करण्यात आले. 'आशय'चे सचिव सतीश जकातदार व वीरेंद्र चित्राव या वेळी उपस्थित होते.

कलेच्या अनेक क्षेत्रांमध्ये 'पुल' वाकबगार होते असे सांगून श्री. गाडगीळ म्हणाले, ''माणसांच्या सूक्ष्म निरीक्षणातून लकबी टिपण्याची सवय त्यांना होती. त्यांच्या व्यक्तिचित्रांमध्ये त्याचे प्रतिबिंब जाणवते. उत्कृष्ट नकलाकार असणारे पुल संगीतातील बारकावेही अचूक हेरायचे.''

पुरस्कार स्वीकारल्यानंतर गिरीश कर्नाड म्हणाले, ''विद्यार्थी दशेपासून मी पुलंच्या व्यक्तिमत्त्वाने प्रेरित झालो आहे. कन्नड रंगभूमीवर सहजरीत्या वावरू शकलो, त्याची बीजेही पुलंमुळेच रुजली. मराठी रंगभूमीशी पहिली ओळख त्यांच्या नाटकांमुळे झाली. 'पुलं' हे बहुविध कलांचे हरहुन्नरी सादरकर्ते होते.''

कलाक्षेत्रातील प्रतिभेची चतुरस्रता मोजताना 'पुल पट्टी' अथवा 'पुल स्केल' हा मापदंड गणला जावा, असे मत 'सकाळ'चे आनंद आगाशे यांनी व्यक्त केले. मीनल परांजपे, अशोक दुगाडे आणि डी. आर. स्वार यांनीही मनोगत प्रकट केले. वीरेंद्र चित्राव यांनी प्रास्ताविक केले, तर सुप्रिया चित्राव यांनी सूत्रसंचालन केले.

### * गो. पु. देशपांडे यांना सातारा भूषण पुरस्कार

रा. ना. गोडबोले ट्रस्टच्या वतीने यावर्षीचा 'साताराभूषण' पुरस्कार डॉ. गो. पु. देशपांडे यांना 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. राम बापट होते. मुकुंद संगोराम हेही कार्यक्रमास उपस्थित होते.

डॉ. गो. पु. देशपांडे म्हणाले की, तसा मी वास्तववदर्शी आहे. राजकारणातील माणसांविषयी मला अनादर नाही. राजकीय नेतृत्वाचे वाटेल ते गुणदोष असले तरी यापूर्वी त्यांना सांस्कृतिकतेचे भान होते. आज नाटकाला वाईट दिवस आले आहेत. लेखकाच्या स्वातंत्र्यावर गदा आली आहे. आकाश निरभ्र होते, ते निखळ राहिलेले नाही. लाठी फिरवणे व लेखणी फिरवणे यात फरक वाटेनासा झाला आहे, याचे कुठे तरी दु:ख होते. संवाद, व्यवहार नष्ट झाला आहे. सांस्कृतिक व्यवहारावर आलेले हे ग्रहण सर्वांना खाऊन टाकणारे आहे.

साहित्य लेखन व्यवहारातील मोकळेपणा नष्ट होत चालला आहे. लेखन

स्वातंत्र्य टिकवणे हा लढा केवळ वाचकांचा व लेखकांचाही नाही. तो सर्वांचा आहे. जिथे, जिथे स्वातंत्र्याची गळचेपी होते ती थांबवली पाहिजे. साहित्याच्या नावाखाली दोन प्रवाह कार्यरत आहेत. एक साहित्यालाच महत्त्व देऊन सामाजिकतेला फाटा देतो तर दुसरा सामाजिकतेला महत्त्व देऊन साहित्याकडे दुर्लक्ष करतो. एकमेकांना परस्परांची गरज वाटत नाही. अर्थहीन ध्वनिकल्लोळ निर्माण झाला आहे तो थांबविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. गो. पु. देशपांडे यांच्यासारखा वैचारिकतेचे व सामाजिकतेचे आव्हान पेलणारा एकही नाटककार महाराष्ट्रात नाही. विजय तेंडुलकर केवळ भावनात्मकतेला आव्हान देऊन वास्तवतेचे भान देतात, असे प्रतिपादन 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी केले. १९६६ ते १९७६ या कालखंडात सांस्कृतिक क्रांतीची व चळवळींची वेगवेगळी आवर्तने घेणारे व सर्जनशीलतेला आव्हान देणारे प्रक्षोभाचे वातावरण होते. त्या वेळी दिल्लीत 'गो.पुं.'शी आपला परिचय झाला. या सहवासात अनेक तत्कालीन विषयांवर संवाद-चर्चा झाल्या. ते अधिकृत डावे आहेत. मार्क्सवाद हा त्यांच्या वैचारिकतेचा मुख्य पाया आहे. नंतरचे डावे-उजवे राजकारण हे एकमेकांना नामोहरम करण्यासाठी झाले. विचारप्रणालीचा त्यांच्यासारखा नाटककार कोणी झालेला नाही. लौकिकार्थाने जो मान त्यांना मिळायला पाहिजे होता तो मिळालेला नाही. त्यांच्या हातून देशासाठी खूप घडण्यासारखे होते ते घडू शकले नाही. विद्वान, सर्जनशील, विचारवंत, लेखक, चिनी भाषा व गाढा अभ्यासक असूनही दिल्लीकरांना त्यांचे महत्त्व जाणवले नाही हे आपले दुर्भाग्य आहे. प्रतिष्ठेची सीमा ओलांडून आपण त्यांच्या चीन संबंधांच्या मांडणीला दाद द्यायला हवी होती असे श्री. केतकर म्हणाले.

प्रा. राम बापट म्हणाले की, देशपांडे हे अस्सल सर्जनशील मार्क्सवादी विचारवंत आहेत. त्यांची भाषाशैली हेवा करावी अशी आहे. राजकारणाविषयी त्यांना आत्मीयता आहे. सत्तेच्या वास्तवाचे भाष्य करताना ते कौटिल्यापासून जगभरच्या विचारवंतांचा मागोवा घेतात. मार्क्सवादी असले तरी गांधीवादी वृत्ती दाखवतात. वर्गसंघर्षाचा व जातीनिर्मूलनाचा विचार वैचारिक, व्यावहारिक पातळीवर करणारा त्यांच्यासारखा दुसरा विचारवंत नाही. म. फुल्यांना त्यांनी अखिल भारतीय पातळीवर नेले. जातीनिर्मूलनाच्या संदर्भात त्यांची ओळख करून दिली.

मकरंद साठे यांनी गो.पुं.च्या नाटकांचे मराठी नाट्यसृष्टीवर काय परिणाम झाले, याचे विवेचन करून त्याचे ऐतिहासिक महत्त्व विशद केले.

## * गिरीश प्रभुणे यांना 'श्रीगमा स्मृती' पुरस्कार

'माणूस प्रतिष्ठान'च्या वतीने देण्यात येणारा यंदाचा 'श्रीगमा स्मृती पुरस्कार' सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांना जाहीर झाला आहे. अकरा हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



प्रभुणे भटक्या व विमुक्तांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहेत. 'माणूस'कार श्री. ग. माजगावकर यांच्या नवव्या स्मृतिदिनानिमित्त ज्येष्ठ विचारवंत स. ह. देशपांडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

## * स्नेहवर्धन प्रकाशनातर्फे ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार

स्नेहवर्धन प्रकाशन पुरस्कृत ग्रंथश्रेष्ठता पुरस्कारांसाठी खालील विषयांवरील पुस्तके प्रत्येकी दोन प्रतीत प्रकाशक किंवा लेखक यांच्याकडून मागविण्यात येत आहे. १ जानेवारी २००४ पासून ३१ डिसेंबर २००५ या कालावधीत प्रकाशित झालेल्या पुस्तकांना खालीलप्रमाणे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

१) डॉ. प्र. न. जोशी... संतमित्र ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार... ५००० व मानचिन्ह

२) डॉ. प्र. न. जोशी... विज्ञानमित्र ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार... १००० व मानचिन्ह

३) डॉ. वि. भि. कोलते... समीक्षामित्र ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार... ३००० व मानचिन्ह

४) संजीवनी मराठे... साहित्यसखी ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार (लेखिकेस) १००० व मानचिन्ह

५) संजीवनी मराठे... साहित्यसखी ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार (प्रकाशकांना) ५०० व मानचिन्ह

६) निर्मला व गोपाळ महादेव किराणे प्रकाशकमित्र उत्कृष्ट निर्मिती ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार (प्रकाशकांना) ५००० व मानचिन्ह

नियम :

अ) १ जानेवारी २००४ पासून ३१ डिसेंबर २००५ पर्यंत प्रकाशित झालेली पुस्तके असावीत.

ब) प्रकाशित पुस्तके खालील विषयांवरील असावीत.

१) संतवाङ्मयविषयक पुस्तके

२) विज्ञानविषयक पुस्तके

३) समीक्षा-संदर्भ-वैचारिक ग्रंथ

४) स्त्री लेखिकांनी लिहिलेली पुस्तके

५) उत्कृष्ट निर्मिती ग्रंथ

क) पुस्तके १ मार्च २००६ पर्यंत पाठवावीत.

२४ एप्रिल २००६ रोजी पुरस्कार वितरण समारंभ होईल.

❐




### * डॉ. प्र. ना. अवसरीकर यांचे निधन

संत आणि अध्यात्मावरील साहित्याचे गाढे व्यासंगी, लेखक डॉ. प्र. ना. अवसरीकर (वय ७१) यांचे १९ जानेवारी रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा, सून व नात असा परिवार आहे. अवसरीकर यांनी १९५७ पासून वृत्तपत्रांत नियमित पत्रलेखन केले आहे. मराठी कादंबऱ्यांवरील त्यांच्या प्रबंधाच्या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेने श्री. ना. बनहट्टी पुरस्काराने गौरविले होते. बंगाली तत्त्वज्ञ श्री. उपेंद्रमोहन यांच्या चरित्राचा त्यांनी अनुवाद केला होता. आकाशवाणीवरील चिंतन या सदरासाठी अनेक वर्षे त्यांनी अध्यात्म आणि तत्त्वज्ञानावर भाषणे लिहिली. गीताधर्म मंडळात ते नियमितपणे ज्ञानेश्वरीवर प्रवचने देत होते. सासवडच्या वाघिरे विद्यालयात मराठी विभागाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी काम केले.

### * चित्रकार माधव सातवळेकर

ज्येष्ठ चित्रकार माधव श्रीपाद सातवळेकर (वय ९०) यांचे १६ जानेवारीला हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी आणि दोन मुलगे असा परिवार आहे.

जुलैमध्ये मुंबईत झालेल्या अतिवृष्टीचा फटका बांद्र्याच्या कलानगरीतील सातवळेकरांच्या घरालाही बसला होता. अमूल्य असा चित्रसंग्रह भिजल्यामुळे ते निराश झाले होते. वातावरणात बदल म्हणून ते अहमदाबादला मुलाच्या घरी राहावयास आले होते. अहमदाबादमध्ये गेल्या चार महिन्यांच्या वास्तव्यात ते पुन्हा नव्या उत्साहाने कामही करू लागले होते.

माधवरावांचा जन्म १३ ऑगस्ट १९१५ रोजी लाहोरला झाला. वडील पं. श्रीपाद सातवळेकर यांच्याकडून कलेचा वारसा घेतलेल्या माधवरावांनी मुंबईच्या प्रख्यात 'जे. जे. स्कूल आर्ट्स'मधून पदवी संपादन केली. प्रतिष्ठित मानले जाणारे 'मेयो' हे सुवर्णपदक त्यांनी पटकावले होते. उच्च शिक्षणासाठी ते युरोपला गेले. इटलीतील फ्लॉरेन्स ॲकॅडमी, लंडनमधील स्लेड स्कूल आणि पॅरिसमध्ये त्यांनी चित्रकलेचे पदव्युत्तर शिक्षण घेतले.

सातवळेकरांचे पहिले प्रदर्शन मुंबईमध्ये १९४५ मध्ये भरले होते. त्यानंतर आजतागायत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या चित्रांची ३० प्रदर्शने पार पडली. कलेशी पक्की निष्ठा असलेले माधवराव तरुणांना शिक्षण देण्यासाठी झटत असत. याच भावनेतून मुंबईतील 'इंडियन आर्ट इन्स्टिट्यूट' आणि संस्थांच्या उभारणीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. ते १९६२ ते १९६८ या काळात 'बॉम्बे आर्ट सोसायटी'चे अध्यक्ष होते. १९६९ मध्ये त्यांनी राज्याच्या कलासंचालक पदावर नेमणूक झाली. त्यांच्याच कार्यकाळात महाराष्ट्रात कलाविषयक फाउंडेशन अभ्यासक्रम सुरू झाले.

### * प्रभात फिल्म कंपनीचे संचालक शरद पै

'प्रभात फिल्म कंपनी'चे संचालक शरद बाबूराव पै २८ जानेवारीला मुंबई येथे निधन झाले.

बाबूराव पै यांचे ते ज्येष्ठ चिरंजीव होत. गेल्या दोन महिन्यांपासून मेंदूच्या विकाराने ते आजारी होते. पुण्यातील 'प्रभात' चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्शनाचे काम ते गेली २५ वर्षे करीत होते. त्यांच्या मागे ९६ वर्षांची आई, पत्नी, दोन विवाहित कन्या, बहिणी व एक भाऊ असा परिवार आहे.

'प्रभात'च्या यशात शरद पै यांचा मोलाचा वाटा होता. 'प्रभात'ला चित्रपट मिळवून देण्याचे काम त्यांनी मुंबईत राहून केले. मराठी चित्रपटाला लोकप्रियता मिळवून देण्यातही त्यांचे मोठे योगदान आहे.

### * पं. लक्ष्मणशास्त्री शेंड्ये यांचे निधन

ज्येष्ठ संस्कृत पंडित लक्ष्मणशास्त्री शेंड्ये (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने २८ जानेवारी रोजी पुणे येथे निधन झाले. पं. शेंड्ये हे अठरा महापुराणांचे पारायणकार होते. गीर्वाणवाग्वर्धिनी सभा, संस्कृत वक्तृत्व सभा, श्रीरामेश्वर ऋग्वेदी ब्रह्मवृंद मंडळ या संस्थांच्या अध्यक्षपदावर ते कार्यरत होते.

### * प्राचार्य डॉ. दिनकर विष्णू जोशी

जळगाव, जामोद येथील श्री. कृ. कोल्हटकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर विष्णू जोशी यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. शैक्षणिक आयुष्यात वि. स. खांडेकर, कुसुमाग्रजांचे मार्गदर्शन लाभल्याने नाटक, रूपक, ललित कथासंग्रह, कादंबऱ्या वगैरे लेखन त्यांनी केले.

चाळीसच्यावर नभोनाट्ये, १० कादंबऱ्या, ८ नाटके, ६ बालकथासंग्रह आणि १२ एकांकिका अशी साहित्यसंपदा डॉ. जोशी यांच्या नावावर आहे. पुणे, मुंबई, नागपूर आदी आकाशवाणी कार्यक्रमात त्यांची नभोनाट्ये प्रसारित झाली. त्यांच्या कादंबऱ्यांचे उर्दू भाषेत अनुवाद झाले आहेत. बालभारतीच्या अभ्यासक्रमातही समावेश झाला आहे. अनेक पीएच.डी. प्रबंधांनाही डॉ. जोशी यांनी मार्गदर्शन केले होते. ❐

# बालनगरी

## अनुक्रमणिका

**सशाची करामत १०१**



# सशाची करामत

चिकू नावाचा एक ससा खूप खोडकर होता. दुसऱ्या प्राण्यांची खोड काढण्यात त्याला खूप मजा वाटत असे. अतिशय चतुर असल्याने तो दरवेळी इतर प्राण्यांवर कुरघोडी करत असे.

चिकू एकदा जंगलातून जात होता. तेव्हा एक हत्ती त्याला झाडाची फळे खात असलेला दिसला. या हत्तीची खोड काढावी असे त्याला वाटले आणि हत्तीजवळ जाऊन तो म्हणाला,

''काय म्हणता हत्ती महाराज? एकाच वेळी किती फळं खाता हो तुम्ही? किती प्रचंड आहार आहे तुमचा! आश्चर्य आहे!''

''अरे, माझे शरीर बघ. इतके अवाढव्य आहे. त्याला तेवढाच आहार हवा ना? तुझ्यासारखा पिटुकला मी थोडाच आहे?'' हत्ती म्हणाला.

''अहो, तुमचे शरीर मोठे असेल, तुम्ही भरपूर खादाडही असाल! पण ताकदीबाबत काय? तुम्ही ताकदवान असाल असे वाटत नाही...!'' चिकू हत्तीला खिजवत म्हणाला.

''मी... मी तुला ताकदवान नाही वाटत? अरे, तो जंगलाचा राजा सिंह सुद्धा आमच्या हत्तींच्या वाटेला जात नाही. कळले का?'' हत्ती मोठ्या फुशारकीने म्हणाला.

आणि हत्तीला आव्हान देत तो म्हणाला, ''आपल्या दोघांत कोण ताकदवान आहे हे कळण्यासाठी माझ्याबरोबर पैज लावून बघ हवी तर!''

आता मात्र हत्तीला खूप हसू आले. या सशाची चांगलीच जिरवावी असेही त्याला वाटले. तो म्हणाला, ''अरे बारक्या... कशाला माझ्या वाटेला जातोस...? तरीपण तू म्हणतोस तर लावू पैज...! बोल काय करायचे पैज लावण्यासाठी...?''

''काही नाही. तू जंगलाच्या एका कडेला दोरीचे एक टोक घेऊन उभा राहा आणि मी जंगलाला लागून असलेल्या समुद्राच्या काठावर दोरीचे दुसरे टोक घेऊन उभा राहतो. जो या रस्सीखेच खेळात जिंकेल तो खरा ताकदवान...!'' चिकूने पैज सांगितली.

हत्तीने होकार दिला.

एका मोठ्या दोरीचे टोक धरून हत्ती जंगलाच्या कडेला उभा राहिला.

इकडे चिकू ससा जंगलाला लागून असलेल्या समुद्राकडे गेला. त्या समुद्रात एक भला मोठा 'व्हेल' मासा राहात असे. त्या माशालाही चिकूने आपल्या ताकदीबद्दल चांगलेच खिजवले.

झाले तो 'व्हेल' मासा चिडला आणि त्यानेच चिकूला पैज लावण्यास सांगितले. चिकू तयार होताच. त्याने सोबत आणलेल्या दोरीचे दुसरे टोक त्या 'व्हेल' माशाच्या तोंडात दिले. तो म्हणाला, "हे पहा, मी आता जंगलाच्या दुसऱ्या टोकाला जातो. आणि मग आपण रस्सीखेच सुरू करू...!"

दोरीचे एक टोक हत्तीकडे तर दुसरे टोक त्या व्हेल माशाकडे असे झाले. हत्ती व व्हेल मासा एकमेकांना पाहूच शकत नव्हते कारण दोरी इतकी लांब होती की दोरीच्या एका टोकापासून जर पाहिले तर दुसऱ्या टोकाला काय चाललंय हे कळायला मार्गच नव्हता.

एवढ्यात चिकू मोठ्याने ओरडला, "ओढ आता!" त्या दोघांनाही वाटले की पैज सुरू झाली. मग काय त्या दोन्ही अत्यंत ताकदवान प्राण्यांची रस्सीखेच सुरू झाली. कोणीही कोणाला हार जात नव्हते. दोघेही अगदी हैराण झाले. या साध्या सशाची किती मोठी ताकद! असा विचार त्या दोघांच्या मनात आला.

चिकू मात्र एका झाडाच्या मागे लपून थांबून त्या हत्तीची आणि माशाची मजा पाहात होता तेवढ्यात त्याला एक गंमत करावीशी वाटली. त्याने त्या दोरीला आपल्या अणकुचीदार दातांनी कुरतडण्यास सुरुवात केली.

इकडे तो हत्ती आणि मासा जोरजोरात त्या दोरीला खेचत होते. त्यांना कल्पनाही नव्हती की चिकू ससा मधोमध दोरी कापत आहे.

आणि बघता बघता दोरी तुटली, आणि धडाडधम्म... असे दोन मोठ्ठे आवाज झाले. जंगलातले सगळे प्राणी त्या आवाजाने गोळा झाले. बघतात तर काय, तो अगडबंब हत्ती तुटलेली दोरी सोंडेत धरून जमिनीवर आडवा झाला होता. त्याचा एक सुळका तुटला होता; हत्तीच तो! पडताना चार झाडेसुद्धा त्याच्या अंगाखाली दबली गेली.

- आणि इकडे तो व्हेल मासा समुद्राच्या तळाशी लांबवर फेकला गेला. त्याला लवकर वर येताच येईना. मग इतर माशांनी त्याला धरून वर काढले.

त्या हत्तीची आणि माशाची कहाणी ऐकल्यानंतर सगळ्या जमलेल्या प्राण्यांच्या लक्षात आले की, ही त्या खोडकर चिकू सशाचीच करामत आहे.

ते सगळे चिकूला पकडायला निघाले पण चिकू थोडाच सापडणार? तो केव्हाच दूर पळून गेला होता.

❒

# हे माहीत आहे का तुम्हाला?

**मित्रांनो, आपल्या भारत देशाची राष्ट्रीय प्रतीकं कोणकोणती आहेत याची माहिती आहे का तुम्हाला? मग चला तर, ती जाणून घेऊ.**

(बंड्या आजोबांना नेहमीच त्रास देत असे. मात्र आज चक्क प्रश्नाचं उत्तर जाणून घेण्यासाठी तो भुणभुण करत होता.)

बंड्या : आजोबा! ओ आजोबा... मला एवढ्या प्रश्नाचं उत्तर द्या ना..!

आजोबा : अरे बघू बाबा, तुझा तो प्रश्न... आणि काय रे बंड्या? आज चक्क अभ्यास करतोयस? (आजोबा चष्मा सावरत बोलले.)

बंड्या : आजोबा, आपल्या देशाची प्रतीकं म्हणजे काय हो?

आजोबा : अरे, राष्ट्रीय प्रतीकं म्हणजे तुमचं राष्ट्रगीत कोणतं? राष्ट्रध्वज कसा आहे? राष्ट्रीय प्राणी कुठला? अशी जवळपास एकूण आठ राष्ट्रीय प्रतीकं आहेत आपली...!

बंड्या : अहो आजोबा, मला जरा सावकाश... सविस्तर समजावून द्या ना...! (बंड्या वहीपेन सावरतो.) हं सांगा आता... मी पटपट लिहून घेतो.

आजोबा : अरे बाबा... आधी नीट लक्ष देऊन ऐक. समजावून घे आणि मगच लिही... कळलं का?

(बंड्या निमूटपणे मान हलवतो.)

आजोबा : आपला देश म्हणजे भारत देश... आपल्या देशाची एकूण आठ राष्ट्रीय प्रतीकं आहेत. प्रतीकं म्हणजे मानचिन्हं.

बंड्या : जगातल्या प्रत्येक देशाची अशी आठ-आठच राष्ट्रीय प्रतीकं असतात?

आजोबा : नाही नाही. आपल्याला किती प्रतीकं असावी हे तो प्रत्येक देश ठरवतो बरं का!

बंड्या : मग आपली सांगा ना...!



आजोबा : ऐक तर मग... आपलं पहिलं राष्ट्रीय प्रतीक आहे आपला 'राष्ट्रध्वज'. या राष्ट्रध्वजाला एकूण तीन रंग आहेत. सर्वात वर केशरी म्हणजेच भगवा, मध्यभागी पांढरा आणि सर्वात खाली हिरवा.

मधल्या पांढऱ्या रंगात अशोकचक्र आहे. ते असते निळ्या रंगाचे आणि या चक्राला एकूण चोवीस आरे असतात.

(बंड्या भराभरा लिहून घेतो.)

आजोबा : दुसरं राष्ट्रीय प्रतीक आहे राजमुद्रा. बंड्या, तू आपलं एक रुपयाचं नाणं पाहिलंस ना? त्याच्या मागे जे तीन सिंह आहेत ती आपली राजमुद्रा आहे.

बंड्या : आजोबा, ते तीन सिंह बऱ्याच ठिकाणी असतात. म्हणजे पोस्टकार्डवर, टपालतिकिटावर, हो ना...?

आजोबा : अगदी बरोबर. काय नजर आहे रे तुझी... व्वा! (आजोबा बंड्याची पाठ थोपटतात.)

आजोबा : बरं का बंड्या, या राजमुद्रेच्या खालच्या बाजूस अशोकचक्र असून त्याच्या डाव्या बाजूला घोडा तर उजव्या बाजूला बैल आहे. सर्वात खाली 'सत्यमेव जयते' हे वाक्य लिहिलेले असते. त्याचा अर्थ आहे...

बंड्या : नेहमी सत्याचाच विजय होतो.

आजोबा : शाब्बास... अगदी बरोबर.

आजोबा : आपलं तिसरं प्रतीक तर तुला पाठच आहे. ते आहे आपलं राष्ट्रगीत. जनगणमन...

बरं का बंड्या... आपलं राष्ट्रगीत गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी रचलेलं आहे. खरं तर ते पाच कडव्यांचं आहे. मात्र पहिलं कडवंच राष्ट्रगीत म्हणून निवडण्यात आलं आहे.

बंड्या : मग आजोबा ते 'वंदे मातरम्' काय आहे हो?

आजोबा : अरे 'वंदे मातरम्' आपलं राष्ट्रीय गान आहे. म्हणजेच गाणं. राष्ट्रगीत वेगळं आणि राष्ट्रगान वेगळं.

बंड्या : होय, मला माहीत नव्हतं. उगीच गल्लत झाली असती दोन्ही ओळखायला!

आजोबा : नीट लक्षात ठेव. राष्ट्रगीत नंतर राष्ट्रीय गाणं हे आपलं चौथं प्रतीक आहे. हे राष्ट्रीय गाणं म्हणजेच 'वंदे मातरम्' रचलं आहे ते बंकिमचंद्र चट्टोपाध्याय या बंगाली कवींनी. हे आहे संस्कृत भाषेत रचलेलं काव्य. आपल्या देशाची स्वातंत्र्य चळवळ चालू होती ना तेव्हा या गीतानं भारतीयांना खूप स्फूर्ती दिली. आपली चेतना जागवली.

बंड्या : आजोबा, पुढची प्रतीकं सांगा ना!

आजोबा : आपलं पाचवं प्रतीक आहे आपलं राष्ट्रीय पंचांग. ते २९ मार्च १९५७ पासून अस्तित्वात आलं. हे शक कालगणनेवर आधारित आहे. आपलं सहावं प्रतीक आहे वाघ...!

बंड्या : वाघ...!

आजोबा : हो... मात्र कोणताही वाघ नाही बरं का...! अंगावर पिवळ्या रंगाची लव व काळे पट्टे असलेला बंगाली वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे. १९७२ पर्यंत सिंह हा भारताचा राष्ट्रीय प्राणी होता.

बंड्या : मग आजोबा तो मोरसुद्धा राष्ट्रीय प्राणीच आहे ना...!

आजोबा : नाही...! तो आहे राष्ट्रीय पक्षी. ते आपलं सातवं प्रतीक आहे. मोराची गणना पक्ष्यात होते, प्राण्यात नाही. तो भारताच्या जवळपास सर्व भागांत आढळत असल्यामुळे त्याची निवड राष्ट्रीय प्रतीक म्हणून झाली.

बंड्या : आणि आता शेवटचं प्रतीक...?

आजोबा : आपलं शेवटचं प्रतीक आहे आपलं राष्ट्रीय फूल. आणि ते आहे 'कमळ'. आपल्या भारतीय संस्कृतीत कमळाला विशेष महत्त्वाचे स्थान आहे. कारण कमळ हे पवित्रता व शुद्धता यांचे प्रतीक आहे.

बंड्या : झाली आठच्या आठ राष्ट्रीय प्रतीकं...!

आजोबा : मग आता ही कायम लक्षात ठेव. अरे, या देशाचे नागरिक म्हणून आपल्याला हे माहीत असलंच पाहिजे नाही का...? ❐



# खास बालकांसाठी

**आमच्या बालमित्रांनी वाचलीच पाहिजेत अशी आमची काही गमतीदार खास पुस्तके**

**लेखिका अर्चना ओक**




किल्ली दिली की भरभर धावणाऱ्या छोटू उंदराने उडवलेली धमाल, आणि तशाच इतर गोष्टी या पुस्तकात वाचा

**छोटू किल्लीवाला उंदीर**
आणि इतर कथा




साबणाचे फुगे उडवताना जगनला काय सापडले? त्यामुळे त्याला किती मजा आली हे या पुस्तकात वाचा.

**बुडबुड्यांचे विमान**
आणि इतर गोष्टी

**किंमत प्रत्येकी ३० रु. एकत्रित पोस्टेज २५ रु.**




पीयूषने हिमपुतळ्याचे सोंग घेऊन चोराला कसे पकडले ही मजेदार गोष्ट

**चालणारा हिमपुतळा**
आणि इतर गोष्टी




बो बो नावाच्या सशाने कशा खोड्या केल्या ते या पुस्तकात वाचा

**छोटूसा पांढरा ससुकला**
आणि इतर गोष्टी

# वाचनालयांना आवाहन

आज वेगवेगळ्या प्रकारची माहिती मिळवण्याचे विविधमार्ग उपलब्ध झालेले आहेत. इंटरनेटच्या प्रसाराने हवी ती माहिती तयार मिळण्याचा 'रेडिमेड' मार्गही खुला आहे. त्यामुळे माहिती म्हणजेच ज्ञान व हे ज्ञान हवे तेव्हा मिळवता येते असा गैरसमज सर्वत्र प्रत्ययास येतो.

परंतु मानवी जीवन, मन, प्रगल्भ, आनंदी व विचारी होण्यासाठी वाचनाला आजही कोणताही पर्याय नाही. वाचनाने मानवी मनाची, बुद्धीची मशागत होते व व्यक्ती अधिक सृजनशील, क्रियाशील बनते. वाचनाचा सार्वत्रिक प्रसार झाला तर सारा समाजच प्रगत बनेल.

यासाठी आज वाचनसंस्कृतीची वाढ करण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्यात वाचनालयांनी फार मोठे योगदान देण्याची गरज आहे. वाचन संस्कृतीची वाढ होण्यासाठी वाचनालयातून उत्तम दर्जेदार पुस्तके वाचकांना उपलब्ध झाली पाहिजेत- अशी पुस्तके कित्येक वाचनलयांतून आज उपलब्ध होत नाहीत.

जादा कमिशन मिळते म्हणून दर्जाहीन, पुस्तके वाचनालयांकडून खरेदी केली जातात आणि अशी पुस्तकेच गावोगावीच्या वाचकांना दिली जातात.

मनोरंजनाच्या भुलभुलैय्यात अडकलेल्या आजच्या युवापिढीला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व मनाला प्रगल्भ बनवणाऱ्या पुस्तकांचा प्रसार अधिकाधिक होणे गरजेचे आहे. यासाठीच सर्व वाचनालयांना आम्ही आवाहन करीत आहोत, फक्त उत्तमच पुस्तके घ्या आणि समाजाच्या बौद्धिक विकासाचे पाईक बना, काही ज्येष्ठ नामवंतांनी नावाजलेल्या दर्जेदार पुस्तकांची माहिती आम्ही सादर करीत आहोत. प्रत्येक वाचनालयात ही पुस्तके असलीच पाहिजेत, असे आम्हाला वाटते. वाचनालयांनी ही पुस्तके घ्यावीत व आपले वाचनालय समृद्ध करावे ही अपेक्षा.




## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके




"You Said It!" आता मराठीत!

**कसं बोललांत!**
रुपांतर : **अविनाश भोमे**


जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री. आर. के. लक्ष्मण यांचा "You Said It!" हा 'कॉमन मॅन'चा व्यंगचित्रसंग्रह

किंमत : ८०रु.सवलतीत ७०रु.
प्रमुख विक्रेते :
उत्कर्ष बुक सर्व्हिस, पुणे. २५५३२४७
श्री समर्थ एजन्सी, पुणे. २४४८३९१६

प्रकाशक
अमोल भोमे,पुणे.
२५४६७२०६

**बंडखोर**
**९०रु.**
ओशो अनु. माधुरी काबरे

संपूर्ण निरामय आणि शुद्ध जीवनासाठी सर्व बंधने झुगारुन आध्यात्मिक स्वातंत्र्य कसे मिळवावे याबाबत ओशोंचे परखड विचारमंथन








**मुग्ध कहाणी प्रेमाची**
ओशो अनु. मीना टाकळकर **१२०रु.**

कबीरांच्या सुंदर आणि भावात्म दोह्यांचे ओशो रजनीशांनी केलेले अत्यंत रसाळ विवेचन

पोस्टखर्च वेगळा पाठवावा

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके




### मंत्र श्रीमंतीचा


श्याम भुर्के **१३०रु.**

युवकांना, व्यावसायिकांना योग्य संदेश आणि सकारात्मक दृष्टिकोन देणारे प्रभावी मार्गदर्शनपर पुस्तक

### २०मिनिटे तंदुरुस्तीसाठी

**१३०रु.** अनु. गंगाधर महाम्बरे

आजच्या धावपळीच्या युगात आपले शरीर तंदुरुस्त कसे ठेवावे याचे मार्गदर्शन करणारे पुस्तक






### चला!उठा!कामाला लागा!

अनु. अंजनी नरवणे **१२०रु.**

स्वतःला टप्प्याटप्प्याने ओळखत, गुणांना उजळवत यश मिळवायचे खात्रीशीर उपाय

पोस्टखर्च वेगळा पाठवावा

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे



## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके




उपलब्ध पण दुर्लक्षित सच्च्या कागदपत्रांनी सांगितलेली शिवपुत्राची अद्भुत, चित्तथरारक पण वास्तव महागाथा

### संभाजी

विश्वास पाटील **४८०रु.**

सहा महिलांच्या जीवनकहाण्या रात्रीच्या रेल्वेप्रवासात उलगडत जातात आणि स्त्रीजीवनाचे, सहजीवनाचे आणि एकाकीपणाचे वेगवेगळे पदर स्पष्ट होत जातात

### लेडिज कूपे

**२५०रु.** अनु. अपर्णा वेलणकर





रामायणकाळातील सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय बदलातील स्त्रीविषयक दृष्टिकोन मांडणारी प्रभावी कादंबरी

### समर्पिता

शरद दळवी

**२२०रु.**

पोस्टखर्च वेगळा पाठवावा

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे